


पर्यटनाचे डोही आनंद तरंग

डॉ. सतीश शास्त्री

पर्यटनाचे डोही आनंद तरंग

डॉ. सतीश शास्त्री

पर्यटनाचे डोही आनंद तरंग

लेखक :
डॉ. सतीश शास्त्री

नचिकेत प्रकाशन, स्नेहनगर नागपूर.

पर्यटनाचे डोही आनंद तरंग
प्रथमावृत्ती : ८ फेब्रुवारी १९९२ वसंतपंचमी

डॉ. सतीश शास्त्री
६२ अ, विद्याविहार, राणाप्रतापनगर नागपूर -४४००२२

मुद्रक आणि प्रकाशक
श्री. अनिल सांबरे
सौ. वीणा कुळकर्णी

नचिकेत प्रकाशन
२४, योगक्षेम ले आऊट, स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर- ४४० ०१५
६२ अ, विद्याविहार, राणाप्रतापनगर, नागपूर- ४४० ०२२

मुखपृष्ठ - श्री उदय घुई

मूल्य - ५५ रुपये

ज्यांचा जिव्हाळा

आणि आशीर्वाद

सदैव माझ्या पाठिशी असतो असे महानुभाव

प्रा. अरविंद खांडेकर

श्री. लक्ष्मणराव उपाख्य आप्पासाहेब सेनाड

डॉ. सुधीर बोधनकर

श्री पद्माकर (पी.आर.) दीक्षित

यांना समर्पण -

मनोगत

‘ पर्यटनाचे डोही आनंद तरंग ’ हे पुस्तक वाचकांच्या सुपूर्द करतांना मला आनंद होत आहे.

पर्यटन ! एक सुखावह भ्रमंती ! एक कलात्मक शास्त्र ! सांस्कृतिक व राष्ट्रीय एकात्मता साधणारे एक चिरंतन मूल्य !

पर्यटनातून प्राप्त होते एक संजीवन देणारे रसायन ! त्यातून उमलतो प्रतिभेचा संपन्न पैलू !

पर्यटनातून पर्यटकास सृष्टीसौंदर्यांतून अंतःस्थस्वर गवसतो ! तो स्वर आनंदाचे चांदणे उधळित मार्गक्रमण करतो ! पर्यटनातून प्रबोधनाचा प्रकाश दिसतो ! त्यातून चिरंतनांचे चिंतन संक्रमित होते ! पर्यटनातून माधुर्य स्त्रवत असते ! घेणाऱ्याची ओंजळ अपुरी पडते ! असे पर्यटनाचे विलोभनीय स्वरुप आहे !

पर्यटन हा माझ्या आवडीचा विषय ! अभ्यासाचा विषय ! आणि संशोधनाचा विषय ! माझे पीएच.डी. संशोधन याच विषयसंदर्भात झाले आहे. पर्यटनाचे आणि पर्यटन व्यवसायाचे सिध्दान्त, विचारप्रवाह, विश्लेषणात्मक समीक्षा, नवे सूत्र इत्यादींचे सूत्रबध्द विवेचन ‘ पर्यटन व्यवसाय - स्वरुप आणि समीक्षा ’ या ग्रंथात येणार आहेच.

पर्यटनाच्या संदर्भातील चर्चासत्र, परिषद, समारोहाचे उद्घाटन या सर्व प्रसंगी मी पर्यटनावर - त्याच्या एकात्म जीवनदर्शन रसायनाचे तत्वज्ञान विशद करीत असतो.

पर्यटनाचे निमित्ताने देशभर भ्रमण झाले ! खूप हिंडलो ! पर्यटनस्थळे पाहिलीत ! त्यांचे भाव सौंदर्य जाणून घेतले ! ते शब्दांनी प्रकट करण्याची आवश्यकता जाणवली आणि पुस्तक लिहायला घेतले ! पर्यटन क्षेत्राचा आवाका खूप मोठा आहे. पर्यटन स्थळांबद्दल लोकांना नेमकी माहिती नसते ती व्हावी या दृष्टीने प्रमुख पर्यटन स्थळांसंबंधी लिहिण्याचे ठरविले. त्यातले हे पहिले पुष्प होय !

भारतातील पर्यटनस्थळांचा प्रारंभ मी उत्तरभारतातून केला. कुलु, मनाली, कांगडा, डलहौसी, चंबा, खजियार, धर्मशाळा, सिमला, बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्री, हरिद्वार, ऋषिकेश, नैनीताल, अलमोडा, राणीखेत, चिखलदरा, मसुरी, महाबळेश्वर इत्यादी प्रमुख पर्वतीय पर्यटन स्थळांचे वर्णन यात आहे.

हे एक प्रवासवर्णन आहे ! जे अनुभवलं, जे डोळयांना भावलं तेच शद्बांच्या ओंजळीतून रितं केलं !

परंतु नेहमीच्या पध्दतीचं हे प्रवासवर्णन नाही ! मी माझ्या लेखन शैलीने त्याला एक वेगळाच आयाम दिला ! त्यात प्रवासाकरिता आवश्यक असणारी सर्व माहिती दिली ज्यामुळे प्रवासी हे पुस्तक घेऊन प्रवास करु शकेल आणि त्याला कोणतीही अडचण जाणार नाही ! प्रवास केला नाही तर वाचकाला त्या विशिष्ट स्थळाचे दर्शन शद्बातून नक्कीच होईल असा विश्वास वाटतो !

सामान्य पर्यटकाला पर्यटन स्थळांचे सौंदर्य उकलून दाखविणे हा या लेखना मागील उद्देश आहे ! पर्यटन ही आजची महत्वाची गरज आहे ! पुस्तक वाचनाने प्रवास करण्याची आवड निर्माण होईल व पर्यटनाचा आनंद त्यांना मिळेल, मिळायला पाहिजे अशी इच्छा आहे.

या पुस्तकातून जी पर्यटन स्थळे वाचकांच्या भेटीस येत आहेत ती सृष्टी लावण्याची सुंदर प्रतिके आहेत ! भारताच्या आणि जगाच्या पर्यटन नकाशावर सुप्रतिष्ठित झालेली आहेत ! त्यांच्या ठिकाणी एका नवा उन्मेष, एक नवा विचार आणि एक नवे संजीवन देण्याचे सामर्थ्य आहे ! त्यांच्यात मानवाचे आणि मानव समुहाचे अप्रतिम व्यक्तिमत्व घडविण्याची कांचनमयी किमया आहे ! हे आपण लक्षात घेतले पाहिजे ! म्हणजे केवळ पर्यटन करणे हा निखळ आनंदाचाच भाग नाही तर मानवी मन प्रगल्भ करणे, सक्षम करणे आणि त्याद्वारे ते स्वतः प्रकाशमान होऊन इतरांसाठी दीपस्तंभासारखे बनविणे हा पर्यटनाचा उद्देश आहे ! हा पर्यटनाचा मूलगामी स्वरुपाचा गाभा आहे !

वाचकांना ही प्रवासवर्णने आवडतील आणि उपयुक्त ठरतील अशी आशा आहे.

पर्यटनाचे हे पुस्तक लिहितांना मला माझ्या आजोबांच्या वाक्यांची आठवण झाली त्यांनी लहानपणीच आम्हाला लेखनाची प्रेरणा दिली. **स्वर्गीय श्री. यशवंत रामचंद्र उपाख्य भाऊजी शास्त्री,** ज्यांच्या कृपाछत्राखाली शास्त्री घराण्याची यशस्वी वाटचाल सुरु आहे. त्यांचा कृतज्ञता पूर्वक उल्लेख करणे हे माझे कर्तव्य आहे.

पुस्तक लिहितांना, त्यांची प्रुफे तपासतांना आपल्या स्वकीयांची मदत होत असते. **डॉ. कुमार, व सौ. कल्याणी शास्त्री, श्री. एन.जी. व सौ. वीणा कुळकर्णी, श्री वसंतराव व सौ सुधा अडोणी, श्री अशोकराव व सौ कुमुद इंगोलीकर, श्री विलासराव व सौ विद्या नामजोशी, श्री आशीष पंचभाई, श्री अभिजित महाजन, श्री अनिकेत पांडे श्री मदन सेनाड** या सर्वांची मदत झाली हे विशेष होय !

माझ्या सी.पी.अॅन्ड बेरार महाविद्यालयाचे विद्वान, बहुश्रृत **प्राचार्य श्री. श्री.म.पांडे, उपप्राचार्य श्री. चं व्यं दिवाण, डॉ. वि.स.जोग, प्रा. सुधाकर देशपांडे, प्रा. प्रमोद सोवनी, प्रा. उमाकांत शुक्ल, श्री गोपाळराव आठवले, श्री पदमाकर भाटे श्री. ह. वि. महावादीवार,** प्रभृतींचे वेळोवेळी हार्दिक सहकार्य लाभत असते त्यांचा मी आभारी आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाची आणि मुद्रणाची संपूर्ण जबाबदारी माझे सुविद्य उद्यमशील मित्र **श्री अनिल सांबरे** आणि **सौ. अनुराधा सांबरे** यांनी स्वीकारली व उत्तमरित्या पार पाडली याबद्दल त्यांचे मी आभार मानतो.

श्री परमेश्वर नृसिंहसरस्वतींची कृपा, आईवडिलांचे आशीर्वाद मित्रांच्या शुभेच्छा यातून ग्रंथ सिध्दीचे कार्य झाले त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन हा ग्रंथ मी वाचकांच्या सुपूर्द करतो.

डॉ. सतीश शास्त्री

वसंतपंचमी

दि. ८ फेब्रुवारी १९९२

प्रकाशकीय

'पर्यटनाचे डोही आनंद तरंग' हे पुस्तक वाचकांच्या हाती सोपवितांना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. या अगोदर डॉ. सतीश शास्त्री यांचे अर्थधारा पुस्तक आम्ही प्रकाशित केले आणि त्याला वाचकांनी भरघोस पाठिंबा दिला याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

पर्यटन आणि पर्यटन व्यवसाय या विषयात डॉ. सतीश शास्त्री यांचे पी एच. डी. संशोधन आहे. त्यांचा टंकमुद्रित एक सहस्त्र पानांचा प्रबंध आहे. पर्यटन हा त्यांचा आवडीचा आणि अध्ययनाचा विषय आहे. पर्यटन विषयावरील त्यांची पुस्तके प्रकाशित करुन वाचकांना एक नवे दालन उपलब्ध करुन देत आहोत.

प्रवास करण्याची कल्पनाच मुळी आनंददायी असते. प्रवास करुन आपण एक नवा टवटवीतपणा प्राप्त करुन घेत असतो. आजच्या धकाधकीच्या जीवनात स्थिरता, प्रसन्नता लाभण्यासाठी प्रवास आवश्यक असतो. प्रवासातून भिन्न संस्कृती, प्रवाह यांचे आकलनही होत असते. पर्यटन स्थळांना भेटी देणे त्यातून आनंद, समाधान प्राप्त करणे ही आजची गरज आहे. पर्यटनाचे महत्व सर्वांनाच मान्य आहे. जागतिक पर्यटन वर्षातच या पुस्तकाच्या लेखनास प्रारंभ झाला व आता ते पूर्ण होऊन प्रकाशित होत आहे.

'पर्यटनाचे डोही आनंद तरंग' या पुस्तकात प्रवासवर्णन आहे. पर्यटन स्थळांची माहिती आहे. ती वाचतांना त्या प्रवासी स्थळांचे चित्र समोर उभे राहते व आपण प्रवास केला पाहिजे असे एकदम वाटते. तसेच प्रवासात हे पुस्तक आपल्या सोबत हवे अशी जाणीवही होते. या दृष्टीने पुस्तक अत्यंत लक्षणीय, संग्राहय झाले आहे.

डॉ. सतीश शास्त्री हे प्रतिभावंत लेखक आहेत. त्यांची भाषा शैली रसाळ आहे. काव्यात्म आहे. मनाचा आणि बुध्दीचा ठाव घेणारी आहे. त्यांचा व्यासंग गाढा आहे. त्यांनी खूप भ्रमंती केली आहे. आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होऊन आपले विचार व्यक्त केले आहे. सूक्ष्म अवलोकन मार्मिक निरीक्षण त्यांच्या लेखनातून दिसून येते. त्यांची स्वतःची डौलदार अशी अभिजात लेखन शैली, रेखीव शब्दकळा यामुळे संपूर्ण प्रवासवर्णन वैशिष्ट्यपूर्ण, आकर्षक आणि एक अनुपम ठसा उमटविणारे झालेले आहे.

डॉ. सतीश शास्त्री गेल्या दोन दशकांपासून ललित, आर्थिक आणि साहित्यिक विषयांवर वृत्तपत्रांतून सतत लेखन करीत आहेत. त्यांचा अनुभव दांडगा असून त्याला चिंतनाची किनार आहे.

डॉ. सतीश शास्त्री व्यवसायाने प्राध्यापक असून पर्यटनतज्ज्ञ म्हणून त्यांचा लौकिक आहे. प्रकाशनाची संधी दिल्याबद्दल त्यांचे, वितरकांचे तसेच या दर्जेदार निर्मितीत सहभाग देणाऱ्या सर्व तंत्रज्ञांचे, अधिकाऱ्यांचे आणि कलाकारांचे आम्ही आभारी आहोत.

या ग्रंथ निर्मितीला ऑफसेट छपाईमुळे खूप खर्च आला. दिवसेंदिवस कागद, रंग, छपाई या सर्वांचे दर सतत वाढत आहेत त्यामुळे किंमतीत अपरिहार्यपणे वाढ होत असते तरी आम्ही माफक किंमतीत तसेच सवलतीत हे पुस्तक वाचकांना उपलब्ध करुन देत आहोत.

प्रसिध्दीपूर्व नोंदणीच्या आमच्या योजनेला वाचकांनी कल्पनेपेक्षा जास्त, अतिशय चांगला प्रतिसाद दिला. त्यांच्या या स्नेहाबद्दल आणि सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत. त्यांचे असेच सहकार्य आमच्या पुढील प्रकाशन योजनानांही मिळेल अशी आशा करतो. त्यांचा लोभ असाच निरंतर असावा अशी आमची कामना आहे.

सर्वांग सुंदर शैलीमध्ये डॉ. सतीश शास्त्री यांनी लिहिलेला हा ग्रंथ वाचकांना नक्कीच आवडेल आणि व्यावहारिक उपयुक्ततेचा ठरेल यांत शंकाच नाही.

अनिल सांबरे
प्रकाशक.

पर्यटनाचे डोही आनंद तरंग !

पर्यटन ! एक आनंदाची भ्रमंती ! व्यक्तित्व विकासाचे एक महत्वपूर्ण साधन ! राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे एक प्रभावी माध्यम ! प्रचंड उत्पन्नप्राप्ती मिळवून देणारा एक विशाल व्यवसाय ! अशा विलोभनीय पैलूंनी पर्यटनाचा आशयघन आकृतिबंध तयार होतो. त्याचे मोहक स्वरुप जाणून घेणे तितकेच आवश्यक होते.

मानव निसर्गपुत्र असल्यामुळे निसर्गासंबंधी त्याला एक विलक्षण ओढ असते. निसर्ग सान्निध्यातील प्रसन्नता वा मार्दव मनविभोर करीत असते. विविध ठिकाणी सृष्टी सौंदर्याची ही किमया विस्तारली आहे. ते अवलोकन करण्यासाठी पर्यटन करावयाचे असते.

आधुनिक काळात उद्योग व प्रमंडळाचा विकास झाला त्यामुळे शहरे वाढलीत. भौतिक विकास वेगाने झाला. नवनवीन क्षेत्रे उदयास आली. नवे तंत्र विकासमान झाले. नवीन वातावरणात व्यक्तीही समाविष्ट होत गेल्या. नवीनतेच्या, प्रगतीच्या देणगीसोबत काही अपरिहार्य दुष्परिणामही सहन करावे लागले. प्रदूषण, अनारोग्य, मानसिक ताण, संघर्ष इत्यादी व्यक्ती जीवनात हानिकारक असलेल्या घटकांचा परिणाम सतत होत असतो. या दुष्परिणामांच्या चक्रातून मोकळीक काढणे म्हणजे निसर्गरम्य ठिकाणी पर्यटन करणे हाच उपाय असतो.

मोहक समुद्रकिनारे, उंचीवरची हिमशिखरे, हिरवेकंच अभयारण्य, धबधबा, नद्यांचे संगम ही सर्व सृष्टीसौंदर्याची विविध रुपे पर्यटनाद्वारे पाहणे,

त्यांचा आस्वाद घेणे व एका आगळया आनंदात विहार करणे ही एक आवश्यक बाब झाली आहे. निसर्गसान्निध्यात व्यक्तीचे आरोग्य उत्तम होत असल्यामुळे वर्षातून एकदा तरी पर्यटन करावे हा ब-याच जणांचा उद्देश असतो. टवटवीतपणा कायम ठेऊन आकर्षणाचा एक तरंग निर्माण करणे हे सृष्टीसौंदर्याचे वैशिष्ट्य आहे. याच वैशिष्ट्यांनी व्यक्ती निसर्ग सौंदर्याकडे सतत आकर्षित होत असते. जीवनाचे नवे संजीवन प्राप्त करीत असते.

एकात्म जीवनादर्शनाचे रसायन

पर्यटनास स्वतंत्र सामाजिक मूल्य आहे. प्राचीन काळात हा सामाजिक सहभागाचा पैलू समजल्या जात होता. आधुनिक काळात यंत्र व तंत्राच्या प्रसारासोबत विचारांचे संक्रमण झाले. सामाजिक जाणीव वाढीस लागली.

प्रवासामुळे सहजीवनाची सवय होते. समाजातील विविध घटकांचे परस्परसंबंध प्रस्थापित होतात. परस्पर बंधुत्व, एकात्मता व सामंजस्य वाढत जाते. नव्या व्यक्तींचा भाषेचा, परंपरेचा, प्रदेशाचा परिचय होत असतो. स्वभाव वैशिष्ट्याप्रमाणे तो अंशतः किंवा दीर्घकाळ टिकतो पण परिचयाचा प्रारंभ पर्यटनाने अवश्य होतो. दोन्ही घटकांचा परस्पर सहकार्याने विकास होतो. परिवार, गाव, समाज यात एकात्मता निर्माण होऊन समाजात शांतता, सहकार्य व समाधानाची स्थिती वाढत जाते.

भारतासारख्या विविध प्रांत, भाषा, राहणीमान, वर्ण, जाती, धर्म असणा-या देशात परस्परांना जाणून घेऊन त्यांच्यातील उत्तम कलागुणांचा स्वीकार करुन, सर्वधर्म समभावाची व राष्ट्रीय एकात्मता साधण्याची महत्वपूर्ण कामगिरी पर्यटनातून साकार होते. निरनिराळया परिषदांसाठी, सम्मेलनांसाठी, सर्व प्रदेशातून व्यक्ती एकत्र येतात. निश्चित स्वरुपाचे धोरण आखतात, तेथील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेतात, त्या ठिकाणच्या लोकांमध्ये सहभागी होतात. त्या ठिकाणची वेशभूषा करण्याचा प्रयत्न करतात हे सामाजिक अभिसरणाचे लक्षण आहेत व ते पर्यटनाने पूर्ण होत असते.

स्वतःला सतत क्रियाशील ठेवणे, स्वतःच्या प्रगतीची व तयार झालेल्या व्यक्तमित्वाची तसेच कुटुंबातील संपन्नतेची इतर जवळच्या नातलग, मित्र यांना जाणीव करुन देणे, महत्वपूर्ण घटकांची अन्य व्यक्तींना माहिती देणे, उत्कट मैत्री दर्शविणे, इत्यादी स्थिती सामाजिक पर्यटनाची गरज स्पष्ट करतात. सामाजिक पर्यटनाची यशस्विता अन्य ठिकाणच्या सहका-यांचा स्वभाव व तेथील आवश्यक सोयी, अर्थप्रबंधन यावर प्रामुख्याने अवलंबून असते. यजमान व पाहुणे ही संकल्पना प्रारंभापासून पर्यटनाने रुजू केली. पाहुण्यांचे आदरतिथ्य व स्वागत करणे हे सामाजिक नैतिकतेचे लक्षण समजले जाते व आता तर ती चांगली परंपरा झाली आहे. सामाजिक संकेतानुसार पर्यटन क्षेत्राचे वाढते प्रमाण ही पर्यटनाची सामाजिक उपलब्धी आहे.

समाज म्हणजे केवळ व्यक्तींचा कळप व समूह नसून ती एक जीवमान सावयव सत्ता आहे. विशिष्ट भूप्रदेशाला मातृभूमी मानून तेथे राहणा-या समाजापुढे राष्ट्र बनत असते. प्रत्येक समाजपुरुषाची स्वतःची अशी एक प्रकृती असते. ही प्रकृती ऐतिहासिक कारणांसमवेत जन्मजात असते. भिन्न वैशिष्टये व परंपरा असूनही समाज पर्यटनाच्या माध्यमाने एकात्म राहात आला आहे. संपूर्ण राष्ट्रविषयी आदराची व ममत्वाची भावना म्हणजेच देशभक्ती होय. पर्यटनाच्या माध्यमातून परस्पर आदराची भूमिका व बंधुभाव सतत जागविला जातो. व्यक्तीला समष्टीशी जोडणारा व एकरुप करणारा दुवा म्हणजे पर्यटन आहे.

समाजामध्ये अनेक कारणांमुळे अलिकडे सतत तणाव वाढत असतो. त्यातून विसंवाद, विरोध व पुढे संघर्षाची स्थिती निर्माण होते. फुटीरतावादी प्रवृत्ती वाढत जाते. हे सर्व थांबविण्यासाठी व समाजातील सर्व घटकात सुसंवाद कायम ठेवण्यासाठी पर्यटनाचे सूत्र नेहमीच लाभकारक ठरत आले आहे कारण हे सूत्र सृष्टीशी संबंधित आहे.

भाषा, राहणी, वेशभूषा, पंथ, संप्रदाय इत्यादी गाष्टींमध्ये विविधता असूनही समाजातील सर्व घटकांना एकात्म करण्याकरिता समान इतिहास, समान संस्कृती, समान परंपरा, समान एकात्म जीवनादर्श यांचे रसायन आवश्यक असते. पर्यटनाच्या माध्यमातून हे रसायन तयार होत असते हे विशेष होय.

सृष्टीसौंदर्य, कलात्मकता आणि आदरातिथ्य यांच्या समृध्दतेमुळे भारतात पर्यटन व्यवसाय प्रचंड उत्पन्न प्राप्तीचे साधन बनलेला आहे. हॉटेल उद्योग, उपहारगृहे, बाजारपेठा, बँका, टॅक्सी, बससेवा, फोटोग्राफर्स हे पर्यटन व्यवपसाचे प्रमुख घटक आहेत. पर्यटनस्थळाची घोषणा झाल्याबरोबर वरील घटकांची अस्तित्व तेथे जाणवायला लागते. पर्यटकांची संख्या वाढताच या घटकांचा विस्तार होतो व त्यात स्पर्धाही सुरु होते. वरील प्रत्येक घटक रोजगार पुरवठयाच्या क्षमतेचा आहे.

पर्यटन व्यवसायापासून विदेशी चलनप्राप्ती होते तसेच देशांतर्गत पर्यटनामुळे उत्पन्न वाढत असते. सर्वच स्तरावरील लोकांना विशिष्ट प्रमाणात उत्पन्न प्राप्ती करुन देणारा हा व्यवसाय त्यामुळेच महत्वपूर्ण ठरतो. २१०० कोटी रुपयाचे विक्रमी उत्पन्न यावर्षात शासनाला या व्यवसायापासून प्राप्त झाले. विदेशी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. उत्पन्नाचे वाढते आकडे लक्षात घेता पर्यटनाचे स्थान अर्थकारणातील उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून गणले जाते हे विशेष ! पर्यटक, आकर्षक पर्यटन केन्द्रे, व्यवसायाच्या आवश्यक घटकांचा विस्तार, साधनांची उपलब्धता यामुळे पर्यटन व्यवसाय अधिक उत्पन्नदायी व पर्यटन अधिक लोकाभिमुख होत आहे.

शरीराची मरगळ तर पर्यटनाने दूर होतेच पण मनाची मशागत आणि बुध्दीचे संवर्धन पर्यटनाच्या माध्यमातूनच होते व मानवाला 'आनंदाचे डोही आनंद तरंग' या अवस्थेप्रत नेते. यातून संपूर्ण समाज भावनिकदृष्टया एकात्म व अखंड राहतो ही पर्यटनाची महान उपलब्धी आहे.

* * *

हिमाचल प्रदेशातील सृष्टीसौंदर्य

हि माचल प्रदेश ! निसर्गाच्या भव्यतेचा सौदर्यशाली आविष्कार ! सृष्टीचं बहरलेले भावलावण्य ! उषः कालची रम्यसृष्टी, विशालकाय पसरलेली धवलशुभ्र हिमाच्छांदित शिखरे, मंदपणे मुग्ध करणारा पवन, झुळझुळणारे थंडगार पाणी हे सर्व लावण्याचे मोहक पदर ! अनुभवायला मिळतात येथील पर्यटन स्थळी ! निळयाशार आकाशात, काळया पांढऱ्या ढगांचे अस्तित्त्व छेदुन सहस्त्ररश्मिची किरणे हिमालयाच्या बर्फाळ पर्वत शिखरांवर आपले अस्तित्व प्रकट करतात त्यावेळी बावनकशी सुवर्ण वितळत असल्याचा आभास होतो. येथील ओहोळामधून झरझर वाहणाऱ्या पाण्याला एक नाद आहे. तो येथील वातावरणात मुग्धतेंची भर घालतो. उंचच उंच वृक्षराज, सुंदर हिरवळ, थंडगार बोचणारा वारा, पक्ष्यांचे कुंजन, निसर्गाशी तादाम्य पावणारे पोशाखी निवासी हे सर्व दृश्य पाहिले की पाहणाऱ्याला निसर्ग एक नवी ओढ, एक नवा उन्मेश, एक नवी प्रेरणा देतो. मोहवून टाकतो. निसर्गाच्या प्रसन्नमयी सामर्थ्याची कल्पना येथेच येते.

कुदरता का करिश्मा म्हणजे निसर्गाचा चमत्कार ! कुलू मनाली ! हिमाचल प्रदेशातील प्रत्येक पर्यटनस्थळ विलक्षण प्रसन्नता देणारे आणि मोहविणारे ! कुलू मनाली, डलहौसी, कांगडा, सिमला, धर्मशाला, खजियार चंबा ही सर्व निसर्ग सौंदर्याची विविध आकर्षक पैलू दाखविणारी स्थळे आहेत.

कंच हिरवे कुलू

काश्मीर प्रमाणे सृष्टीचे लावण्य टिपण्याचे सौंदर्यस्थळ ! कंच हिरवे कुलू ! हिमालयाच्या पर्वतराजींमधील १२१९ मीटर उंचीवरील शिखरस्थान ! मन मोहरुन टाकणारे अकल्पनीय सौंदर्य पाझरत असल्याचे दृश्य येथे पाहायला मिळते. पर्वतांनी वेढलेल्या कुलूचा व्यास ८० किलोमीटर लांबीचा आहे. बर्फाच्छादित शिखरे, त्यावर पडणारे सूर्य-किरण, आणि चमचमणारक दृष्य पर्यटक पाहातच राहतात. जवाकुसुम, गुलाब पुष्पी या फुलांच्या बहराने सुगंध दरवळत असतो. पर्वतारोहण करणारे प्रवासी, कलात्मकता जपणारे प्रवासी, आंनद लुटणारे प्रवासी, स्केटिंग करणारे प्रवासी, मंदिरात दर्शन घेऊन पूजाअर्चा करणारे प्रवासी, केवळ भटकंती करणारे प्रवासी असे विविध उद्देशाने येथे येणारे पर्यटक आपल्या उद्दिष्टपूर्तींचा आनंद लूटतांना दिसतात. परतीचा प्रवास करुच नये इतके रमणीय वातावरण येथे आहे.

कुलूचे खरं नांव कुलूता ! कुलूताचा संदर्भ महाभारतात सापडतो. एवढी गौरवशाली परंपरा लाभलेले हिमालयाच्या कुशीत विसावलेले अत्यंत थंड हवेचे सौंदर्यशाली स्थान ! उपलब्ध माहितीनुसार चौलराजाने सहाव्या शतकात आपल्या मुलीला कुलु येथे पाठवून मंदिराची उभारणी झाली.

कुलुचे एक सांस्कृतिक आकर्षण आहे. ते म्हणजे दसरा (विजयादशमीचा) उत्सव मोठया धडाक्यात येथे साजरा होतो. दक्षिणेत घडलेल्या श्रीरामांच्या विजयाचा उत्सव उत्तरेतील पर्वतशिखरांवर साजरा होतो व येथील महत्वाचा केन्द्रबिन्दु ठरतो. तेंव्हा आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेची साक्ष पर्यटकांना जाणवते, मनोमन उंचावते.

कसे जायचे !

कुलू ठिकाण खूप उंचीवर असूनही तेथे पोहोचण्यासाठी आता सर्व प्रकारच्या सेवा पर्यटन विभागाने केल्या आहेत. कोणतीही विशेष साधने नसतांना प्राचीन काळात लोकांनी पायी प्रवास करुन ही स्थाने आपल्या ह्दयात कायमची कोरुन ठेवलीत.

कुलु येथे जाण्यासाठी बसमार्ग सर्वात सोयीचा आहे. एक रस्ता पठाणकोट-पालमपूर-जोगिंदरनगर- मंडी कडून जातो तर दुसरा सिमला- बिलासपूर -मंडी कुल्लु असा आहे. दोन्ही मार्गाने कुलु येथे पोहोचता येते. हिमाचलप्रदेश, पंजाब, हरियाणा, दिल्ली परिवहन महामंडळाची बससेवा उपलब्ध आहे. खाजगी आरामदायी बस सेवा तसेच पर्यटन महामंडळाकडून बससेवा सुरु आहे. टुरिस्ट बस, टॅक्सी इत्यादी वाहने नियमितरित्या कुलुला जात येत असतात.

रेल्वेने प्रवास करतांना दिल्लीहून पठाणकोट पर्यंत जाऊन तेथुन जोगिंदरनगर पर्यंत छोटया लाईनने जावे लागते. जोगिंदरनगरहून बसने कुलुला पोहाचावे लागते. दिल्ली, सिमला, चंदीगढ येथून रेल्वे प्रवास करता येतो. हा प्रवास थोडा जिकिरीचा आहे.

विमानसेवा प्रवाशांसाठी तत्पर आहे. हिमाचलप्रदेश शासनाने पर्यटनास प्रोत्साहन देऊन सर्व प्रकारच्या सोयींची व्यवस्था केली आहे. कुलुपासून १० किलोमीटर अंतरावर भूंतर विमानतळ आहे. दिल्ली, चंदिगढ, सिमला येथून विमानाने भूंतर पर्यंत जाता येते. वायुदुतच्या सेवाही उपलब्ध आहे. विमानतळापासून बस, टॅक्सीने कुलुला पोहचता येते. संपूर्ण प्रदेश पर्वतांचा असल्यामुळे वातावरण चांगले असल्यास विमान-प्रवासाचा आंनद घेता येतो.

दर्शनीय स्थाने

नग्गर - समुद्रसपाटीपासून १५१९ मीटर उंचीवर हे स्थान आहे. उत्तर पश्चिम पर्वतीय घाटीतील सौंदर्य येथे पाहायला मिळते. येथे 'होटल कोस्सल' मध्ये राहण्याची व्यवस्था आहे. नग्गरला १४०० वर्षेपर्यंत कुल्लुची राजधानी राहण्याचे भाग्य लाभले आहे. येथे रशियाचा एक चित्रकार शेरिक याच्या स्मृतीप्रित्यर्थ एक आर्ट गॅलरी आहे. हा मूर्तीकार येथे आला होता व या शांत वातावरणात त्याने आपली कला साकार केली. येथे श्रीकृष्ण, विष्णु, त्रिपूरा सुंदरी देवी के मंदिर आहेत.

बिजली महादेव मंदिर - कुल्लुपासून ११ किलोमीटर अंतरावर २४३५ मीटर उंचीवर हे मंदिर आहे. येथील एक विशेष धार्मिक स्थळ आहे.

येथून कुल्लु घाटीचे मनोरम दर्शन प्रवाशांना होते. या मंदिरावर पडणारी सूर्याची किरणे चांदीसारखी चमचमत राहतात. हे दृष्य कुल्लु यात्रेकरुंना मोहरुन टाकते. ज्यासाठी आपण एवढा प्रवास केला तो आंनद मिळाला असे समाधान प्रवाशांच्या मुखावर विलसत राहते.

रायसन - हे ठिकाण कुल्लुपासून १६ किलोमीटर अंतरावर १४३३ मीटर उंचीवर आहे. शिबिर आयोजित करण्यासाठी हे स्थळ प्रसिध्द आहे. युवकांसाठी कॅम्प, रॅली. खेळ-स्पर्धा येथे आयोजित होत असतात. हिमाचल प्रदेश पर्यटन विकास महामंडळाने येथे एक हॉटेल व कॉटेजची व्यवस्था केली आहे. भाडेदर माफक आहेत

मणिकरन - येथे गरम पाण्याचे झरे पाहायला मिळतात. कुल्लुपासून ४५ किलोमीटर अंतरावर गरम पाण्यासाठी प्रसिध्द असलेले ठिकाण. यातील पाणी एवढे गरम असते की भात, वरण शिजुन तयार अन्न मिळू शकते. याठिकाणी एक गुरुद्वार आणि एक मंदिर शिख आणि हिंदुचे धार्मिक स्थळ आहेत. येथे एक दंतकथा ऐकायला मिळते ती अशी की, भगवती पार्वतीचे कर्णकुंडले हरविली होती ती याठिकाणी मिळालीत म्हणून याचे नामकरण 'मणिकरन्' असे झाले.

कैटरेन - कुल्लुपासून वीस किलोमीटर अंतरावर हे एक रमणीय ठिकाण आहे. फल पुष्पांनी हा परिसर बहरला आहे. सफरचंदाच्या बागा आहेत आणि त्यावर संशोधन करणारी प्रयोगशाळा आहे. मासोळी पार्क आहे. मधमाशांचे पोळे जागोजागी दिसतात.

कसौल - पार्वती नदीच्या किनाऱ्यावर, कुलु पासून ४२ किलोमीटर दूर अंतरावर एक रमणीय स्थान विसावले आहे. पर्यटकांना येथे राहण्याचा मोह आवरता येत नाही.

याशिवाय वैष्णोदेवी मंदिर, रघुनाथ मंदिर प्रेक्षणीय व एकदा भेट देण्यास व दर्शन घेण्यास आवश्यक असलेली स्थळे आहेत. वेळ असल्यास पर्यटकांनी ती जरुर पाहावीत.

निवास कुठे करायचा ?

प्रवाशांना वरील प्रश्न नेहमीच पडतो. कुलुला व्यवस्था चांगली आहे. मात्र भाडेदर जास्त आहेत. हॉटेल्स सोयींनी सज्ज आहेत. सोय आणि मुद्रा यांचे संतुलन साधणारे हॉटेल प्रवाशांनी निवडावे.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन नंबर
नवीन गेस्ट हाऊस	अखरा बाजार	२२८
दौलत हॉटेल	धालपूर	३५८
इंपायर हॉटेल	कुलु घाटी	०९७

याशिवाय शासकीय निवास व्यवस्था व धर्मशाळा आहेत. येथील बाजारपेठ खरेदीसाठी चांगली आहे. लोकरीचे, उनी कपडे, शाली साधारण स्वस्त दरात पण चांगल्या प्रतीच्या विकत घेता येतात. मध येथे उत्तम स्वरुपात उपलब्ध आहे. कपडयांचा व्यापार जास्त आहे. पर्यटक खरेदी केल्याशिवाय परतत नाहीत. कुलु पाहिल्यावर वेध लागतात ते मनालीचे !

* * *

मोहक मनाली !

मनाली ! मोहक ! नितांत रमणीय ! हिलसस्टेशनची राणी ! पर्यटकांचा आनंद द्विगुणित करणारे आणि समृध्दतेची स्थिती दर्शविणारे पर्यटनस्थळ !

कुलु पाहिल्यानंतर मनालीची ओढ पर्यटकांना लागते, पाऊले आपोआप त्या दिशेने पडतात आणि येथे आल्यावर निसर्गाचे लावण्य पाहून नेत्र सुखावतात, दिपून जातात !

कुलुच्या उत्तरेस समुद्रसपाटीपासून सहा हजार फुट उंचीवर वसलेले हे नगर निसर्गाचे लेणे आहे. संतत शुभ्र धार कोसळणारा लहान धबधबा फल आणि पुष्पांनी व वृक्षवेलींनी गुंफलेले मनाली नगर अत्यंत शांत आहे ! जणु कालचक्र निसर्गाची शोभा पाहात काही काळ स्थिरावले आहे. ही शांती प्रसन्न करणारी आहे कारण झुळझुळ वाहत्या पाण्याचा नाद मंजूळ आहे. एखाद्या तपस्वी व्यक्तीला आध्यात्मिक साधनेसाठी लागणारा उत्तम परिसर हाच आहे ! थंडगार वातावरण, वर्तुळाकार शिखरे, वृक्षराजी, हिमप्रपात यामुळे मनाली ('एव्हरग्रीन टुरिस्ट प्लेस') सदैव हिरवेकंच पर्यटनस्थळ म्हणून गौरविले आहे. देशात आणि विदेशात लोकप्रिय आणि प्रसिध्द असलेले हे स्थळ उन्हाळयात आणि हिवाळयात पर्यटकांची गर्दी सतत आमंत्रित करीत असते. सूर्योदयाच्या वेळी हिमच्छादित पर्वत शिखरे सोनेरी रुपे चमकवितांना दिसतात तर सूर्यास्ताच्या वेळी शांती आणि त्यागाचा उपदेश करणारी भगवी छटा दर्शवित असतात. हे

दोन्हीही क्षण पर्यटकांना सारखेच मोहवित असतात त्यामुळे असे लोभस क्षण टिपण्यासाठी बऱ्याच वेळ वाट पाहात असलेल्या पर्यटकांची गर्दी खूपच झालेली असते.

एक आगळे समाधान पर्यटकांच्या चेहऱ्यावर झळकते. प्रत्येकाच्या ओठी निसर्गाची स्तिमित करणारी किमया शब्दांकित होत असते.

रोमहर्षक खेळ

मनाली येथे हिवाळयात बर्फवृष्टी झाल्यानंतर पर्वतारोहण संस्थाद्वारे दरवर्षी ट्रेकिंग, स्कीईंग, स्केटिंग अशा रोमांचक खेळांचे आयोजन करण्यात येते. त्यात देशातून व विदेशातून आलेले पर्यटक सहभागी होतात. स्केटिंगसाठी मनाली सर्वोत्तम स्थान मानण्यात आले आहे. हिमाचल प्रदेश शासनाने या संदर्भात सर्व सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

निवासाची सोय

मनाली येथे निवास व भोजनाच्या सोयी उपलब्ध आहेत. शासना तर्फे विश्रांतीगृह, हॉलिडे होम, तसेच खाजगी लॉजची व्यवस्था चांगली आहे. खाजगी क्षेत्रातील व्यवस्थेवरच पर्यटकांना अवलंबून राहावे लागते. दर महाग आहेत. सुखसोयी व आर्थिक सुबत्ता यावरुन प्रवासी आपली निवास व्यवस्था ठरवितात.

हॉटेल नांव	पत्ता	फोन नंबर
सपन रिसौर्ट	कुलु मनाली हायवे	३८
ग्रासलॅन्ड हॉटेल	टुरिस्ट ब्यूरोसमोर मनाली	१२२
ग्रीन फील्ड हॉटेल	मनाली	-
हॉलीडे होम इंटरनॅशनल	मनाली	-
मेफेयर गेस्ट हाऊस	मनाली	-
माऊंट व्हयू होटल	मनाली	-
न्यू होप गेस्ट हाऊस	मनाली	७८

दर्शनीय स्थळे

सोलंग घाटी - याठिकाणी इंस्टिटयूट ऑफ माऊंटेनियरिंग ॲन्ड स्क्वाईड स्पोर्टस् संस्थेद्वारे स्केटिंगच्या खेळांचे आयोजन होत असते. मनाली आणि कोठी यांच्यामध्ये सोलंग घाटी आहे. बर्फाच्छादित पहाड आणि नयनरम्य दृष्य येथे पाहायला मिळते.

रोहतांगदर्श - मनालीपासून ५१ किलोमीटर दूर आणि समुद्रसपाटी पासून ४११२ मीटर उंचीवरील शिखरस्थान ! सभोवतीच्या बर्फाच्छादित शिखरांचे अवलोकन करण्याचे उत्तम ठिकाण ! जून ते सप्टेंबर या चार महिन्यातच याठिकाणचे दृष्य पाहता येते. पर्वतारोहण करणारे प्रवासी याठिकाणी येऊन पर्वतारोहणाचा रोमांचकारी आनंद लूटतात. हिवाळयात बर्फवृष्टी झाल्यावर कुलु आणि मनाली पासून येथे येण्याचा मार्ग बंद होतो. त्यावेळी कुलुपासून विमानाने येथे येता येते परंतु धुक्याचे हवामान असल्यास हा हवाईमार्ग बंद होतो तथापि विद्यमान हिमाचल प्रदेश शासनाने कुलु- मनाली पासून रोहतांगदर्श पर्यंत सात किलोमीटर लांबीचा रोप वे तयार केला असून त्यामुळे याठिकाणी पयर्टकांना हिमवृष्टीचा आनंद घेता येतो, अर्थात हा प्रयोग साहसी आहे.

वशिष्ठ - मनालीपासून डावीकडे थोडया अंतरावर वशिष्ठ नावाचे गांव आहे. येथे गरम पाण्याचे झरे आहेत. मुळातच अति थंड असलेल्या या भागात गरम पाण्याच्या नैसर्गिक झऱ्यांमुळे पर्यटकांना निखालस आनंद होणे स्वाभाविक असते म्हणून या छोटया गावाला प्रवासी आवर्जुन भेट देतात व गरम पाण्याच्या स्नानाचा आनंद लूटतात. येथे पर्यटन मंडळाने स्नानासाठी चांगल्या सोयी केल्या आहेत. या गावात नव्याने बांधलेले एक सुंदर मंदिर आहे.

जगतसुख - हे फार पूर्वी कुलु राज्याचे राजधानीचे नगर होते. येथील शिवमंदिर शिकारा शैलीतून बनविले गेले आहे. प्रेक्षणीय आहे. गायत्रीदेवी मंदिर, देवी शेरावली मंदिर पाहण्यासारखे आहेत.

तिब्बत मठ - येथील तिब्वत बाजार क्षेत्राच्या मागे मुळातच एक सुंदर असलेल्या जागेवर मठ असून येथे कलात्मक वस्तुंची बाजारपेठ उपलब्ध आहे.

हिडिंबा देवी मंदिर - ऐतिहासिक आणि वास्तुकलेचा सुंदर नमुना येथे पाहायला मिळतो. या मंदिराच्या सभोवती देवदार वृक्ष आहेत. मंदिरातील सभामंडप कलात्मक आहे.

कसे जायचे !

मनाली या पर्यटनस्थळी पोहोचण्यासाठी प्रथम उत्तरप्रदेशात आणि राजधानी दिल्लीत यावे लागते. दिल्ली येथे पोहोचण्यासाठी भारतातील सर्व प्रमुख शहरांना जोडणारी रेल्वे व्यवस्था आहे. दिल्लीहून रेल्वेने चंदीगढ किंवा पठाणकोट येथे येऊन तेथून बस किंवा टॅक्सीने मनालीला पोहोचता येते.

बसने प्रवास करणे अधिक सोयीस्कर आहे अर्थात ज्यांना असा प्रवास मानवतो व त्यातून आनंद लूटता येतो त्यांनी आरामदायी बसने प्रवास करावा. दिल्ली, पंजाब, हिमाचल प्रदेश बस निगम तर्फे दिल्ली, चंदीगढ, सिमला, धर्मशाळा येथून मनाली पर्यंत थेट जाण्यासाठी बससेवा तत्पर आहे. खाजगी प्रवासी संस्था आरामदायी बसने प्रवास घडवून आणतात. हा प्रवास थोडा महाग आहे पण सोयीस्कर आहे. दिल्ली रेल्वेस्थानक, बसस्थानक, आंतरराज्यीय बसस्थानक (बडा बस अड्डा) येथे खाजगी प्रवासी संस्थांची कार्यालये आहेत. त्यांची विश्वसनीयता पाहून प्रवास करावयाचा असतो. महाराष्ट्र मंडळ येथे उतरल्यास विश्वसनीय खाजगी प्रवासी सेवा उपलब्ध आहे. दिल्लीहून खाजगी प्रवासी संस्थांचा हा तेजीचा व्यवसाय आहे. सामान्यतः फसवणूक होत नाही.

मनालीपासून ५० किलोमीटर अंतरावर भूंतर विमानतळ (हवाई अड्डा) आहे. दिल्ली, चंदिगढ, सिमला येथून विमानाने येथे उतरुन बस किंवा टॅक्सीने मनालीला पोहोचता येते. ज्यांना बसप्रवास अडचणीचा वाटतो त्यांनी विमानसेवेचा लाभ अवश्य घ्यावा.

सफरचंद, अक्रोड यांच्या बागांची विपुलता व नैसर्गिक सुरम्यता अनुभवण्यासाठी एकदा तरी मनालीला जायलाच हवे !.

* * *

डौलदार डलहौसी

डलहौसी ! डौलदार ! एक सुरम्य पर्यटनस्थळ ! देशात आणि परदेशात प्रसिध्द आणि लोकप्रिय !

हिमाचल प्रदेशातील प्रत्येक स्थळ सुंदर आणि रमणीय आहे. तरीपण प्रत्येकाचे वैशिष्टय आगळे आणि वेगळे आहे. निसर्गाच्या मनोरम विविध छटांचे स्वरुप निरनिराळ्या ठिकाणी पाहायला मिळते.

डलहौसी येथील वातावरण स्वच्छ, सुंदर आणि स्वास्थ्यवर्धक आहे. घनदाट पर्णराशी, फलफुलांचा संयोग, शिखर टोक यामुळे काही काळ सान्निध्यासाठी पर्यटकांना हे स्थळ आकर्षित करते.

लॉर्ड डलहौसी गव्हर्नर जनरल असतांना त्यांना हे स्थळ निवासासाठी खूप आवडले म्हणून त्यांनी चंबा येथील राजाशी करार करुन हे स्थळ आपल्या शासनाच्या ताब्यात घेतले व येथे सॅनीटोरियमची स्थापना केली. ब्रिटिश राज अधिकाऱ्यांसाठी निवास स्थाने बांधलीत. रस्ते बांधणी करुन हे स्थळ सुखसोयींनी परिपूर्ण केले. म्हणून या स्थळाचे नामकरण डलहौसी असे झाले. परदेशात हे पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्द आहे.

समुद्र सपाटीपासून २०३६ मीटर उंचीवरील हे स्थळ पठाणकोट पासून ८० किलोमीटर, कांगडापासून १५.६ किलोमीटर अंतरावर आहे. नवी दिल्ली, सिमला, चंदिगढ, पठाणकोट पासून रेल्वे किंवा बस किंवा टॅक्सीने येथे येता

येते. हाच जवळचा मार्ग आहे. नवी दिल्ली- पठाणकोट रेल्वे सुपरएक्स्प्रेस गाडी सतत धावत असते.

नवी दिल्लीहून कांगडा स्थित गग्गल विमानपट्टीवर वायुमार्गे येता येते तेथून बस किंवा टॅक्सीने डलहौसीला पोहोचता येते.

आंतरराज्यीय वाहतूक निगमाच्या बस सेवा, हिमाचलप्रदेश शासन बस सेवा, पंजाब शासन बससेवा, आणि खाजगी प्रवासी संस्थांच्या बससेवा येथे येण्यासाठी तत्पर आहेत. दोन्ही व्यवस्थेत आरामदायी बस सेवा आहे. खाजगी प्रवासी बस आणि टॅक्सी यांचे भाडे दर जास्त आहेत. शासनाच्या आरामदायी बसने आरक्षण करुन प्रवास केला तर कमी खर्चात पोहोचता येते व प्रवास सुखप्रद होतो.

गेस्ट हाऊस

डलहौसी येथे निवास आणि भोजनाची व्यवस्था साधारण आहे. मांसाहारी व्यवस्था उत्तम पण शाकाहारी व्यवस्था सामान्य असल्यामुळे प्रवाशांनी स्वतः सोबत पठाणकोटवरुन उपहार व्यवस्था ठेवल्यास जास्त चांगला प्रवास होतो. येथे हॉटेल्स, लॉज आणि पर्यटन विभागाद्वारे निवास व्यवस्था आहे. उन्हाळ्यात आरक्षणाची गरज भासते. सिमला, पठाणकोट येथून आरक्षण होते. पूर्वीच लॉज किंवा हॉटेल ठरवून घेतल्यास ते सोयीचे होते. त्यांची यादी खालील प्रमाणे आहे. भाडेदर सतत बदलत असतात त्यामुळे थोडे अधिक देण्याची तयारी प्रवाशांना ठेवावी लागते.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन नंबर
स्प्रिंग हॉटेल	द माल	११२
हेम कुंड हॉटेल	डलहौसी	९८
किंग हॉटेल	डलहौसी	१११
गीतांजली हॉटेल	बसस्टॅन्ड जवळ डलहौसी	५५
कुपार गेस्ट हाऊस	डलहौसी	९८
ग्रॅन्ड ब्ल्यू हॉटेल	डलहौसी	२३
गोलरी हॉटेल	डलहौसी	९४

फेयर व्हयू हॉटेल	द माल	१०६
न्यू मेट्रो हॉटेल	बसस्टॅन्ड जवळ	१३३

(संदर्भ - हिमाचलप्रदेश शासन पर्यटन विभाग)

प्रवाशांना अधिक सुखसोयी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने हिमाचल प्रदेश पर्यटन विकास निगमाने निवास व भोजन व्यवस्था अधिक व्यापक आणि माफक दरात केली आहे.

हॉटेल गीतांजली, युथ होस्टेल, विश्रामगृह - इत्यादी व्यवस्था पर्यटन निगमातर्फेच केली आहे. पर्यटन विभागातर्फे सूचना कक्ष कार्यरत असून त्याचा दुरभाष नंबर ३६ आहे. क्षेत्रीय पर्यटन विकास प्रबंधक अधिकारी मार्गदर्शन करतात. याशिवाय लोक निर्माण विभागाचे विश्रामगृह, युथ होस्टेल आणि अन्य खाजगी हॉटेल्स आहेत.

येथे प्रशिक्षित मार्गदर्शक नाहीत. पर्यटन विकास निगमाने तशाप्रकारची प्रशिक्षण व्यवस्था करायला पाहिजे. अनुभवी मार्गदर्शक माहिती सांगतात. खाजगी प्रवासी संस्था चांगले मार्गदर्शन करतात व प्रवाशांच्या शंकांचे समाधान करतात.

कलात्मक वस्तुंची खरेदी करण्यासाठी एक लहान बाजारपेठ आहे. प्रवासी थंडीसाठी ऊनी वस्त्रांची, कपडयांची खरेदी करीत फिरत असतांना दिसून येतात.

डाईनकुंड

डलहौसीला निसर्गशोभा पाहण्यासाठी काही शिखरस्थाने आहेत त्यात डाईनकुंड अधिक रमणीय आहे. डलहौसीपासून १० किलोमीटर अंतरावर आहे. टॅक्सी किंवा बसने जाता येते. या सुरम्य स्थळी रावी आणि चिनाब नदीचे पात्र पाहता येते.

कालटोप- येथून ८ किलोमीटर अंतरावर कालटोप पहाड आहे. सभोवती असणारी विशालकाय पर्वताशिखरे व दऱ्यांचे सौंदर्य प्रवाशांना टिपता येते. रात्री राहण्यासाठी येथे विश्रांतीगृहाची व्यवस्था आहे.

बकरोटा - ५ किलोमीटर अंतरावर बकरोटा पर्वत आहे. येथे घनदाट जंगल आहे. शिखरटोकावरुन पाहता येते. जंगलात प्राण्यांचा संचार असतो.

पंजपुला - डलहौसीपासून दोन किलोमीटर अंतरावर पंजपुला स्थान आहे. या भागातील प्रसिध्द क्रांतीकारक सरदार अजितसिंह यांचे बलिदान येथे झाले. शेवटच्या काळात येथे त्यांचे वास्तव्य होते. त्यांचे एक स्मारक बनविण्यात आले आहे. येथे एक सुंदर तलाव व बागबगिचा आहे. त्यात कारंजी आहेत. १९३७मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस स्वास्थ्यासाठी येथे चार महिने वास्तव्यासाठी होते. ती जागा सुभाष वाडी म्हणून स्मारक स्वरुपात येथे आहे. हिमाचल प्रदेश पर्यटन विकास निगमने येथे पर्यटकांसाठी उपहार गृह, निवास प्रबंध-सोयी केल्या आहेत.

खजियार

डलहौसी येथे उन्हाळयातील मार्च ते ऑगस्ट आणि हिवाळयातील ऑक्टोंबर- नोव्हेंबर महिन्यात प्रवासी येथे निवास करण्याच्या उद्देशाने येतात. प्रकृती उत्तम करण्यासाठी प्रवाशांचे हे सुखस्थान आहे.

डलहौसीपासून बावीस किलोमीटर अंतरावर एक अतिशय रमणीय पर्यटनस्थळ आहे ते म्हणजे खजियार ! येथील सृष्टी सौंदर्य अनुपम आहे. समुद्रसपाटीपासून १८९० मीटर उंचीवरील हे शिखरस्थान घनदाट वृक्षराजींनी वेष्टिलेले आहे. घनदाट देवदार वृक्ष संपदा येथे पाहायला मिळते. डलहौसीपासून येथे येण्याचा मार्ग दाट जंगलातून वर्तुळाकार जातो तेंव्हा आपण आकाशगंगेतून जात आहोत असा भास होतो. खजियार येथे १.५x१ कि.मी.चा सुंदर तलाव आहे. त्याची सभोवतीची हिरवीगार पार्श्वभूमी नैनीतालची आठवण करुन देते. याठिकाणचे सृष्टी सौंदर्य मनोहर आहे. पर्यटन विकास निगम मात्र याकडे पुरेसे लक्ष देत नाही असे आढळून आले. येथे निवास, भोजन इत्यादी सोयींचा अभाव आहे. त्या सुविधा खाजगी स्तरावर उपलब्ध झाल्यांस पर्यटंकांना येथे निवास करुन पर्यटनाचा आंनद लूटता येईल.

(डलहौसी पर्यटकांना सदैव आकर्षित करीत आले आहे. त्यामुळे येथे प्रवाशांची गर्दी सतत राहते. एकदा पाहून घ्यावे असे प्रत्येक प्रवाशाला वाटल्यास नवल ते काय ?

* * *

चंपावती चंबा

हिमाचल प्रदेशातील दूरवरचे एक रम्य एकांत स्थळ म्हणजे चंपावती ! पुढे चंबा नावाने प्रसिध्द झाले ! ज्यावेळी रोजच्या ताणतणावातून आपल्याला शांतता हवी असते, आनंद हवा असतो तेंव्हा चंपावती पर्यटन स्थळाला परिवारासह भेट द्यावी. मैदान, गरमी, धकाधकीपासून अलिप्त असलेले हे पहाडी निर्झर स्थान आहे. येथे शांतता खूप असल्यामुळे एकांती वाटते. पक्ष्यांचे कुंजर आणि निर्झराचा नाद सोबतीला असतो. एक अनोखी स्थिती आपणास आनंद देत असते. येथे साधु, तपस्वी दिसतात ते आपल्या साधनेत मग्न असतात.

समुद्रसपाटीपासून ७२६ मीटर उंचीवर असलेले चंबा पर्यटनस्थळ पठाणकोट पासून १२२ किलोमीटर आणि डलहौसी पासून ४४ किलोमीटर अंतरावर आहे इ.स. ९२० मध्ये राजा साहिलवर्मा यांनी हे नगर वसविले आणि राजकन्या चंपावतीच्या नावे स्थळाचे नामकरण केले. पुढे लोकभाषेत चंबा नावाने ते रुढ झाले.

याठिकाणी जानेवारी महिन्याच्या शेवटी वसंतपंचमीचा उत्सव अतिशय थाटात संपन्न होत असतो. येथील लोक संस्कृतीचा परिचय त्यावेळी आपल्याला होतो. पारंपारिक नृत्य पध्दती, लोकगीते, श्रृंगार पध्दती याची माहिती होते. या सुमारास लोकांची गर्दी मोठी असते. सभोवतीच्या घाटातून लोक येथे एकत्र येतात. हा सण त्यांचा आनंदोत्सव एप्रिल ते जून आणि ऑक्टोबर,

नोव्हेंबर, जानेवारी, फेब्रुवारी या काळात येथे भेट देणे योग्य ठरते. ऑक्टोंबर ते फेब्रुवारी हा कालावधि खूप थंडीचा असल्यामुळे भरपूर ऊनी वस्त्र प्रावरणांसह प्रवाशांनी येणे आवश्यक आहे.

दिल्लीपासून रेल्वेने पठानकोट पर्यंत यावे लागते. तेथून बस मार्गानेच चंबा येथे पोहोचता येते. पठानकोट येथे निवास करुन अनेक ठिकाणी आपल्याला प्रवास करता येतो. दिल्ली, सिमला, पठानकोट, डलहौसी, कांगडा, धर्मशाळा, येथून दररोज बस सेवा उपलब्ध आहे. बसचा प्रवास सरळ आणि सुलभ आहे. आरामदायी बस सेवेचा प्रवाशांनी अवश्य लाभ घ्यावा.

वायुमार्गाने प्रवास करणाऱ्यांनी दिल्लीहून गग्गल विमानतळावर उतरावे तेथून चंबा येथे टॅक्सीने पोहोचावे. विमानमार्गे प्रवास लवकर होतो व ज्यांना बस किंवा रेल्वेचा प्रवास करणे शक्य नसते त्यांचेसाठी उत्तम आहे.

हॉटेल्सची व्यवस्था

चंपावती पर्यटनस्थळी हॉटेल्स व लॉज निवासासाठी उपलब्ध आहेत. पठाणकोट, डलहौसी येथे निवास करुन चंपावती पाहून येता येते. येथील सृष्टी सौंदर्य पाहून निवास करण्याची इच्छा होते. विश्रांतीगृह, अतिथी निवास ही शासकीय व्यवस्था आहे. सामान्य पर्यटकांना खाजगी लॉज आणि हॉटेल्सची व्यवस्था आवडते कारण तीच सोयीची असते.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन क्र.
ठाकूर लॉज	चंपावती	-
टुरिस्ट लॉज	चंपावती	-
जनता लॉज	बसस्टॅन्ड	-
हिमाचल लॉज	चंपावती	-
चंपक हॉटेल	चंपावती	-
अखंड चंदी हॉटेल	कालिज रोड	२३७१
कृष्णा लॉज	चंपावती	-

(संदर्भः- हिमाचल प्रदेश पर्यटनविभाग चंबा)

दर्शनीय स्थळे

चंबा पर्यटनस्थळ बसद्वारा किंवा टॅक्सीने किंवा पायी भ्रमंतीने पाहता येते. त्यातील काही स्थळे निश्चितच प्रेक्षणीय आहेत.

चौगान - चंबा नगराच्या मध्यवर्ती एक मैदान आहे. तेथे यात्रा - मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. येथील यात्रा- प्रदर्शन प्रसिध्द आहे.

लक्ष्मीनारायण मंदिर - प्राचीन काळातील बांधकाम आणि शिल्पकलेसाठी प्रसिध्द असलेले श्री लक्ष्मीनारायण मंदिर ! सहा मंदिरांचा समूह आहे. ते इ.स.च्या दहाव्या शतकात बांधलेले असावे असा संशोधकांचा अंदाज आहे अजून प्रत्यक्ष प्रमाण गवसले नाही. पुरातत्व संशोधन विभागाकडे या मंदिराची देखभाल व संरक्षणाचे कार्य सोपविले आहे. या विभागाकडे या संदर्भातील माहिती उपलब्ध आहे. बंसीगोपाल, सुही देवी, ब्रजेश्वरी माँ इ. ची मंदिरे आहेत.

भरमौर - चंपावतीपासून ६४ किलोमीटर अंतरावर पूर्वीच्या चंबा राज्याची प्राचीन राजधानी भरमौर, ब्रम्हपूर नावाने ओळखल्या जाते. येथे मंदिर समूह आहे. मणिमहेश, लक्ष्यादेवी श्रीगणेश, नरसिंह अशी भगवानांची मंदिरे आहेत. स्थापत्यकला प्राचीन असून प्रशंसनीय आहे.

श्री मणिमहेश - या भागातील हे प्रसिध्द मंदिर ! येथे एक सुंदर तलाव आहे. भरमौर पासून १३ किलोमीटर अंतरावर आणि समुद्रसपाटीपासून १८५५० फुट उंचीवर आहे. याला कैलास पर्वत असेही नामाभिमान आहे. येथे यात्रा मोठया प्रमाणावर भरते. सभोवती धुके पडल्यामुळे ढगांच्यावर किंवा ढगातून प्रवास सुरु असल्यासारखे वाटते. यात्रेचे वेळी एकलाखावर लोक येथे येतात. मंदिरात पूजाअर्चा दर्शन सतत सुरु असते. पर्वतीय दर्शन हा एक आगळा वेगळा अनुभव प्रवाशांना जाणवतो.

याशिवाय येथून ४० किलोमीटर अंतरावर छतराडी येथील शक्तिदेवी मंदिर, १२ कि.मी. दूर अंतरावरील सरोल, सलूनी, बंडल, कटासन ही दर्शनीय स्थळे आहेत. १६८ किलोमीटर अंतरावरील पांगी घाटी प्रेक्षणीय आहे.

येथे ट्रेकिंगची सोय आहे. अनेक पर्यटक ट्रेकिंगचे प्रशिक्षण घेऊन आनंद लूटतात. पर्वतारोहण करणारे मोठया संख्येत येथे दृष्टीस पडतात.

याच परिसरातील लोक मार्गदर्शक म्हणून व्यवसाय करतात. प्रत्येक ठिकाणी व्यवस्थित माहिती सांगणारा, प्रशिक्षित मार्गदर्शक हवा असतो त्यामुळे प्रवाशांना खरी माहिती मिळते, या स्थितीचा अभाव आढळतो.

चंबा येथे बाजारपेठ लहान स्वरुपाची आहे. कलात्मक वस्तु खरेदी करण्यासाठी तसेच भ्रमंती करण्यासाठी पर्यटक बाजारपेठेत फेरफटका मारतात.

हिमाचल प्रदेशातील चंबा हे एकांत स्वरुपाचे पर्यटनस्थळ प्रवाशांची गर्दी मात्र आकर्षित करीत असते !.

* * *

निसर्गाचा कौस्तुभ
कांगडा

हिमाचल प्रदेशातील भाविकांचे श्रध्दास्थान म्हणजे कांगडा पर्यटनस्थळ होय ! नैसगिक सौंदर्याची लयलूट येथे पाहायला मिळते. देवभूमी म्हणून या पवित्र स्थळाला गौरविले जाते. हिमशिखरांच्या सभोवतीच्या रांगातून एक विलोभनीय दृष्य येथे साकारले आहे. येथील सृष्टी सौंदर्याचे वैशिष्टय असे की या सौंदर्यात निरंजनातील सात्विकता आहे! प्रार्थनेचे सौष्ठव आहे ! भाविकांच्या श्रध्देने जागृत सिध्द स्वरूप, या स्थळाला, प्राप्त झाले आहे ! कांगडा हा दऱ्यांचा परिसर आहे. घनदाट वृक्षराजींचा बहर पायी भटकंती करण्याकरिता प्रवाश्यांना आकर्षित करतो. कांगडा येथील सृष्टी सौंदर्याचे वर्णन 'निसर्गाचा कौस्तुभ' म्हणून केला जातो.

येथे जागृत मंदिरांची शृंखला आहे. हे धार्मिक सृष्टी सौंदर्यस्थळ आहे. इतिहास असा आहे की, महमद गझनीने येथील मंदिरांचा विध्वंस केला. कारण मंदिरे संपत्तीची आगर होती. त्या संपत्तीची लूट वांरवार मुस्लीम शासकांनी केली. नंतरच्या काळात मंदिरांची पुर्नबांधणी होत गेली. हिमाचल प्रदेशातील यात्रा महोत्सव येथेच मोठया प्रमाणावर संपन्न होतात.

कांगडा हे हिमाचल प्रदेशातील अत्यंत दूरवरचे व एका बाजुस असलेले पर्यटनस्थळ आहे. सिमला, दिल्ली, चंदिगढ, पठाणकोट, डलहौसी, येथून

रेल्वेने येथे येता येते. सिमल्यावरुन तसेच दिल्लीहून बससेवा उपलब्ध आहे. रेल्वेपेक्षा आरामदायी बसने सर्व ठिकाणे पाहता येतात व हाच प्रवास सुखकर होतो. कारण रेल्वेने प्रवास केल्यानंतर पुन्हा बसनेच कांगडा येथे जावे लागते.

विमानसेवा प्रवाशांसाठी तत्पर आहे. दिल्ली आणि सिमल्याहून वायुदूत कांगडा येथील गग्गल विमानतळ (हवाई पट्टी) उतरुन सरळ हॉटेलमध्ये पोहोचता येते. टॅक्सी सेवा उपलब्ध आहे. कांगडा येथे सामानाची नेआण करण्यासाठी हमाल आहेत. पहाडी प्रदेश असल्यामुळे आपण स्वतः सामान नेऊ शकत नाही. पर्यटकांनी स्वतःजवळ जास्त पत्रमुद्रा बाळगणे श्रेयस्कर आहे त्यामुळे प्रवास सुखावह होतो.

निवारा

कांगडा येथे निवास व्यवस्था साधारण स्थितीत उपलब्ध आहे. येथे मंदिरे असल्यामुळे भाविकांना मंदिरातील पुजाऱ्यांकडे राहण्याची व भोजन- प्रसादाची व महापुजेची व्यवस्था करता येते. अर्थात महाराष्ट्रासारखी व्यवस्था येथे नाही याची काळजी घ्यावी. हॉटेल्स व धर्मशाळा आहेत. हॉटेल्स चांगली आहेत. हिवाळयात कमी दर तर उन्हाळयात १० रु. २५ रु. - ५० रु. पासून ३०० ते ४०० रु. प्रतिदिवस भाडे आहे. मार्गदर्शक प्रशिक्षित नाही परंतु माहिती व्यवस्थित सांगतात.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन नंबर
जय हॉटेल	मेन रोड	१९७
साधना हॉटेल	कांगरा टेम्पल	-
राजभवन हॉटेल	बस स्टॅन्ड	-
माऊंट ब्ल्यू हॉटेल	मेन रोड	-
ग्रॅन्ड हॉटेल	बसस्टॅन्ड	-
अशोका हॉटेल	मेनरोड	१४७

नवी दिल्ली किंवा सिमला येथून खाजगी प्रवासी संस्थेद्वारे आल्यास त्यांचे हॉटेल - निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था पूर्वीच ठरलेली असते.

कांगडा येथे खूप प्रसिध्द मंदिरे आहेत. त्यातील शिल्पकला, नक्षीकाम, सभोवतीचे सुंदर दृष्य, प्रेक्षणीय आहेत. मंदिरांमध्ये दर्शन घेण्यासाठी खूप दूरवरुन भाविक मोठया संख्येत येतात. यात्रा, उत्सव, प्रदर्शन यांची येथे उधळण असते. अर्थात याचे स्वरुप आदिवासी प्रकारातील वेगळ्या स्थितीचे असते. येथील लोकांची वेशभूषा पारंपारिक पध्दतीची आहे.

चामुंडा मंदिर - भारतातील प्रसिध्द शक्तिपीठां पैकी सिध्दप्रद शक्तिपीठ म्हणजे श्री चामुंडा देवी मंदिर होय. येथून पाच किलोमीटर अंतरावर बैद्यनाथ - पठानकोट मार्गावर हे मंदिर आहे. बाणगंगा नदीच्या तीरावर वसलेले हे भव्य मंदिर चारी बाजूने पर्वताशिखरांनी वेढलेले आहे. सृष्टी सौंदर्य अप्रतिम आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून, सभामंडपात आल्यावर माँ चामुंडा देवीच्या भव्य मूर्तीचे दर्शन होते. भाविकांच्या आणि वैदिक, पंडितांच्या मते हे जागृत, मनोकामना पूर्ण करणारे, देवस्थान आहे. मुख्य द्वाराच्या बाजुला एका विशाल शिळेवर माँ देवीचे चरणकमल आणि शिवलिंग प्राचीन काळापासून अंकित आहे. त्यांची पूजा करण्यात येते. याच मंदिराच्या उत्तरेस एक प्राचीन शिवमंदिर आहे. एका शिळेखाली शिवलिंग आहे. मंदिराचे बांधकाम अतिशय जुने आहे. १९३५ पासून या दोन्ही मंदिरांचे व्यवस्थापन प्रबंधक कमिटीकडे आहे. त्यांनी येथे निवास भोजनाची व्यवस्था केली आहे. देवीच्या नवरात्रात येथे मोठा उत्सव संपन्न होत असतो. हिमाचल प्रदेश पर्यटन विभागाने येथे निवास व्यवस्था हॉटेलद्वारे उपलब्ध करुन दिली आहे. या विभागाच्या मते उत्सवात आणि उन्हाळयात प्रतिवर्ष प्रवाशांची संख्या एक लाखापेक्षा जास्त होते.

श्री शिव मंदिर - पठानकोट मंडी- राजमार्गवर वैजनाथाचे शिव मंदिर आपल्या प्राचीन नक्षी कलाकृतीने प्रवाशांचे लक्ष वेधून घेते. कांगडामधील हे सर्वात प्राचीन व ऐतिहासिक मंदिर आहे. मंदिराचे बांधकाम, त्यावरील कलात्मक नक्षीकाम प्रेक्षणीय तसेच अभ्यास करण्यासारखे आहे. येथील खांब सलग असून पूर्णपणे दगडी स्वरुपाचे आहे. मंदिराचा कळस अद्भूत स्वरुपाचा आहे.

मार्गदर्शक आणि पर्यटन विभाग तसेच इतिहास तज्ज्ञ यांची अलग, अलग मते आहे. काहींच्या मते पांडवांनी हे मंदिर बांधले नंतर त्याची मोडतोड झाली व

पुन्हा बांधण्यात आले. काहींच्या मते रावणाच्या काळात याची बांधणी झाली होती असे शिलालेख सापडले आहेत. इतिहासकारांच्या मते शिलालेखांवरुन हे मंदिर इ.स. पूर्व ८०४ मध्ये बांधण्यात आले. हा शिलालेख शारदा लिपी मध्ये असून त्यासंबंधी संशोधन सुरु आहे.

सध्या या मंदिराचे व्यवस्थापन भारतीय पुरातत्व विभागाकडे आहे. मंदिराचे सभोवती एक सुंदर बाग पर्यटन आणि वन विभागाने बनविली आहे. शिवरात्रीचे काळात येथे मोठा मेळावा भरतो.

ज्वालाजी मंदिर - कांगडाचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे येथील तीस किलोमीटर अंतरावरील ज्वालाजी मंदिर होय. यामंदिराला प्राचीन, ऐतिहासिक परंपरा आहे. या मंदिराचे एक विशेष महत्व असे की येथे मंदिरात मूर्ती नाही परंतु अग्निज्वाला प्रज्वलित आहेत. या पूर्वापार तशाच स्वरुपात प्रज्वलित आहेत त्या विझत नाहीत. मुस्लिम आणि इंग्रज शासकांनी त्या विझविण्यासाठी अपार प्रयत्न केले पण प्रत्यक्षात त्या विझल्या नाहीत. सतत प्रज्वलन सुरुच असते. भाविक श्रध्देने ज्वालांची पूजा करतात.

येथील मार्गदर्शकांच्या मते हे पार्वतीचे अग्निस्वरुप शक्तिपीठ आहे. याठिकाणी फार पूर्वी यज्ञ होत होते आजही यज्ञ, ज्वालांसमोर झाल्यास ते प्रज्वलन अधिक वृध्दिंगत होत राहाते. वैज्ञानिकांच्या मते पर्वतीय दगडांचा स्फोट होत असावा परंतु त्यांना अनुमान काढता आले नाही.

मंदिरात भाविकांची गर्दी सातत्याने असते. एक विलक्षण प्रसन्नता जाणवते.

माँ ब्रजेश्वरी मंदिर - कांगडा घाटीतील नितांत रमणीय मंदिर म्हणजे माँ ब्रजेश्वरी मंदिर होय. नवरात्रीच्या उत्सवात मंदिराला रोषणाई व फुलांची आकर्षक सजावट असते. मंदिराचे व्यवस्थापन शासनाकडे आहे. व्यवस्थापन समितीद्वारा निवास व भोजनाची व्यवस्था आहे. एक संस्कृत संवर्धन संस्था मंदिराचे वतीने संस्कृत भाषा शिक्षणासाठी कार्यरत आहे.

मंदिरातील पार्वती देवीची मूर्ती पितळेची आहे. महाराजा रणजीतसिंहच्या शासनकाळात या मंदिराचे संरक्षण आणि संवर्धन झाले. १९८८ मध्ये या मंदिरास १६ लक्ष २६ हजार ९५४ रु. चे उत्पन्नप्राप्ती झाली त्यातून मंदिरावर सुंदर

सुवर्णकलश चढविण्यात आले. (संदर्भ - पर्यटनविभाग हिमाचल प्रदेश शासन) मंदिरात दोनवेळा पूजा अर्चा, कीर्तन इत्यादी कार्यक्रम होत असतात.

चितपूर्णी मंदिर - कांगडापासून ८० किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे. जुलै महिन्यात येथे उत्सव असतो. मंदिरात प्रत्यक्ष स्वरुपात मूर्ती नसून एका शिला स्वरुपात पिंड आहे. देवी भगवतीचे ते आध्यात्मचक्र मानण्यात येते. भाविकांची गर्दी येथेही दिसून येते.

याशिवाय फतेहपूर येथील श्रीनृसिंह मंदिर, त्रिलोकपूर येथील मंदिर आणि मेकलाडगंज येथील तिब्बत मंदिर निश्चितच दर्शनीय आहे. या सर्व मंदिरांचे व्यवस्थापन अतिशय चांगले होणे आवश्यक आहे तसेच या सर्व वास्तुंचे संरक्षणही व्यवस्थित व्हायला पाहिजे. प्राचीन शिल्पकला, नक्षीकाम, आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन पर्यटकांना घडवितात. हा गौरवशाली वारसा आपण जतन केला पाहिजे असे प्रत्येक पर्यटकाला कांगडा घाटीचा निरोप घेतांना वाटते. भाविकांचे डोळे पाणवतात. अन्य प्रवाश्यांना समाधानासोबत निसर्गाच्या प्रचंड सामर्थ्यासमोर आपण खूप लहान आहोत असे वाटते, आणि त्या दिव्य -भव्य स्वरुपाकडे पाहात हात आपोआप जोडले जातात…!.

* * *

धरेन्द्र धर्मशाळा !

धर्मशाळा म्हणजे निवासाची जागा नव्हे तर ते एक नितांत रमणीय असे पर्यटनस्थळ आहे ! त्याच्या मनविभोर करणाऱ्या स्वरुपसुंदर स्थितीवरुन धरेन्द्र असे नाव देण्यात आले. ते किती समर्पक आहे हे प्रत्यक्ष भेटीतच लक्षात येते.

धौलधार पर्वतांच्या मालिकेत मध्य शिखरावर स्थित असलेले धर्मशाळा हे स्थळ अतिशय सुंदर आहे. हिमाचल प्रदेशात कोणते स्थळ कोणापेक्षा किती अधिक सुरम्य आहे हे ठरविणे कठीण आहे. आणि ते माप तरी कशाला लावायचे ? प्रत्यक्ष पाहावे, आनंद लुटावा, सृष्टीची किमया कशी विस्तारली आहे ते सृष्टीचक्र पाहावे, त्याचा अभ्यास करावा, व त्यापासून आपल्याला जर काही घेता आले तर अवश्य घेऊन आपले जीवन तसेच उदात्त आणि आनंदघन बनवावे, हाच काय तो पर्यटनाचा संदेश !

धर्मशाळा आपल्या प्राचीन पर्यटन स्थळांच्या श्रेणीत गणल्या जाते. इंग्रजांना ते खूप आवडले व त्यांनी सोयीसुधारणा करुन विकसित केले.

देवदार आणि चीडची वृक्षसंपदा, पुष्पांचे बगिचे, सभोवतीचे सुंदर पर्वतशिखरे, त्यावरील बर्फांचे मुकुट, थंडगार झोंबणारा वारा यामुळे धर्मशाळा पर्यटन स्थळाच्या सौंदर्यात विशेष भर पडलेली दिसते.

कसे पोहचायचे ?

धर्मशाळा या पर्यटनस्थळी जाण्यासाठी बस मार्ग सर्वात सोयीचा आहे. राष्ट्रीय राजमार्गावरुन दिल्ली-शिमलाहून सरळ धर्मशाळा येथे बसने पोहोचता येते. पठानकोट, सिमला, जम्मु, चंदीगढ, उधमपूर, होशियारपूर, देहरादून, हरिद्वार, अमृतसर, कुलु, मनाली, चंबा, भरमौर, लुधियाना, डलहौसी या सर्व ठिकाणाहून येथे बसने जाता येते. दिल्ली, सिमला, मनाली आणि पठाणकोट येथून विशेष आरामदायी बससेवा उपलब्ध आहे. खाजगी प्रवास कंपन्यांची सेवा दिमतीला आहेच, टॅक्सी, मेटॅडोर यांचीही व्यवस्था दिल्ली आणि सिमला येथून आहे. हिमाचल प्रदेश पर्यटन विकास निगमा द्वारे बस व्यवस्था आहे. दिल्ली येथे आरक्षण व्यवस्था पर्यटन विकास निगम कार्यालयात उपलब्ध आहे.

रेल्वे मार्गाने पठानकोट पर्यंत दिल्लीहून यावे लागते. देशातील प्रमुख नगरांचा संपर्क रेल्वेगाडीने पठानकोटशी आहे. तेथून लहान रेल्वे मार्गाने कांगडा येथे तेथून बसने धर्मशाळा येथे पोहोचता येते.

वायुमार्गाने गग्गल विमानतळापर्यंत दिल्ली, पठानकोट, सिमला, चंदीगढ, जम्मु येथून येता येते. तेथून फक्त तेरा किलोमीटर अंतरावर धर्मशाळा आहे. टॅक्सीने किंवा बसने पोहोचता येते.

योग्य भेटीची वेळ !

धर्मशाळा येथे येण्याचा एक ठराविक मौसम आहे. मार्च ते जून हा उन्हाळयातील काळ आणि सप्टेंबर ते नोव्हेंबर हा हिवाळयातील काळ आल्हादकारक आहे. डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात बर्फ पडल्यामुळे येण्याचा मार्ग बंद होतो तरी १ ते १५ डिसेंबर हा काळ बर्फावर स्केटिंगसाठी चांगला आहे. जुलै आणि ऑगस्टमध्ये भरपूर पाऊस असल्यामुळे येथील प्रवासी मार्ग बंद असतो.

कुठे उतरणार ?

धर्मशाळा येथे आल्याबरोबर प्रवाशांच्या मनात एक मोठे प्रश्नचिन्ह राहणार ते कुठे उतरायचे ? कोणते हॉटेल चांगले ? अर्थात येथे निवारा व्यवस्था चांगली आहे. पर्यटक निवास, विश्रांतीगृह, युथ होस्टेलची सोय आहे पण याठिकाणी शासकीय अधिकाऱ्यांनाच प्राधान्य असते. सामान्य पर्यटकांना हॉटेल, लॉज व्यवस्थेवरच अवलंबून राहावे लागते. पर्यटन विकास निगमाने स्वस्त दरात सामान्यांना राहण्यासाठी निवास व्यवस्था उपलब्ध करुन घायला पाहिजे. तेथील शाळा किंवा महाविद्यालयांना कर्ज देऊन काही निवडक खोल्या प्रसाधनांसह बांधून घेऊन त्या मौसमकाळात विद्यालयांना सुट्टी असतांना प्रवाशांना निवासासाठी दिल्यास फार चांगली सोय होऊ शकेल.

हॉटेलचे नांव	**पत्ता**	**दूरध्वनी क्र.**
रोज हॉटेल	कोतवाली बाजार	२४१७
शिमला हॉटेल	कोतवाली बाजार	२६५०
सन अॅन्ड स्नो हॉटेल	कोतवाली बाजार	२४२३
बी मेहरा हॉटेल	कोतवाली बाजार	२२५६
हिल व्यू हॉटेल	कोतवाली बाजार	-
रामसिंह हॉटेल	कोतवाली बाजार	-

(संदर्भ - हिमाचल प्रदेश पर्यटनविकास निगम) याशिवाय हॉटेल्स उपलब्ध आहेत.

मार्गदर्शक आपल्याला येथील सौंदर्यस्थळां विषयी माहिती देतात अर्थात ते प्रशिक्षित नाहीत हे सांगायला नकोच.

तिबेट मधून शरणार्थी आलेल्या नागरिकांनी तिबेटची कलाकुसरी असलेल्या वस्तु कोतवाली बाजारात विक्रीसाठी ठेवलेल्या असतात. प्रवासी या बाजारपेठेत खरेदी करतात.

मेकलाडगंज

धर्मशाळा येथून दहा किलोमीटर अंतरावर मेकलाडगंज हे नवे प्रेक्षणीय स्थान आहे. पायी जाता येते. भ्रमंतीत मजा येते. बगिचा, बौध्द मंदिरे, वास्तुशिल्प पाहायला मिळते.

कुणाल पथरी - कोतवाली बाजार पासून तीन किलोमीटर अंतरावर हे स्थळ आहे. येथे एक मंदिर आहे. सभोवतीचे सौंदर्य दृष्य मनोरम आहे.

डल लेक - धर्मशाळा पासून अकरा किलोमीटर दूर आहे. इथे सुंदर तलाव आहे. वृक्षराजींनी निसर्गशोभा वाढली आहे. येथे ट्रेकिंग करण्याची सोय आहे.

भगसुनाथ मंदिर - हे पुरातन स्वरुपातील शिवमंदिर आहे. मेकलांडगंज वरुन जवळ आहे. मंदिरात भगसुनाथ महाराजांची मूर्ती आहे. मंदिराबाहेर एक झरा आहे. एक लहानसा जलप्रपात आणि पलिकडे जलकुंज आहे. प्रेक्षणीय स्थळ आहे.

सेंट जॉर्ज चर्च - मेकलॅन्डगंज आणि फॉरसिटगंज यांच्यामध्ये हा चर्च आहे. सभोवती दाट वन वृक्षलतांनी डवरलेले आहे. लॉर्ड एल्जिनच्या स्मृतीप्रीत्यर्थ येथे एक स्मारक बनविले आहे. चर्च आकर्षक स्वरुपाच्या बांधणीचा आहे. परदेशी पर्यटक येथे आवर्जुन येतात.

वॉर मेमोरियल - धर्मशाळा येथे मातृभूमीच्या रक्षणार्थ शहीद झालेल्या सैनिकांची स्मृती म्हणून एक स्मारक करण्यात आले आहे. नगरात प्रवेश करता क्षणीच ते दिसते. स्मारकाजवळ छोटीशी बाग आहे. येथील निसर्ग देखणा आहे.

धर्मशाळा पाहतांना आणि निवास करतांना प्रवासाचा क्षीण जाणवत नाही. इतक्या दूरवरचा प्रवास करुन आलो पण एक समाधान घेऊन परत जात आहोत असेच प्रवाशांना वाटते. निसर्ग प्रेमी माणसांना मात्र परत जातांना अवघडल्या सारखे होते कारण तो निसर्ग त्यांना प्रेरणा देण्यासाठी तत्पर असतो !.

* * *

सौंदर्य संपन्न सिमला !

(श्यामला)

सि मला ! भारतातले प्रसिध्द पर्यटन स्थळ ! निसर्ग सौंदर्याने बहरलेले आणि साधनांनी संपन्न असलेले ! आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर प्रतिष्ठित असलेले स्थळ ! पर्वतीय नगरांची राणी - सिमला !

हिमाचल प्रदेशाची राजधानी असलेले सिमला (हिन्दीत आणि प्रत्यक्ष हिमाचल प्रदेशात शिमला असे म्हणतात)

सृष्टी सौंदयनि नटलेले एक रमणीय, प्रसन्न पर्यटनस्थळ आहे. हिमालयाच्या पर्वतीय रांगा, खळखळ वाहणाऱ्या नद्या, घनदाट वृक्षराजी, बर्फांची चादर, रंगीत फुलांची पसरलेली उधळण, नयनरम्य सृष्टीची अशी मोहक पखरण पाहायला मिळते ती सिमल्याला ! पर्यटक देहभान विसरुन सृष्टीची सौंदर्यशाली रुपे डोळयात साठविण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांच्या लक्षात येते की आपली ओंजळ खूपच लहान आहे !

सिमला येथे आल्यावर असे वाटते की निसर्गानी फार मोठया कॅनव्हॉसवर आपल्या मनोहरी रंग छटा उधळल्या आहेत. उन्हाळयात थंड, शीतल, सुखद वातावरण तर पावसाळयात कोसळणाऱ्या, बरसणाऱ्या जलधारा व त्यातून बहरणारे जलप्रपात, हिवाळयात बर्फावर चालणे, धावणे, बर्फाचा खेळ, स्केटिंगची मजा

देणारे वातावरण सिमला येथे अनुभवायला मिळते. सृष्टीचे लावण्य किती प्रेरक आणि प्रसन्न असते हे सिमल्याला कळते. जीवनाला एका नवी गती देण्याचे सामर्थ्य या सौंदर्यस्थळात आहे. माणूस आपल्या दैनंदिन धावपळीच्या जीवनातून वेळ काढून प्रफुल्लित होण्यासाठी येथे येतो आणि कृतार्थतेने येथून जातो ! एक आल्हादकारकता घेऊन जातो ! एक टवटवीतपणा घेऊन आपल्या गावी जातो. हे निसर्गाचे वरदान आहे ते सिमल्याला लाभलेले आहे. येथे आलेला प्रत्येक प्रवासी हा आनंदयात्री असतो.

समुद्रसपाटीपासून ७६६२ फुट उंचीवर असलेले सिमला नगर हिमाच्छादित पर्वत शृंखला, धबधब्यांच्या जलधारा, यामुळे अतिशय मनमोहक भावते. श्यामला देवी मंदिराच्या नावावरुन श्यामला नगर असे नामकरण झाले. पुढे कालांतराने लोकभाषेच्या अपभ्रंशामुळे शिमला असा शद्बप्रयोग येथे रुढ झाला. आज येथील व समस्त उत्तर भारतातील लोक शिमला म्हणूनच उल्लेख करतात.

इंग्रजाकडे येण्या अगोदर सिमला नेपाळच्या महाराजांच्या राज्यात होते. १८१९ मध्ये रोस नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने येथे पहिले घर बांधले. त्यानंतर विश्रांतीगृहांची रचना झाली. १९६६ मध्ये पंजाब आणि हरियाणा वेगळे राज्य झाल्यावर सिमला हिमाचलप्रदेशाची राजधानी घोषित करण्यात आली.

येथे घरांची रचना अगदीच वेगळी आहे. दिसायला सुंदर आहेत, पहाडांच्या रांगामध्ये मागे पुढे घरे विसावलेली दिसतात, काही उंच, कांही ठेंगणी ! अर्थात घरे व हॉटेल्स पक्क्या बांधणीची आहेत, परंतु त्यांची रंगसंगती, रचना, स्थिती स्वरुप वेगळे असते. उंच मनोऱ्यासारखी घरे, इमारती दिसतात. रस्ते चढण असलेले ! त्यामुळे पायी फिरतांना आनंद वाटतो पण थकवाही लवकर येतो. येथील लोक मात्र वेगाने चालतात, चढतात, धावतात त्यांना मात्र नेहमीचा सराव असल्यामुळे थकवा येत नाही. प्रत्येक घरामध्ये पुरेशी उष्णता (तापमान) राहण्यासाठी एक जागा असते. हॉलच्या मध्यभागी एक कोपरा असतो त्यात लाकडे टाकून जाळ करुन उष्णमान ठेवण्यात येते. हॉटेल्समध्ये हिटर्सची व्यवस्था आहे. हिवाळयात रस्त्यावर एका बाजुला शेकोटी पेटवून लोक बसलेले दिसतात.

सिमला आणि पहाडी भागातील एक वैशिष्टय म्हणजे येथील लोक एक गोलाकार रेशमीपट्टा असलेली टोपी घालतात. प्रथमदर्शनी तो त्यांचा पहेराव असेल असे वाटते पण चौकशी केली असता कळले की ती टोपी अत्यंत गरम आहे व त्यामुळे थंडी वाजत नाही. आम्ही ती घालून पाहिली आणि लक्षात आले की खरोखरच थंडी वाजत नाही. प्रवाशांनी ती टोपी अवश्य घालावी म्हणजे थंडी तर जातेच आणि काही काळाकरिता आपण हिमाचल प्रदेशी लोक बनुन जातो.

प्रभावी वाहन व्यवस्था

सिमला येथे जाण्यासाठी वाहन व्यवस्था सुसज्ज असून प्रवाशांवर त्याचा प्रभाव पडल्याशिवाय राहात नाही. दिल्ली पासून ५९९ किलोमीटर, मुंबईपासून २१३२ किलोमीटर, कलकत्त्यापासून २०३१ किलोमीटर, अमृतसर पासून ७४१ किलोमीटर आणि चंदीगढपासून ११७ किलोमीटर अंतरावर सिमला नगर आहे. येथे येण्यासाठी दिल्लीला पोहोचणे आवश्यक आहे, दिल्ली येथे भारतातील मुंबई, पुणे, नागपूर, मद्रास, अहमदाबाद, बंगलोर, कलकत्ता सह सर्व प्रमुख ठिकाणाहून रेल्वे मार्गाने पोहोचण्यासाठी व्यवस्था आहे. दिल्लीहून कालका रेल्वे स्टेशन पर्यंत पोहचून तेथून छोटया लाईनवरील रेल्वे गाडीने साडेपाच तास अंतरानंतर सिमला येथे पोहोचता येते. रेल्वेच्या प्रवासात कालका ते सिमला या मार्गावरील मनोरम घाटीचे दर्शन पर्यटकांना होते आणि अंतर केंव्हा निघून गेले ते कळत नाही.

नवी दिल्ली - कालका हिमालयीन क्वीन	वेळ सकाळी	६.१५
नवी दिल्ली - कालका मेल	-	२२.५०
कालका - नवी दिल्ली हिमालयीन क्वीन	-	१६.३५
कालका - नवी दिल्ली मेल	-	२३.३०

(संदर्भ :- रेल्वे टाईमटेबल १९९१ मार्च - वेळेत बदल होऊ शकतो कृपया दिल्ली रेल्वेस्टेशनवर वेळापत्रक पाहावे)

बस सेवा जास्त सुलभ व सरळ सिमल्यापर्यंत पोहोचणारी व्यवस्था उपलब्ध आहे. दिल्लीच्या आंतरराज्यीय बस स्टेशन (अड्डा) वरुन सिमलासाठी हिमाचल प्रदेश पथ परिवहन निगम आणि हरियाणा पथ परिवहन निगम बससेवा

प्रवाशांसाठी तत्पर आहे. सिमल्याहून परत येण्यासाठी बस व्यवस्था आहे. सिमल्याहून कांगडा, डलहौसी, धर्मशाळा, कुलु, मनाली, कालका, कसौली, अंबाला, चैल, अमृतसर, चंदीगढ, दिल्ली येथे जाण्यासाठी बस व्यवस्था आहे.

सिमला- दिल्ली	(साधारण) ६, १९.३१ वाजता
डिलक्स -	८.२०, ११.००, १९.३०, १९.४५ वाजता
सिमला - पठाणकोट -	५, १६.३० वाजता
सिमला - जम्मु	६ वाजता
सिमला - हरिद्वार	५.१०, १७.१५, १९.३० वाजता
सिमला - देहरादून	५.१०, १७.१५ वाजता
सिमला - धर्मशाळा	५, ८.२० (डिलक्स) ९.४० वाजता
सिमला - डलहौसी	१८.३० वाजता
सिमला - मनाली	९.१५ (डिलक्स) १० वाजता
सिमला- कुलु	१२ (डिलक्स) वाजता

हिमाचल प्रदेश पर्यटन विकास निगमाद्वारा शुक्रवार, शनिवार सुपर डिलक्स बससेवा सिमल्याला सकाळी ९ वाजता आहे. तसेच सिमला मनाली सकाळी ८ वाजता डिलक्स बस व्यवस्था आहे.

दिल्ली - सिमला	८.२० (डिलक्स) हरिद्वार - २२ वाजता
पठानकोट - सिमला	१६.३० वाजता, ९.००, १७.३० वाजता
जम्मु- सिमला	१६.०० वाजता
धर्मशाळा -सिमला	५.०० वाजता

(संदर्भः- हिमाचल प्रदेश पर्यटन विकास निगम सूची, बसस्थानक, पर्यटन विभाग- सिमला- वेळेमध्ये बदल होऊ शकतो.)

दिल्लीहून सिमल्यासाठी खाजगी बससेवा आंतरराज्यीय बस अड्डा, रेल्वेस्टेशन वरुन, उपलब्ध आहे. पूर्ण हिमाचलप्रदेश पर्यटन स्थळ दर्शन त्या घडवून आणतात. आरामदायी व्ही.डि.ओ कोच बसने प्रवास असतो. मात्र पैसे जास्त पडतात. टॅक्सीसेवा, मॅटॅडोर, किरायावर उपलब्ध आहे.

उत्तम निवास प्रबंध

वाहन व्यवस्थेसोबत सिमला येथे निवास प्रबंध उत्तम स्वरुपात आहे कारण येथे देशातील, विदेशातील प्रवासी मोठया संख्येत येत असतात. हिमाचल प्रदेशाची राजधानी असल्यामुळे निवास व्यवस्था चांगली आहे. हिमाचल प्रदेश पर्यटन विकास निगमाद्वारा विश्रांतीगृह, युथ होस्टेल, टुरिस्ट हॉटेलची व्यवस्था आहे. सामान्य दरामध्ये लॉज उपलब्ध आहेत.

उन्हाळ्यातील मौसमात तसेच १५ ऑक्टो. ते १५ डिसेंबर दरम्यान येथे प्रवाशांची गर्दी प्रचंड असते. त्यामुळे लॉज हॉटेल्स व्यवस्थेत संख्येने कमी पडतात. दिल्लीहून हिमाचल प्रदेश पर्यटन विकास विभागातून आरक्षण करणे आवश्यक आहे. मौसम काळात शासन टेन्टद्वारा निवासाची व्यवस्था करीत असते पण ती सोयीची होत नाही. उपहारगृहे, हॉटेल्समध्ये शाकाहारी व मांसाहारी, चायनीज, दक्षिणी, गुजराथी, वैष्णवी पध्दतीचे भोजन उपलब्ध आहे. वैष्णवी भोजन महाराष्ट्रीयन पध्दतीचे असते.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन नं.
एशिया द डान	महावीर घाटी	५८५८\ ६४६४
गुलमार्ग हॉटेल	द माल	३१६८\ ३१६९
हॉटेल अंबर	रामबाजार	४७७४
हिमलँन्ड हॉटेल	सक्युर्लर रोड	३५९६\ ३५९७
हिम व्हयू हॉटेल	नारकंडा	
मरीना हॉटेल	द माल	३५५७\ ५५९१
सम्राट हॉटेल	द माल	४१७२
ओबेराय क्लार्क	द माल	६०९१
हर्ष हॉटेल	चौडा मैदान द माल	३०१६\ ३०१७
कुदरी हॉलिडे रिसोर्ट	-	८३४२\ ८३००, ८३४१,

(संदर्भ :- सिमला पर्यटन विकास विभाग, हिमाचल प्रदेश)

वरील हॉटेल्सच्या व्यतिरीक्त आणखी हॉटेल्स व लॉज आहेत आपल्या आर्थिक व्यवस्थेनुसार प्रवासी निवास व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी विद्यमान हिमाचल प्रदेश शासन कार्यमग्न आहे.

सिमला आणि सभोवतीचे दर्शनीय स्थळे दाखविण्यासाठी मार्गदर्शक आहेत. दर्शन बस व्यवस्था आहे. हिमाचलप्रदेश पर्यटन विकास निगमा तर्फे सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत दर्शन बस विभिन्न स्थळांचे दर्शन घडवून सिमला येथे परतते. या दर्शन बससाठी पर्यटकांची गर्दी असते म्हणून येथे पूर्वीच आरक्षण करुन ठेवावे लागते. निवास कमी दिवसांचा असल्यास खाजगी आरामदायी बस, टॅक्सी दर्शन व्यवस्थेसाठी उपलब्ध आहेत फक्त त्यांचे दर ५० रु. ते २०० रु. प्रती येते.

मनमोहक दर्शनीय स्थळे

प्रॉस्पेक्ट हिल :- सिमल्यापासून ५ किलोमीटर अंतरावर आणि २१४५ मीटर उंचीवर पंधरा मिनिटांची चढण चढून आपण या शिखरस्थानी येतो. येथून सिमल्याचे नयनरम्य दृष्य दिसते. या शिखरस्थानाचे वैशिष्टय असे की येथून सूर्यास्त पाहता येतो तसेच नितांत सुंदर असा चंद्रोदय पाहता येतो. पौर्णिमेच्या दिवशीचा चंद्रोदय सृष्टीचे लावण्य दर्शवित हळुवारपणे चित्ताकर्षण करतो. किती वेळ गेला याचे भान आपल्याला राहात नाही. माणूस पुलकित होतो! जीवनाचे एक सुंदर तत्वज्ञान सूर्यास्त आणि चंद्रोदय यातून आपल्याला पाहायला मिळते, अनुभवायला मिळते ! तो सुखद क्षण कोणीही विसरु शकत नाही !

चाडविक येथील जलौघ :- सिमल्यापासून फकत सात किलोमीटरवर हा रमणीय धबधबा आहे. ८७ मीटर उंचीवरुन जलौघ खाली येतांना होणारा नाद, सभोवतीचे सृष्टीसौंदर्य, वृक्षलतांचा बहर यामुळे हे स्थान मनोवेधक बनले आहे.

जाखु हिल :- सिमल्यातील सर्वात उंच शिखरस्थान म्हणजे जाखु हिल होय ! येथे हनुमान मंदिर आहे. शिखराच्या खाली ढग जातांना दिसतात. ढग नसतांना सिमल्याचे दृष्य मनोरम दिसते. येथून सूर्योदय फारच सुंदर दिसतो. हिमाच्छादित पर्वतांची शृंखला पाहायला मिळते. याठिकाणी बंदरांचा सुळसुळाट

आहे. त्यांना खाण्याचे पदार्थ दिल्यानंतर ते त्रास देत नाहीत. हे शिखरस्थान अतिशय सुंदर आणि रमणीय भासते.

तारादेवी मंदिर :- सिमल्याहून आठ किलोमीटर अंतरावर एका पहाडावर श्री तारादेवीचे भव्य मंदिर आहे. येथे स्काऊटचे मुख्यालय आहे. याठिकाणी रेल्वे तसेच बसने जाता येते.

वाइल्ड फ्लॉवर हॉल :- केवळ तेरा किलोमीटर अंतरावर इंग्रज हॉईसराचे निवासस्थान असलेले प्रेक्षणीय ठिकाण म्हणजे वाईल्ड फ्लॉवर हॉल होय ! देवदार आणि चीडच्या मोठया उंच वृक्षांनी घेरलेले निवासस्थान ! विविध पक्ष्यांचे कुंजन ऐकायला मिळते. मनमुग्ध करणारे वातावरण येथे आहे. पर्यटन विभागाने प्रवाशांना राहण्यासाठी काही विश्रांतीगृहे येथे बांधलेली आहेत.

ग्लेन :- चार किलोमीटर अंतरावर राज्य विधान सभा भवनाजवळ हे निसर्गरम्य स्थळ आहे. सिमल्यात राहणारे लोक येथे येऊन सहलीचा आंनद घेतात.

राज्य संग्रहालय :- मालरोडवर राज्य संग्रहालय आहे या ठिकाणी हिमाचल प्रदेशाची लोक कला, संस्कृती, भाषा, वेशभूषा, आभूषणे, कलाकृती शिल्प, मूर्तीशिल्प यांचे प्रदर्शन आहे. ते पाहून येथील संस्कृतीचे गौरवचिन्हे प्रवाशांना ज्ञात होतात.

मशोवरा :- तेरा किलोमीटर अंतरावर, २१५० मीटर उंचीवरील हे स्थान 'रिट्रीट बिल्डिंग ' चे म्हणून प्रसिध्द आहे. हे स्थळ इतके सुरम्य आहे की येथून परत जाण्याची इच्छाच होत नाही.

कुद्री :- सोळा किलोमीटर अंतरावर कुद्री पर्यटन स्थळ आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी या महिन्यात येथे बर्फ पडलेला असतो. बर्फावर स्केटिंगचा खेळ तसेच बर्फामधून म्हैसगाडीतून जाण्याचीच मजा प्रवासी लूटतात. येथील जंगली रेडा गाडी ओढून नेत असतो. फेब्रुवारीत येथे वसंत पंचमीचा उत्सव संपन्न होत असतो. याठिकाणी राहण्यासाठी हॉटेल, विश्रांतीगृहाची व्यवस्था आहे.

नालदेहरा :- सिमल्यापासून बावीस किलोमीटर अंतरावर एक रमणीय स्थान नालदेहरा प्रवाशांचे आकर्षण आहे. येथे नागदेवतेचे प्राचीन मंदिर आहे.

मंदिराचे नांव पहाडी भाषेत देहरा आहे. सतलज नदीच्या अल्लड जलधारांनी मंदिराला वेढले आहे. वृक्षराजींनी संपन्न, हिरवेगार असे, हे पर्यटनस्थळ आहे. शांत आणि रमणीय आहे ! गोल्फ क्लब आणि मैदान आहे. पर्यटन भवन, पर्यटकांसाठी लहान झोपडीस्वरुप (हट) निवास व्यवस्था आहे. या ठिकाणच्या सौंदर्यामुळे येथे सिनेमाचे शुटिंग वारंवार होत असते. सिमल्याचे सिनेमात दिसणारे दर्शन याच भागाचे असते.

चैल :- सिमल्यापासून ५४ किलोमीटर अंतरावर असलेले शिखरस्थान म्हणजे चैल होय ! येथून विहंगावलोकन करता येते. दुपारचे वेळी हिमालयाच्या सूर्यकिरणांनी चमचमणाऱ्या रांगा, तर रात्रीचे वेळी सिमला, कसौली आणि दूरवर चंबा येथील लुकलुकणाऱ्या विद्युत् दिव्यांची आरास पाहण्याची मजा लुटायला मिळते. विश्वातील सर्वात उंचीवरचे क्रिकेटचे मैदान येथे आहे. हॉटेल्सची व्यवस्था आहे पण पर्याप्त् प्रमाणात नाही प्रवासी सकाळी जाऊन रात्री सिमल्याला परत येतात.

याशिवाय तत्तापानी, (गरम पाण्याचे झरे असलेले ठिकाण) नारकंडा, क्रेगनैनो, रामपूर ही स्थळे टॅक्सीने किंवा टुरिस्ट बसने अवश्य पाहायला पाहिजे. एका दिवसात ही स्थळे पाहता येतात. यापैकी जे अधिक आवडले असेल तेथे प्रवासी जाणीवपूर्वक निवास करतात.

उन्हाळा असो की पूर्व हिवाळा असो, सिमला प्रवाशांच्या भेटीसाठी आतुर असते. व्यापार व्यवसाय येथे चांगला असल्यामुळे पर्यटन व्यवसाय तेजीत असतो. बाजारपेठ संपन्न आहे. शासनाला या स्थळापासून चांगले उत्पन्न मिळते. सिमला हे सर्व दृष्टीने विकसित पर्यटन केन्द्र आहे. सध्या काश्मीरला जाता येत नाही म्हणून सिमल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या प्रचंड वाढलेली आहे.

प्रत्येक भारतीयाने अभिमानाने पाहावे असे हे पर्यटनकेन्द्र आपल्या गौरवशाली संस्कृतीचा वारसा जतन करणारे आहे. परदेशी प्रवाशी सिमला पाहून त्यावर लुब्ध होतात.

निसर्गाचे लावण्य, त्यांच्या रंग छटा, त्याचे लोभस बदलते आयाम पाहण्यासाठी आणि चैतन्याचे चिरंतनत्व संक्रमित करुन जीवन उजळविण्यासाठी एकदा सिमला पाहायलाच पाहिजे !

* * *

मंदिरांचे शहर - जम्मु !
(जंबु)

हिं दु भाविकांचे श्रध्दास्थान- जम्मु शहर ! जम्मु काश्मीर या दोन शद्बांमुळे ते एकच सौंदर्यस्थळ असावे असे प्रवाश्यांना वाटते. परंतु जम्मु आणि काश्मीर मध्ये मुळात अंतर आहे. काश्मीर पाहण्यासाठी जम्मुला जावेच लागते. जम्मु शहराची एक स्वतंत्र अस्तित्व दाखविणारी शैली आहे. जम्मुला खूप मंदिरे असल्यामुळे 'मंदिरांचे शहर' म्हणून ते ओळखले जाते.

तवी नदीच्या तटावर वसलेले हे शहर ! ऐतिहासिक इमारती, दुर्गम पहाड आणि कलात्मक मंदिरांनी घेरलेले शहर ! येथील हिंदुची गाढ श्रध्दा मंदिरांच्या व्यवस्थापनातून दिसून येते. प्रसिध्द शक्तीपीठ वैष्णोदेवीचे मंदिर येथून २७ मैलावर आहे. याठिकाणी जाण्यासाठी पर्यटकांची जम्मुला गर्दी असते. हजारोंच्या संख्येत प्रवासी येथे येत असतात. काश्मीरला सद्यस्थितीत जाता येत नाही तरी जम्मुला येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येचा ओघ कमी झाला नाही. जम्मुने आपले वैशिष्टय जोपासले आहे. अन्य पर्यटन स्थळांपेक्षा ते यामुळेच वेगळे आहे. देशी व विदेशी पर्यटकांमुळे या पर्यटन स्थळाला उत्पन्न प्राप्ती चांगलीच आहे.

असा इतिहास आहे की येथील राजा जंबुलोअन आपल्या राज्याची नवी राजधानी बनकवण्यासाठी जागेच्या शोधात फिरत होते. शिकारीच्या निमित्ताने ते

येथे आले तेथील एक दृष्य पाहून आश्चर्यचकित झाले. नदीच्या तीरावर एक वाघ आणि एक बकरी एकाच वेळी पाणी पीत होते. सामान्यपणे वाघाने शिकार केली असती पण तसे घडले नाही. या दृश्याने राजा प्रभावीत झाला व त्याने जम्मु हे नामाभिमान देऊन आपली राजधानी धोषित केली.

निवासाची व्यवस्था

जम्मुला निवासाची व्यवस्था चांगली आहे. धर्मशाळा व लॉज माफक दरात उपलब्ध आहे. हॉटेल्सची संख्या चांगलीच आहे. अद्यावत स्वरुपाच्या धर्मशाळेची आवश्यकता आहे. चांगल्या सुखसोयींची व्यवस्था असणारे लॉज सुध्दा आवश्यक आहेत. सोलापूर आणि कोल्हापूर या दोन शहरी अद्यावत सुख सोयींनी सुसज्ज धर्मशाळा आज पर्यटकांना वेगळाच आनंद देऊन जातात. येथील दर अतिशय माफक आहेत. ही बाब सर्व पर्यटनस्थळाच्या व्यवस्थापन मंडळानी विचारात ध्यायला पाहिजे. प्रवासी दूरवरुन प्रवास करीत सौंदर्यस्थळ पाहायला येतात तेंव्हा त्यांना किमान स्वरुपाच्या गरजा उपलब्ध व्हायला पाहिजे. जम्मुला हॉटेल व्यवसाय चांगल्या स्वरुपात सुरु आहे.

हॉटेलचे नाव	पत्ता	फोन नंबर
१) जम्मु अशोका	अमर महलच्या समोर	४३१२७
२) प्रीमियर	वीर मार्ग	४३२३४,४३४३६
३) कासमा हॉटेल	वीर मार्ग	५५२०
४) एशिया जम्मुतावी	नेहरु माकोट	४३९३०
५) कास्मोपोलिटन	वीर मार्ग	४७१६९
६) मानसर	डेनीश गेट	४६१६१

वरील सारणीवरुन हॉटेलची माहिती व फोन नंबर प्रवाशांना निश्चितच उपयुक्त ठरेल. भोजन व्यवस्था हॉटेलमध्ये, उपहारगृहात उपलब्ध आहे. पंजाबी पध्दतीचे भोजन विशेष स्वरुपात मिळते. अन्य प्रकारांची उपलब्धता आहे.

प्रेक्षणीय स्थळे

जम्मुहून वैष्णोदेवी मंदिर पाहण्याकरिता सकाळी डोंगर चढावा लागतो. डोलीची व्यवस्था आहे. **रणवीरेश्वर मंदिर** - परेड ग्राउंड जवळ हे शिवमंदिर आहे. महाराजा रणवीरसिंहजींनी १८८३ मध्ये हे मंदिर उभारले. या मंदिराचे वैशिष्टय असे की येथे १५ पासून ३८ सेंटी मीटरच्या परिघात १२ पारदर्शक शिवलिंग मूर्ती आहेत. भाविकांची येथे सतत गर्दी असते.

श्री रघुनाथ मंदिर - येथील बाजारात हे मंदिर आहे. १८३५ मध्ये राजा गुलाबसिंहने या मंदिराच्या बांधकामास प्रारंभ केला व १८६० मध्ये त्यांचे पुत्र महाराजा रणवीरसिंहने त्यावर कळस चढविला. मंदिराच्या भिंतीवर रामकथा सांगणारे चित्र चित्रित केले आहे. प्रभु रामचंद्राचे एक मंदिर जुन्या मंडीभागात आहे. १८८८ मध्ये ते बांधण्यात आले. या मंदिरात श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या लीला दर्शविणारी भव्य चित्रे चितारली आहेत.

अमरमहल पॅलेस - बाहु किल्ल्याजवळ राजा अमरसिंहने बांधलेला हा राजवाडा आहे. फ्रांसच्या वास्तुकाराने या राजवाडयाचा नकाशा बनवून नंतर तो बांधण्यात आला. आता या ठिकाणी दुर्मिळ चित्रे, नकाशे, पुस्तके ठेवण्यात आली आहेत.

बाहू किल्ला - तवी नदीच्या तीरावर हा प्राचीन काळाची साक्ष देणारा किल्ला आहे. हा केंव्हा बांधण्यात आला यासंबंधी निश्चित अधिकृतता नाही. जाणकार सूत्रानुसार १००० वर्षांपूर्वी हा बांधण्यात आला असावा. बाहूलोचन राजाने हा किल्ला बांधला अशीही माहिती उपलब्ध आहे. त्यामुळेच या किल्ल्याचे नामकरण 'बाहूकिला' असे झाले आहे. मध्यंतरी या किल्ल्याची बरीच पडसड झाली. डोंगर राजांनी किल्ल्याचा जिर्णोध्दार केला. किल्ल्यामध्ये काली देवीचे मंदिर आहे तसेच एक सुंदर बगिचा आहे. आधुनिकतेने तो अधिक आकर्षक करण्याचे प्रयत्न सुरु आहे.

डोंगरा आर्ट गॅलरी - जम्मुला एक सुंदर आर्ट गॅलरी आहे. कलाकारांनी आणि कलेची जाण असणाऱ्यांनी, आवड असणाऱ्यांनी भेट देणे आवश्यक आहे. गांधीभवनामध्ये ही आर्ट गॅलरी सजली आहे. ६००हून अधिक कलाकृतींचा

समावेश यात आहे. दुर्लभ कलाकृतींचे दर्शन येथे घडते. याशिवाय पुरातत्व विभागातर्फे जुने ऐतिहासिक दस्ताऐवज, शस्त्र, व वस्तुंचा संग्रह पाहायला मिळतो.

वाहतूक व्यवस्था

जम्मुसाठी रेल्वेमार्ग दिल्लीहून सर्व प्रमुख शहरांशी जोडलेला आहे. दिल्ली जम्मु मेल, शालीमार एक्सप्रेस, हिमसागर एक्सप्रेस, नवयुग एक्सप्रेस हपाजम्मु एक्सप्रेस, मुंबई जम्मु एक्स्प्रेस, कलकत्यावरुन हिमगिरी एक्स्प्रेस, सियालदह एक्स्प्रेस, गोरखपूर एक्स्प्रेस, जम्मुतावी एक्स्प्रेस, गोहाटीवरुन लोहित एक्स्प्रेस, मद्रास जम्मुतावी एक्स्प्रेस इत्यादी रेलगाडया नियमित जात असतात.

विमान सेवा जम्मुसाठी उपलब्ध आहे. इंडियन एअरलाईन्स आणि वायुदुत विमान सेवा दिल्ली, अमृतसर, चंदीगढ, श्रीनगर याठिकाणाहून जम्मुसाठी उपलब्ध आहे. विदेशी पर्यटक येथे येण्यासाठी विमानसेवा पसंत करतात.

जम्मु काश्मीर शासनाद्वारे बससेवा प्रवांशासाठी तत्पर आहेत. बसने दिल्ली, चंदीगढ, अमृतसर, पठानकोट येथून जम्मुला जाता येते. दिल्ली प्रदेश, हरयाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश परिवहन सेवा बसची व्यवस्था आहे. प्रवासीसंस्था द्वारे आरामदायी बससेवा उपलब्ध आहे. प्रवासी या सेवेचा जास्त आनंद घेतांना आढळतात. शिवाय खाजगी टॅक्सी, मॅटॅडोर, मिनीबस सेवा कार्यरत आहे. शहरांतर्गत या सर्व वाहनांद्वारे प्रेक्षणीय स्थळे पाहता येतात.

जम्मुहून श्रीनगरला जाण्यासाठी सर्व साधने कार्यरत आहेत पण परिस्थिती चांगली नसल्यामुळे श्रीनगरला जाण्याचा सल्ला प्रवाशांना देण्यात येत नाही.

आपल्या प्राचीन पवित्र संकल्पात 'जंबुद्वीप भरतखंडे' असा उल्लेख आहे. येथे आल्यावर त्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाही !

* * *

तपस्विनी गंगेचे

हर्षमय हरिद्वार !

हरिद्वार ! उत्तरप्रदेशातील भाविकांचे एक आनंद निधान !
हर्षमय हरिद्वार !
हरिचे द्वार !
धर्माचे कल्याणमय स्थान !
तपस्विनी गंगेचे खळाळते रुपं दर्शविणारे हरिद्वार !
गंगेची विलोभनीय विविध रुपे आहेत !
प्रत्येक ठिकाणचे रुप आगळे !
हरिद्वारला भक्तिमय प्रासादिकता आहे !
पर्यटकांना ती मनोमन जाणवते !
हरिद्वारला निरांजनातील सात्विकता आहे !
येथील मंदिरांच्या नाद माधुर्यात ती जाणवते !
गंगेचे गंधमयी रुप ! विमल तरंगासारखे !
श्रध्देचे चांदणे टिपणारे !
आणि सुख बरसविणारे !
हरिद्वारला हे जाणवते !
येथील मनोरम दृष्य....
रात्रीच्या सहस्त्रदीपांची मालिका डोळयाचे पारणे फेडते !
श्रध्दावान लाभते ज्ञानं ! ज्ञानाच्या ओंजळीतून
अक्षरामृत पाझरते ते येथेच !

बद्रीनाथ, केदारनाथ, मसूरी, गंगोत्री, यमुनोत्री, ऋषिकेश या विलोभनीय पर्यटन स्थळी जाण्याचे हे पर्यटन स्थळ द्वारच आहे ! हरिद्वारचे पूर्वनांव गंगाद्वार! त्यापूर्वी पौराणिक काळात 'मायापूरी' व त्या अगोदर 'कपिला' असे हरिद्वारचे नामकरण होते. याठिकाणी गंगानदी पहाडातून उतरुन मैदानी भागात वाहती झाली आहे. जणू काही भुमीवर होणारा पदस्पर्शच होय !

हरिद्वार हे गंगानदीच्या किनाऱ्यावर बसलेले शहर होय! येथे गंगेचा प्रवाह जबरदस्त आहे. किनाऱ्याच्या दोन्ही बाजुने स्नानासाठी साखळया लावलेल्या आहेत. साखळी धरुनच स्नान करावे लागते. किनाऱ्यामागील बाजु हिरव्या गार वृक्षलतांनी बहरलेली आहे. गंगेचे हे रुप पाहून मन प्रसन्न होते.

एप्रिल ते जून आणि सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवडया पासून ऑक्टोबर महिन्यात येथे भेट देणे सोयीचे आहे. कारण एप्रिल महिन्यात येथूनच पुढे ऋषिकेश, बद्रीनाथ, केदारनाथला जाण्यासाठी मार्ग आहे. नोव्हेंबर ते फेब्रुवारी कडाक्याची थंडी असते. ज्या पर्यटकांना येथील पावसाळा तसेच हिवाळा कसा आहे व त्यावेळी गंगेचे रुप कसे असते हे अनुभवायचे असेल त्यांनी त्याकाळात अवश्य भेट द्यावी. पावसाळयात धुक्याचे, धुवांधार पाऊसाचे थैमान, आणि गंगेला आलेल्या पुराचे प्रचंड भीषण स्वरुप अनुभवायला मिळते. हिवाळयात थंडीचे घनस्वरुप सोडल्यास अतिशय आल्हादकारकता जोखता येते. पर्यटकांनी मात्र उन्हाळयात भेट देणे योग्य ठरते. उन्हाळयातील उष्म्याची झळ पोहोचते पण पुढील प्रवास चांगला होतो.

वाहन मार्ग

दिल्लीहून हरिद्वारला पोहोचणे हा सर्वात सोयीचा मार्ग आहे. दिल्ली, मुंबई, कलकत्ता, लखनऊ, पाटणा, वाराणसी, अलाहबाद, देहरादून, झांशी, मथुरा, आगरा, नैनीताल, मद्रास, बंगलोर या सर्व स्थानांपासून रेल्वेने येथे पोहोचण्यासाठी सुलभ व्यवस्था आहे.

दिल्लीहून हरिद्वारसाठी बस व्यवस्था आहे. खाजगी प्रवासी बस सेवा उपलब्ध आहे. हरिद्वार, ऋषिकेश दोन दिवसात दाखवून दिल्लीस परत आणतात.

हरिद्वारपासून ३४ किलोमीटर अंतरावर जौलीग्रॉंट या विमानतळावर विमानाने येता येते. दिल्ली आणि लखनऊ येथून विमान सेवा आहे. विमानतळावरुन बस किंवा टॅक्सीने हरिद्वारला येता येते.

निवास प्रबंध

हरिद्वार येथे धर्मशाळा आणि लॉज मोठया प्रमाणावर आहेत पण तेथील व्यवस्था पध्दती चांगती नाही. काही निवडक हॉटेल्स व लॉज मात्र चांगले आदरातिथ्य करतात.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन नंबर
हॉटेल सम्राट	चित्रा सिनेमाजवळ	-
हॉटेल पनामा	जसराम रोड	-
वासुदेव मद्रास	स्टेशन रोड	-
हॉटेल कैलाश	शिवमुर्ती	७८९
हॉटेल गुरुदेव	स्टेशन रोड	१०१
पुरोहित लॉज	हरिकी पौडी	-

(संदर्भ :- उत्तर प्रदेश पर्यटन विकास निगम क्षेत्रीय कार्यालय.)

येथे पर्यटन विभागाचे अधिकृत मार्गदर्शक नाहीत. तशी मार्गदर्शकांची आवश्यकता पडत नाही. पर्यटन विभागाने अधिकृत प्रशिक्षित मार्गदर्शकांची व्यवस्था करायला पाहिजे.

हरि की पौडी

हरिद्वारचे प्रसिध्द आकर्षण म्हणजे हरि की पौडी हा गंगेचा किनारा होय ज्याठिकाणी १२ वर्षनंतर कुंभमेळा व सहा वर्षानंतर अर्धकुंभमेळा भरत असतो. त्यावेळी लक्षावधि लोक या किनाऱ्यावर (गंगेच्या घाटावर) स्नान करीत असतात. येथे सूर्यास्ताचे वेळी लोक द्रोणामध्ये दिवा लावून तो द्रोण गंगेत सोडतात. असंख्य दिव्यांची मालिका मनोरम दिसते. येथे काही जण स्नान करतात, काही गंगेची पूजा करतात, येथे काही गंगेला अर्घ्य अर्पण करतात, काही गंगेची स्तोत्रे गातात तर

काही ध्यान लावून बसलेले असतात. साधू, मुनी जनांची संख्या येथे मोठया प्रमाणावर असते. मंदिरातील पंडे लोकांना गंधांचे टिळे लावतात, तसे येथील वातावरण भाविक स्वरुपाचे आहे.

थोडया फार प्रमाणात पंडयांकडून फसवणूकही होते. प्रवाश्यांनी त्याबाबतीत सावध राहायला पाहिजे. पोलीस बंदोबस्त चांगला असतो. गंगेच्या दोन्ही किनाऱ्यावर फळे, फुले, पुजेचे सामान,किराणा दुकाने व हॉटेल्सची गर्दी आहे. लोकांचीही दोन्ही बाजूने गर्दी असते.

गंगेचे पाणी दूपित होऊ नये म्हणून रोज गंगेत दूध समर्पित केले जाते.

मनसा देवी मंदिर

पर्यटन कार्यालयापासून तीन किलोमीटर अंतरावर उंचीवर विष्णुनामक पर्वतावर हे मंदिर आहे. गोल वर्तुळाकार चढण आहे. येथे पोहोचण्यासाठी रोपवे ट्रॉली आहे. प्रवाशांची गर्दी फार असते त्यामुळे मंदिर जाऊन यायला पाच तास लागतात. रतनं टॉकीज पासून ट्रॉलीने सकाळी ८ ते १२ व दुपारी २ ते६ प्रवास करता येतो. ट्रॉलीतून गंगेचे दर्शन व सभोवतीचे दृष्य अतिशय सुंदर दिसते. जातांना पायी जाऊन येतांना ट्रॉलीने परतणे जास्त सुलभ होईल. मनसा देवीचे मंदिर चांगले आहे. भाविक पूजापाठ करतात. मंदिराचे ठिकाणाहून सभोवतीचे हिरवेकंच दृष्य आल्हाददायक आहे. ज्यांना पूजा करायची नसेल त्यांनी आपण हरिद्वारचेच आहोत असे सांगावे म्हणजे जास्त पैसे देण्याचा त्रास होत नाही. ट्रस्टजवळ पूजेचे ठराविक पैसे दिल्यास यथोचित पूजा होते.

भीमगौडा तलाव

हरिद्वारपासून अडीच किलोमीटर अंतरावर हा सुरम्य तलाव आहे. बाग बगिचे आहे. नैसर्गिक वृक्षसंपदा विपुल आहे. हिमालय पर्वताकडे जाण्याचा मार्ग येथून प्रारंभ होतो. प्राचीन काळी भीमाचे येथे वास्तव्य होते असे मार्गदर्शक सांगतो. या संबंधीची अधिकृत माहिती उपलब्ध नाही.

भीमगौडा कॅनॉल

शताब्दी पुलापासून सामान्यपणे दीड कि.मी. अंतरावर गंगेने आपला प्रवाह बदलला आहे. पहाडातून येणारी गंगा दिसते. अडवलेला प्रवाह व पुन्हा वाहता प्रवाह अशी गंगेच्या प्रवाहाची वेगवेगळी रुपे येथे पाहायला मिळतात.

सप्तर्षी आश्रम

सहा किलोमीटर अंतरावर सप्तर्षी आश्रम आहे. निसर्ग सौंदर्याने नटलेला हा परिसर, येथील आरशाचे मंदिर, गंगेच्या सात वाहत्या धारा, हे सर्व दृष्य प्रवाशांना आकर्षित करते. गंगेच्या सातही धारा पावसाळयात दिसतात अन्यवेळी दोन धारा वेगवेगळया स्वरुपात पाहायला मिळतात.

चंडीदेवी मंदिर

गंगा नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावरील नील पर्वतावर हे मंदिर आहे. गौरीशंकर, अंजनादेवी मंदिर येथेच आहेत. येथून तीन किलोमीटर पुढे गेल्यावर हिमालय पर्वतशृंखलेचे सुंदर दृष्य दिसते. त्यामुळे पुढील प्रवास केलाच पाहिजे असे प्रवाशांना वाटते.

याशिवाय गुरुकुल कांगडी विद्यापीठ, स्वामी श्रध्दानंद यांनी स्थापन केलेले शैक्षणिक प्रतिष्ठान, वेदमंदिर सग्रहालय एकदा भेट देण्या योग्य आहेत.

हरिद्वार नगर औद्योगिक दृष्टया विकसित होत आहे त्याचा परिणाम जाणवतो. नगराची जुनी संस्कृती हळुहळु कमी कमी होत असून नव्या आधुनिक वातावरणाचा पगडा लोकजीवनावर पडत चालल्याचे दिसून येते.

उत्तर प्रदेश पर्यटन विकास निगमाने मात्र प्रवाशांच्या सोयीसाठी अनेकविध सुधारणा केल्या आहेत आणि त्या प्रशंसनीय आहेत. प्रवाशांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले आहे. प्रसाधनगृहे अत्यंत स्वच्छ आणि भरपूर संख्येत बांधण्यात आली आहेत. स्वच्छ आणि शुध्द वातावरण निर्मिती करण्यात आणि कायम ठेवण्यात ते यशस्वी झालेत.

भाविकांना मन प्रसन्न करणारे हरिद्वार प्रवाशांना हर्षमय भासते यात शंकाच नाही.

* * *

रमणीय ऋषिकेश !

ऋषिकेश ! रमणीय ! स्वस्तिप्रद सौंदर्यस्थळ ! ऋषिकेशला निसर्गाने एक शुचिर्भूत आभा तयार केली आहे. हिरवेगार वृक्षराजींनी सामावून घेतलेले आणि पर्वतराजीं मध्ये विसावलेले एक धार्मिक पर्यटन स्थळ ! वास्तव्य करण्याचे प्रशांत, प्रफुल्लित ठिकाण ! हिमालयातून गंगावतरण येथेच्र झाले आहे. गंगाजलाचा पृथ्वीशी होणारा नादमय आणि स्पर्शमय संवाद सृष्टी टिपत राहते !

समुद्रसपाटीपासून ३६५ मीटर उंचीवर वसलेले ऋषिकेश गंगानदीच्या किनाऱ्यावरील असे एक सुंदर स्थान ज्या ठिकाणी प्राचीन काळापासून ऋचा तयार केल्या गेल्या, गायल्या गेल्यात ! चिंतनाची किनार लाभलेले हे एक निसर्गाचे प्रतिभासंपन्न स्थान ! ज्या ठिकाणी प्रतिभा निर्माण होते, फुलते, विकसित होते असे ऋषिकेश! एक लहानसे नगर ! तिन्ही बाजूने हिमालयाचे पहाड आहेत ! हिमालयाचे दर्शन येथेच होते गंगेचे लहान स्वरुप थोडयाच अंतरावर आकार घेते ते येथेच !

येथे कोणत्याही महिन्यात भेट देणे सोयीस्कर आहे. हिवाळयातील थंड वातावरण ज्यांना मानवते आणि आवडते त्यांनीच हिवाळयात भेट द्यावी व सृष्टीचे राभस स्वरुप अनुभवावे.

वाहन व्यवस्था

दिल्ली हे येथे येण्यासाठी प्रमुख शहर समजावे. तसे हरिद्वारहून येथे येता येते. रेल्वेने येण्याची व्यवस्था आहे. देहराडून येथून रेल्वे आणि बस मार्गाने ऋषिकेशला पोहोचता येते. दिल्लीवरुन खाजगी प्रवासी संस्थांच्या अरामदायी बसने येथे येणे सोयीचे ठरते.

वायूमार्गाने जवळचे विमानतळ देहरादून येथून सोळा किलोमीटर अंतरावर आहे. विमानाने तेथे उतरुन टॅक्सी किंवा बसने हरिद्वार, ऋषिकेशला पोहोचता येते.

निवासाची सोय

ऋषिकेश येथे निवास करणे ही प्रवाशांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची बाब असते. येथील शांत, निर्मळ आणि प्रसन्न वातावरण आपल्याला थांबायला भाग पाडते. या स्थळाला आध्यात्मिक चैतन्याचा स्पर्श आहे. तो जाणवतो. येथे अनेक साधुजन आश्रमस्वरुप झोपडीत वर्षानुवर्ष राहतात. सामान्यजन देखिल पंधरा दिवस, महिन्यांपासून वर्षभर येथे राहिले आहेत आणि राहात आहे. प्रत्येकाचा उद्देश निराळा आहे. अनेकजण आध्यात्मिक साधना करण्यासाठी येथे वास्तव्य करतात. येथे मठ आहेत. आश्रम आहेत, मंदिरे आहेत, धर्मशाळा आहेत, वेदशाळा आहेत, आध्यात्म दर्शन घडविणारे शिबिरे आहेत, चैतन्य मिशन, चिन्मयानन्द मिशन, गायत्री जप साधना मिशन - येथे कार्यरत आहेत.

प्रवाशांसाठी उत्तरप्रदेश पर्यटन विकास निगमा तर्फे विश्रांतीगृह, अतिथी गृह, अतिथिकक्ष, होस्टेल, इत्यादी व्यवस्था उपलब्ध आहेत. खाजगी धर्मशाळा व लॉज आहेत. हॉटेल्सही भरपूर संख्येत आहेत. खर्चाच्या अंदाजानुसार प्रवाश्यांनी व्यवस्था पाहावी. ज्यांना राहायचे नसेल त्यांचे साठी ऋषिकेश येथे पर्यटन विभागाने अतिथी कक्षात प्रसाधन गृहांची स्वच्छ आणि संपन्न स्वरुपात व्यवस्था केली आहे. नळाचे पाणी, स्नानगृहे मोठया संख्येत आहेत. हॉटेल्सची माहिती खालील प्रमाणे आहे.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन नंबर
तपोवन हॉटेल	लक्ष्मण झुला	२१२
हॉटेल लक्ष्मणझुला	लक्ष्मण झुला	४४२ \ २८९
टुरिस ट्रॅव्हर्स होम	देहरादून रोड	
बसेरा हॉटेल	घाटरोड	७७६ \ ७२०
फॉरेस्ट रेस्ट हाऊस	कैलास गेट	
गिरनार हॉटेल	१५४, आशुतोष नगर	१०७६
इंद्रलोक हॉटेल	रेल्वे रोड	५५१
होटल कैलाश	कैलाश गेट	१००६
मंदाकिनी इंटरनॅशनल	६३, हरिद्वार रोड	७८१ \ १०८१
		१२८१
होटल नटराज	देहरादून रोड	१०९९\१२७२
न्यु टुरिस्ट लॉज	रेल्वे स्टेशनजवळ	

ऋपिकेश येथे पर्यटन विभागातर्फे मार्गदर्शक आहेत. स्टेशन पासून लक्ष्मणझुला पर्यंत पोहोचण्यासाठी माठया संख्येत टॅक्सी, टांगे, आटोरिक्क्षा, बस व्यवस्था, मेटॅडोर व मोठी बसगाडीची व्यवस्था आहे. ते लक्ष्मणझुलापर्यंत पोहोचवून देतात. झुल्याच्या पुलावरुन पलिकडच्या तीरावर गेल्यावर पायी भ्रमंती केल्यास निसर्गदर्शनाचा आंनद लूटता येतो. ज्यांना ते शक्य नाही त्यांचेसाठी तेथून स्वर्गाश्रमपर्यंत टॅक्सीची व्यवस्था आहे. स्वर्गाश्रमापासून बोटीने किंवा शिवानंद झुला पुलावरुन ऋपिकेशच्या पूर्व किनाऱ्यावर येता येते. खाजगी बस सेवा असल्यास हा प्रश्न उद्‌भवत नाही.

लक्ष्मणझुला व अन्य ठिकाणी छायाचित्रकार मोठया संख्येत छायाचित्र काढण्यासाठी उपस्थित असतात त्यामुळे प्रवासी आपले छायाचित्र काढून घेतात. फक्त छायाचित्रकाराचा अधिकृत क्रमांक, फोटो स्टुडिओचा पत्ता, नांव याची प्रवाशांनी आपल्याजवळ नोंद ठेवावी म्हणजे फसवणूक होणार नाही.

हॉटेल्स सोबत उपहारगृहे आहेत त्यामुळे प्रवाशांची भोजनतृष्णा सहज आणि स्वस्त दरात भागविल्या जाऊ शकते.

ऋषिकेश नगरात बाजारपेठ, बँका, फोटो स्टुडिओ, पर्यटनविभाग, पेट्रोलपंप, दुकाने इत्यादी सर्व व्यवस्था असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत नाही. मनोरंजनासाठी सिनेमागृहे, व्हीडीओपार्लर्सची सोय शहरात आहे.

सुप्रसिध्द लक्ष्मण झुला

ऋषिकेश देशातील पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते ते प्रसिध्द असलेल्या लक्ष्मण झुल्यामुळे !

हे येथील विशेष आकर्षण आहे. लक्ष्मण झुल्याचे नांव जगभर प्रसिध्द आहे. झुला म्हणजे हलणारा ! हलणारा पुल ! नेहमीच्या पध्दतीचा हा पुल नसून तो दोन्ही बाजुंनी लोखंडी भक्कम आधारावर मोठया दोरखंडाने बांधलेला आहे. त्यामुळे पुलावरुन लोक जाऊ लागले की तो हलु लागतो. अर्थात् पाळण्यासारख्या गतीने हालत नाही ! पण असा एक वैशिष्टयपूर्ण पुल हेच सर्वांना आश्चर्य आणि आनंद देणारे वाटते ! १५० मीटर उंचीवर हे ठिकाण आहे. गंगा नदी पुलाखालून झुळझुळ वाहतेय ! पर्वतांच्या हिरव्या रांगा सर्वांचे लक्ष वेधुन घेतात ! गंगेचे येथील पाणी पांढरे शुभ्र आहे !

शिवानंद झुला

लक्ष्मण झुल्याच्या शैलीवर आधारित दुसरा हलणारा पुल स्वामी शिवानंदांच्या प्रेरणेने स्वर्गाश्रमाच्या पलिकडे, लक्ष्मण झुल्यापासून तीन कि.मी. अंतरावर बांधण्यात आला आहे. यामुळे स्वर्गाश्रमाकडून गंगेच्या पुलावरुन ऋषिकेशला येता येते. येथे गंगेचा प्रवाह आकाराने मोठा आहे आणि पूर्वी दिसलेल्या गंगेचे हे खळखळते रुप आहे. ऋषिकेशला गंगानदीची ही दोन वेगवेगळी रुपे पाहायला मिळतात.

स्वर्गाश्रम

ऋषिकेशचे सृष्टी सौंदर्य टिपण्याचे कार्य स्वर्गाश्रमाने केले आहे. गंगेच्या पलिकडच्या किनाऱ्यावर लक्ष्मणझुला पासून २ कि.मी. अंतरावरील परिसराला

स्वर्गश्रम म्हणण्यात येते. येथे साधुंचे मठ, मंदिरे व आश्रम आहेत. वृक्षराजीने हा परिसर संपन्न आहे. गंगेच्या सान्निध्यामुळे एक विलक्षण प्रसन्नता आणि नीरव शांतता येथे जाणवते. आध्यात्मिक साधनेसाठी येथे अनेक मठाधिपती, मंदिराचे प्रमुख, साधुजन वास्तव्य करुन असतात.

नरेन्द्रनगर

सोळा किलोमीटर अंतरावर एक राजमहल आहे त्या परिसराला नरेन्द्रनगर म्हणतात. येथून सूर्यास्त चांगला दिसतो.

याशिवाय गीताभवन, भारतमंदिर, पुष्कर मंदिर, रघुनाथ मंदिर, ऋषिकुंड, त्रिवेणी घाट, शिवानंद आश्रम, बैराज पशुलोक ही सर्व स्थाने पाहण्या योग्य आहेत. मंदिरांना अवश्य भेटी द्याव्यात. येथील मंदिरांनी शिल्पकलेचे आणि भक्तिलावण्याचे एक वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण केले आहे. एका मंदिराला सात मजले असून सर्व प्रकारच्या देवांच्या मूर्ती, अष्टदिक्पाल, ग्रहमंडल, नक्षत्रमंडल - मूर्ती स्वरुपात पाह्यला मिळते.

आश्रमामध्ये आध्यात्मावर प्रवचन ऐकायला मिळते. एरवी मुद्दाम वेळ काढून वेदवाङ्मय, प्राचीन वाङ्मय व त्यावरील भाष्य ऐकायला जाणे सर्वांना जमत नाही ते येथे आपोआप साधते. येथील परिसराला ऋषींच्या तपस्येचा स्पर्श आहे ! त्यामुळे प्रवचनातील सार जीवनाला मार्गदर्शक ठरते आणि प्रसन्न मनांची पाऊले पुढील उत्तरखंडाचा प्रवास करायला आतुर होतात !

* * *

कर्पूरगौर केदारनाथ !

हि मालयाचे सृष्टी लावण्य म्हणजे केदारनाथ ! आणि बद्रीनाथ ! एका अपूर्व सौंदर्याची लयलूट ! उंचीवरील हिम शिखरे, खळाळत प्रवाहित होणारी अलकनंदा, मंदाकिनी नदीचे शांत पात्र, एका बाजुला पर्वत आणि दुसऱ्या बाजुस अत्यंत खोलवर भीषण दरी, फळांची आणि सुगंधित फुलांची घाटी ! अप्रतिम ! केवळ विलोभनीय !

लावण्याचे प्रकार आहेत ! सृष्टीचे भावलावण्य जर अनुभवायचे असेल तर उत्तरखंडाचा प्रवास करावाच लागेल म्हणजे केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री, यमुनोत्री, कर्णप्रयाग, पंचप्रयाग, पंचकेदार हा सर्व मनोहारी प्रवास ! एक विलक्षण चैतन्यस्वरुप दर्शविणारा ! सृष्टीची मोहक पखरण दाखविणारा ! प्राचीन गौरवशाली संस्कृतीचा वारसा सांगणारा ! येथेच तपस्वींचे वास्तव्य होते ! कुमाऊं प्रदेश संपून गढवालचा उत्तरखंडाचा प्रवासाचा प्रारंभ ! गढवाल म्हणजे ऋषीची तपोभूमी, कर्मभूमी आणि आनंद देणारी देवभूमी ! पूर्वेला कुमाऊं पश्चिमेला हिमाचलप्रदेश, उत्तरेला बदरीनाथ तर दक्षिणेला शिवलीक अशा सीमारेषा आहेत ! मध्यमहेश्वर, तुंगनाथ, कल्पेश्वर, रुद्रनाथ, केदारनाथ - असे पंचकेदार येथीलच ! नंदादेवी, दुनागिरी, त्रिशुल, नीलकंठ, केदार आणि प्रभात हे पर्वतही येथीलच ! अलकनंदा, धौलीगंगा, मंदाकिनी, पिंडार, नंदाकिनी, भागिरथी, विष्णुगंगा या सप्त नद्या गंगेच्याच सात पवित्र धारा ! येथीलच ! देहरादून, तेहरी गढवाल, पौरी गढवाल, चमोरी, उत्तरकाशी असा पाच जिल्हयांचा गढवाल !

उंच उंच पहाड, वळणाकार रस्ते, आणि बाजुने वाहणारी अलकनंदा ! सर्व दृष्य रोमांचकारी ! निसर्गाचा अद्‌भूत कॅन्व्हास पहाता होतो ! त्यांचे नितांत सुंदर, रंग आणि मोहक छटा पहात होतो ! प्रवास सुरु होता !

प्रवासी संस्था - एक उत्तम माध्यम

केदारनाथ, बद्रीनाथ असा प्रवास करायचा म्हणजे सर्व प्रकारची सुव्यवस्था हवीच ! यादृष्टीने प्रवासी संस्था चांगल्या प्रकारे प्रवासाचे नियोजन करतात आणि प्रवास सुखावह होतो. मुंबईचे राजा, राणी, राजकुमार ट्रॅव्हल्स कंपनी, भारत दर्शन, अजित ट्रॅव्हल्स, हिमालयन ट्रॅव्हल्स, योजना ट्रॅव्हल्स अशा प्रवासी संस्था आहेत त्यांच्या व्यवस्थेची खात्री करुनच पर्यटकांनी हा मार्ग निवडावा. नागपूरला प्रकाश टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स, सन्मित्र प्रवासी मंडळ - बडकस चौक, लक्ष्मी ट्रॅव्हल्स, यशःश्री ट्रॅव्हल्स, श्री साईकृपा ट्रॅव्हल्स या पाच प्रवासी संस्थानी उत्तम प्रकारचे प्रवास नियोजन आणि व्यवस्था करुन लोकांना विविध पर्यटन स्थळांचे दर्शन घडवून आणले.

स्वतंत्रपणे प्रवासाला निघालो तर ऋषिकेशपर्यंत आपल्याला कोणत्याही मार्गाने यावे लागते. ऋषिकेश, मसुरी, नैनीताल येथुन बसमार्गानेच गौरीकुंडापर्यंत पोहोचता येते. सकाळी प्रवासास निघणे श्रेयस्कर ! ज्यांना बसचा त्रास होतो त्यांनी सोबत गोळ्या अवश्य घ्याव्यात कारण हा आणि बदरीनाथचा प्रवास केवळ बसनेच करावा लागतो. प्रारंभी घाट चढायला लागल्याबरोबर आपण सुखरुप जाऊ किंवा नाही याची धास्ती वाटते पण बस मध्ये चालकासह सर्वजण केदारनाथ महाराज की जय ! जय बद्रीकेश्वर ! जय ईश्वर ! अशा जयघोषाचे एक वेगळेच वातावरण तयार करतात व मनातील भिती आपोआप गळून पडते.

पर्वतांच्या रांगाच रांगा आणि वर्तुळाकार बसप्रवास सुरु होतो. हिरवीकंच वृक्षराजी, मोठे मोठे पर्वत आणि दुसऱ्या बाजुने गंगेचा प्रवाह दिसतो. ते झुळझुळणारे पाणी पाहून मन मोहित होते. प्रथम गढवाल जिल्हयातील एक लहानसे गांव श्रीनगर येते तेथून चौतीस किलोमीटर अंतर कापल्यावर रुद्रप्रयाग येते. तेथे विश्रांती घेऊन केदारनाथ करिता जाण्याचे मार्गावर निलबाडा, सोनप्रयागला आपण पोहोचतो. हे प्रत्येक ठिकाण पाहण्यासारखे आहे. सुंदर आहे.

निरीक्षण करण्यासारखे आहे. थोडा हलकासा उपहार करावा. (जास्त उपहार करणे त्रासदायक ठरते.) सोनप्रयागहून बारा किलोमीटर अंतरावरील गौरीकुंड येथे पोहोचलो त्यावेळी सायंकाळचे ६ वाजलेले होते. म्हणजे ऋषिकेश ते गौरीकुंड हा प्रवास अकरा तासांचा आहे. गौरीकुंड येथील दृष्य अत्यंत मनोरम आहे. सभोवती उंच आणि भव्य वनश्रीसह सज्ज असलेले पर्वत, मंदाकिनी नदीच्या पाण्याचा जबरदस्त घनदाट आवाज प्रवाहित होत होता. सायंकाळी थंडी अतिशय जाणवते. मंदाकिनी नदीचे पाणी अत्यंत थंडगार !(फ्रीजसारखे) पण वातावरण पाहून प्रवासाचा क्षीण तर जातोच परंतु देहभान विसरुन निसर्गाचे निर्मळ रुप डोळयात साठवण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत होता !

गौरीकुंडला निवास व्यवस्था खालील प्रमाणे आहे !

दीपक लॉज

सुनील लॉज

मंदिर कमेटी यात्री निवास

निरीक्षणभवन, उरवीमठ

धर्मशाळा

या व्यतिरिक्त धर्मशाळा आणि यात्री निवासांची संख्या भरपूर आहे पण लॉजची व्यवस्था एकदम चांगली आहे. धर्मशाळामध्ये साधारण व्यवस्था आहे. लॉजचे भाडे प्रती दिवस १०० रु. तर भोजनासाठी शाकाहारीचे १० ते २० रु. प्रती पडतात. याशिवाय दर अन्य ठिकाणी कमी अधिक आहेत.

गौरीकुंड ते केदारनाथ !

रात्रीचा निवास गौरीकुंडला करुन सकाळी तेथील गरमपाण्याने स्नान करुन केदारनाथला निघालो. गौरीकुंड हे लहानसे खेडे आहे व तेथे गरम पाण्याचे १०' x १२'चे दोन कुंड आहेत. पाणी सतत गरम असते कारण गरम पाण्याचे झरे आहेत. भाविकांना ते आश्चर्य वाटते. गंधकामुळे पाणी सतत गरम राहते. अन्य बाजुला सर्वत्र अती थंड असतांना (उन्हाळयातील एप्रिल मे जून) गरमपाणी पाहायला आणि

स्नानासाठी मिळते ही बाब त्याठिकाणी, त्यावेळी अतिशय अपूर्वाईची वाटते. सर्व प्रवासी गौरीकुंडावर स्नान करतात. एक विशेष तरतरी जाणवते.

केदारनाथ, बद्रीनाथ येथे येण्यासाठी एप्रिल, मे आणि जून हे तीन महिने योग्य आहेत कारण या काळात कमी थंडी आणि हिमपात होत नाही. येथील पाऊस जूनच्या २५ किंवा जुलैच्या पहिल्या आठवडयात सुरु होतो. मध्येच पाऊस आल्यास थांबून राहावे लागते. ऊन पावसाचा खेळ येथे जून मध्यानंतर सुरु होतो त्यामुळे काही ठिकाणं पाहणे राहून जाते. एखादा मार्ग बंद होऊ शकतो. सप्टेंबर ऑक्टोंबर महिन्यात काही प्रवासी भेट देतात पण हिमपात नसल्यास तो काळ सुसहय होतो. नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च हे पाच महिने येथील वाहतूक पूर्णपणे बंद असते.

येथील रस्ते अतिशय अरुंद आहेत. एका बाजुने पर्वत तर दुसरीकडे दरी अशा वाटेवरुन बस हळुहळु पुढे जाते. समोरुन दुसरी बस आल्यास अतिशय कौशल्याने दोन बस सुताच्या रेषेच्या अंतरावरुन सरकतात तेंव्हा जीवाचा थरकांप होतो. सकाळी ७ ते सांय. ६ पर्यंत बसचे जाणे येणे असते रात्री बसप्रवास बंद असतो यावरुन येथील रोमांचकारी परिस्थितीची जाणीव येईल.

गौरीकुंड ते केदारनाथ चौदा किलोमीटरचा रस्ता पायी, घोडयावरुन, डोली किंवा कंडीने करावा लागतो. हौस म्हणून थोडे अंतर पायी जावे कारण पुढे लगेच थकवा जाणवतो. एका माणसाचे घोडयावरुन जाणे येणे २०० रु. लागतात. कंडी म्हणजे तेथील माणसाचे पाठीवर बसून जाणे त्यासाठी लहान मुलांकरिता जाणे येणे १२५ रु. तर मोठयांसाठी २५० रु. पडतात. डोली म्हणजे चारजण पालखीसारखे बसवून नेतात त्यासाठी ४०० रु. जाणे येणे धरुन द्यावे लागतात. (दरामध्ये परिस्थितीनुरुप बदल गृहीत धरावे)

सकाळी साडेसहा वाजता घोडयावरुन आम्ही केदारनाथकडे निघालो. घोडयावरुन किंवा डोलीतून जाणे श्रेयस्कर ! हा प्रवास विशेष स्वरुपात जाणवतो. पर्वतराजींमधून वळण घेत बाजुच्या दरीतून मंदाकिनीचा प्रवाह वहात असतो. हिरवा,पोपटी, काळसर हिरवा अशा रंगांची उधळण करीत असलेले वृक्ष दिसतात. निसर्गाचे सतत बदलत जाणारे रुप, थोडे ऊन, थोडे ढगाळ वातावरण बघत बघत मार्गक्रमण सुरु असते. येथील सृष्टीचे प्राण लावण्य अतिशय भावते !

आपली दृष्टी किती लहान आहे याची जाणीव होते ! निसर्गाच्या चैतन्यशाली सामर्थ्याचे, स्वरुपाचे दर्शन होते !

सात किलोमीटर अंतरावर रामवाढा या खेडयात थोडी विश्रांती घेऊन पुढे निघालो. येथे खाद्यपदार्थ मिळतात. भूक लागली तरी मर्यादा ठेवणे योग्य असते. हळुहळु पुढे जाता जाता हिमालयाचे पांढरे हिमरुप, चमकतांना दिसते. केदारनाथाचे मंदिराजवळ आलो की, अतिशय धन्यता वाटते !

केदारनाथ मंदिर

पुलावरुन मंदिराकडे आलो. मुख्यद्वारावर श्रीगणेशाची आणि आतील भिंतीवर कुंती, पाच पांडव आणि द्रौपदीची मुर्ती शिल्पांकित आहे. मंदिरात बर्फाचे गोलाकार स्वरुपचिन्ह आहे. प्रत्यक्षात शिवलिंग नाही तसेच शिवाची मूर्ती नाही. हे मंदिर पांडवांनी बांधले पुढे श्रीमद् आद्यशंकराचार्य यांनी त्याचे स्वरुप व्यवस्थित केले असे सांगण्यात आले. आद्य शंकराचार्यांचे समाधीस्थळ मंदिराचे मागे आहे. मंदिराच्या आवारात पार्वती, लक्ष्मीच्या मूर्ती आहेत. हंसकुंड, अमृतकुंड, रेतकुंड आहेत. पितरांना मुक्ती मिळण्यासाठी तेथे श्राध्द करतात. श्री केदारनाथ हे ज्योतिर्लिंग आहे त्यामुळे भाविक येथे मनोमन पूजा करतात. बारा कल्याण सिध्दप्रद ज्योर्तिलिंगापैकी हे स्वयंभू ईश्वर स्थान आहे.

केदारनाथ येथे निवासाची व्यवस्था आहे.

मंदिर यात्री निवास
भारत सेवाश्रम संघ निवासस्थान
भजन आश्रम
नेपाल भवन
हॉटेल हिमलोक
बिरला गेस्ट हाऊस
जे. के. हाऊस
गुजराथ भवन

वरील स्थानी निवास व भोजनाची व्यवस्था चांगली आहे.

मंदाकिनी घाटी

केदारनाथला ज्या मनोमन भावणाऱ्या बाबींचा उल्लेख करावा लागेल त्यात प्राचीन ऋषी मुनींच्या तपस्येची साक्षीदार असलेली मंदाकिनी घाटीचा समावेश होतो. मंदिराचे सभोवतीचे दृष्य मोहक आहे.

पंचगंगा :- केदारनाथ मंदिराच्या जवळील पर्वतातून उतरत येणाऱ्या सरस्वती, मधुगंगा, स्वर्गद्वारी आणि क्षीरगंगा या चार नद्या मंदाकिनी नदीस येऊन मिळतात. हा पंचगंगा संगम विलक्षण खळाळता आहे. त्याचा आवाज जबरदस्त आहे. संगमाचे असे पर्वतावरील दृष्य स्थिती समर्पणाचा संस्कृतीचे प्रतीक आहे.

वासुकीताल :- केदारनाथपासून आठ किलोमीटर अंतरावर एक जलाशय आहे. त्याचे नाव वासुकीताल ! या जलाशयातील जलधारांना वासुकीगंगा, सोनगंगा असे म्हणतात. येथे जाण्यासाठी फार कष्ट पडतात पण हे स्थान पाहिल्यावर माणूस कष्ट विसरुन जातो !

याशिवाय गुप्तकाशी, भीमगुंफा, मधुगंगा, क्षीरगंगा, स्नोव्हयू, उदयकुंड, गांधी सरोवार ही सर्व ठिकाणे अत्यंत प्रेक्षणीय आहेत पण जाणे तेवढेच अवघड आहे!

केदारनाथाचे अपूर्व सौंदर्य मनोमन साठवित पुन्हा गौरीकुंडापाशी आलो व तेथून वेध लागले बद्रीनाथच्या दर्शनाचे !

* * *

बद्रीनाथ !

बद्रीनाथ ! नगाधिराजांचा मुकुट ! हिमालयाचा रुपेरी कळस ! योगीजनांना गवसलेला सृष्टीचा आत्म स्वर ! सृष्टीच्या संपन्नतेचे शुचिर्भूत स्वरुप ! सृष्टीचे रुप लावण्य ! मोहमयी ! मधुरम् ! मगंलमय! आणि मनोरम !

बद्रीनाथ हे समुद्रसपाटीपासून १०,३८० फुट उंचीवरील नर आणि नारायण पर्वतांच्या मध्ये अलकनंदा आणि ऋषिगंगा नद्यांच्या संगमाचे ठिकाणी स्थित आणि सिध्द झालेले स्थळ ! आपल्या प्राचीन वैभवशाली आणि गौरवशाली, प्रज्ञासंपन्न परंपरा आणि संस्कृती वारशाचा साक्षीभूत असलेले एक लोभस पर्यटन स्थळ ! भाविकांचे कैवल्यधाम ! पृथ्वीचा मानदंड ! हिमालयाची शिखरे आपल्याला गुणांची उंची किती असावीत ते दाखवितात ! त्यातील सरोवरे, अंतःकरणात सृजनशील ओलावा किती असावा, ते दाखवितात ! आणि त्याच सरोवरातील कमलपुष्पे, सूर्यकिरण पडता क्षणीच सुगंधीत टवटवीतपणा कसा असतो, ते दाखवितात !

सृष्टीला आंनदसुखाचे स्नान मेघ घालतात ते याच ठिकाणी ! त्यातून फुलतात विपुल वृक्षराजी ! त्यात पाहायला मिळतो बहुमोल औषधी वनस्पतींचा आगर !

येथील वारा कसा मंद, शीतल, मोहक सुगंधी ! भान हरपून टाकणारा ! कधी कोरडा तर कधी तुषारात भिजलेला !

बदरी म्हणजे बादल म्हणजे मेघ ! मेघांची छाया म्हणून बदरीवन ! या मेघांच्या कडा सूर्याच्या तेजाने रंगतात, कधी सोनेरी रुप ! तर कधी रुपेरी रुप !

ही विलोभनीय रुपे न्याहाळित केदारनाथपासून बद्रीनाथकडे प्रवास सुरु झाला.

एप्रिल मध्यापासून जून पर्यंत आणि सप्टेंबर व ऑक्टोंबर हाच येथे भेट देण्याचा योग्य कालावधि आहे. जुलै, ऑगस्ट मध्ये खूप पाऊस तर नोव्हेंबरपासून हिमपात मोठया प्रमाणावर होतो व वाहतूक बंद पडते. एप्रिल मे आणि जून हेच तीन महिने प्रवासासाठी आनंददायी आहेत.

बद्रीनाथ येथे येण्यासाठी बसचा प्रवास सर्वोत्तम ! येथे रेल्वे किंवा वायुमार्गाने थेट जाता येत नाही. रेल्वे मार्गाने दिल्लीहून ऋषिकेश पर्यंत येता येते. सहाराणपूर, ऋषिकेश, कोटाद्वार, हरिद्वार येथून बद्रीनाथसाठी नियमित बस व्यवस्था आहे. त्यांच्या खास बस मधूनच जावे लागते कारण येथील कुशल ड्रायव्हर हा खडतर मार्ग पार करुन परत ऋषिकेशला आणून सोडतात अन्य ड्रायव्हर बस चालवू शकत नाहीत. रेल्वेने कोटद्वार पर्यंतच जाता येते. बहुतांश प्रवासी खाजगी प्रवासी संस्थांच्या बसने आलेले असतात.

पंचप्रयाग

केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री, यमुनोत्री या प्रवासात प्रथम केदारनाथ येथेच जावे तेथून बद्रीनाथचा प्रवास सुरु होतो. पहिल्यांदा **कर्णप्रयाग** हे लहानसे गांव लागते. तेथे बसस्टँड आहे. अलकनंदा आणि पिंडार या नद्यांचा संगम येथे पाहायला मिळतो. कर्णमंदिर पाहतांना महाभारताचा इतिहास डोळयासमोर येतो. तेजस्वी सूर्यपुत्र याच संगमाचे ठिकाणी उभे राहून अर्ध्यप्रदान करीत असे ! शकुंतला आणि दुष्यंत राजाची प्रथमभेट येथेच झाली ! मीलनाची साक्ष देणारा एक सुंदर संगम म्हणून कर्णप्रयाग सर्वांच्या लक्षात राहतो.

कर्णप्रयागपासून जोशीमठ ८१ कि.मी. अंतरावर आहे. बसचा ड्रायव्हर अतिशय कुशलतेने अरुंद व सरळ चढण असलेले रस्ते पार करीत होता. मन कुतुहलाने सर्वक्षण टिपत होते. वाटेत साधु, मुनी, संत, बैरागी, तपस्वी पायी जातांना

दिसत होते. त्यांच्या चेहऱ्यावर तपस्येचे तेज होते ! एक आध्यात्मिक निर्धार दिसत होता !

बस **नंदप्रयागला** पोहोचली ! येथे मंदाकिनी आणि अलकनंदा नदीचा संगम आहे ! पुढे **देवप्रयाग** येथे भागिरथी व अलकनंदा नदीचा संगम आहे ! **विष्णुप्रयाग** येथे धौली नदी अलकनंदा नदीला येऊन मिळते अशा प्रकारे **रुद्रप्रयाग** आणि सोनप्रयाग सह पंच प्रयाग आपणास याच मार्गावर पाहायला मिळतात !

चमोली, पीपलकोठी असा मार्ग क्रमित आपण जोशीमठ येथे येऊन पोहोचतो.

ज्योतिर्मठ (जोशी मठ)

श्रीमद् शंकराचार्यांच्या मठापैकी हा एक महनीय मठ आहे. हे स्थान श्रीमद् शंकराचार्यांच्या समाधीसाठी प्रसिध्द आहे. एका गुंफेत श्रीमद् आद्य शंकराचार्यांची समाधी आहे. एक अखंड ज्योत तेथे तेवत आहे. एक कल्याण सिध्दप्रद स्थान आहे ! शेजारी एक अमर कल्पवृक्ष आहे ! एक सोलीव सुख मनाला जाणवते ! मठाचे आवार स्वच्छ व वृक्ष फलपुष्पांनी बहरलेले आहे. संस्कृत वचनांचे फलक सांस्कृतिक वारसा सजीव असल्याची जाणीव करुन देतात ! पूर्वीचा मठ १८९८ मध्ये भूकंपात नष्ट झाल्यानंतर श्रीस्वामी विष्णुदेवानंद सरस्वती महाराजांनी हा मठ बांधला.

निवास स्थिती

ज्योतिर्मठाचे ठिकाणी निवास करण्यासाठी चांगली व्यवस्था आहे.

पर्यटन विभागाचा ट्रॅव्हलर्स लॉज

बिरला विश्रामगृह

यात्री निवास

निरीक्षण भवन

होटल नंदादेवी

होटल नीलकंठ

होटल कामेत

यासर्व ठिकाणी निवास, भोजन, उपहाराची व्यवस्था चांगली आहे.

बद्रीनाथ धाम

जोशीमठापासून ५१ किलोमीटर अंतरावर बद्रीनाथ आहे ! प्रथम उतार, मग चढण, पहाडातून, दगडातून, दऱ्यातून, खोऱ्यातून वाहणारी अलकनंदाचे अवखळ स्वरुप मन आकर्षून घेते ! गोविंदघाटाच्या पूर्वेकडील बाजूस फुलोंकी घाटी (व्हॅली ऑफ फ्लॉवर्स) आहे. येथे काही अंतर पायी जाऊन अत्यंत मनोरम दृष्य पाहता येते. फुलांच्या घाटीचे सौंदर्य अवर्णनीय ! अकल्पनीय ! विविध मोहकरगी फुलांचे ताटवे गालिच्यासारखे दिसतात. सुगंध अतिशय मनमोहक आहे. जास्तवेळ आपण त्या ठिकाणी राहू शकत नाही. सूर्यकिरणे पडताक्षणी ब्रह्मकमळे फुलतात आणि सूर्यास्ताचे वेळी सर्व पाकळया मिटून जातात. ते विस्तीर्ण स्वरुप सहस्त्रदलीय आहे ! निसर्गाचा अद्‌भूत चैतन्यशाली स्वरुपाचा तो आविष्कार ! अत्यंत मनोवेधक ! परमेश्वरी प्रसादाचा पुष्पसाज प्रसन्न झाला होता ! नेत्रांना सुखावणारी नील, सोन, लाल, पांढरी अशी विविध रंगांची आभा पसरविणारी ती पुष्पे आपल्या वैभवाचा कळस दाखवित होती !

१६२५ मीटर अधिक उंचीचा अतिशय कठीण चढणाचा रस्ता बस हळुहळु पार करीत होती. हनुमानचट्टी जवळ बस थांबते. देवदर्शिनीपासून बद्रीनाथ मंदिरांचें सोनेरी कळस दिसायला लागतात ! पांढऱ्या शुभ्र पर्वतराजीत बद्रीनाथाचे भव्य मंदिर दिसते ! मन पुलकित होते ! बस मधून उतरतांनाच निसर्गाची विस्तारलेली किमया आपापल्या मगदुरीने प्रत्येक जण टिपत असतो !

बिरला धर्मशाळा

हॉटेल देवलोक

मंदिर समिती धर्मशाळा

डी.जी.बी.आर.धर्मशाळा

मोदी धर्मशाळा

निरीक्षण भवन

वरील सर्व ठिकाणी प्रवाशांची निवास व भोजनाची व्यवस्था होत असते. हॉटेल देवलोक मधील व्यवस्था चांगली आहे.

श्री बद्रीनाथ मंदिर

गढवाल नरेशांनी या मंदिराची उभारणी केली. अलकनंदा नदीच्या डाव्या बाजुकडील तीरावर हे मंदिर आहे. याचे प्रवेशद्वार ४५ फूट उंच आणि आकर्षक आहे. महाराणी अहिल्याबाई होळकरांनी मंदिरावर सुवर्णकलश चढविला.

मंदिराच्या आत गेल्यावर मोठा सभामंडप आणि गाभार आहे. गाभाऱ्यात श्री नारायणाची शालीग्राम शीलेची मूर्ती आहे. चतुर्भुज अशी तीन फूट उंचीची पद्मासनस्थ ध्यानमुद्रेतील आहे. शंख, चक्र, सुवर्ण अलंकार, वस्त्र, आभूषणे आणि मस्तकावर हिरेजडित रत्नमुकुट झळकत आहे. श्रीमद् आद्य शंकराचार्य यांनी ही मूर्ती नदीच्या प्रवाहातून काढून आठव्या शतकात पुनः प्रतिष्ठापित केली. तत्पूर्वी बौध्दांनी ती मूर्ती नारदकुंडात टाकली होती.

मूर्तीच्या डावीकडे लक्ष्मीची मूर्ती , त्या पलिकडे नर, नारायणाच्या शंख, चक्र, गदा, पद्मधारी मूर्ती आहेत. उजवीकडे कुबेर आणि गणपतीच्या मूर्ती आहेत. मूर्तीच्या खालील बाजूस नारद, गरुड आणि उध्दव यांच्या मूर्ती आहेत. अक्षय्य तेवणारा नंदादीप आहे. मूर्तीला राजभोग असतो. भाताचा महानैवेद्य असतो ! पुजाअर्चा सुरु असते ! मंदिराचा पुजारी नंबुद्री बाम्हण असून त्यास रावळ म्हणतात. हिवाळयात हे मंदिर १५ फूट बर्फाखाली असते. त्यावेळी नारायणाची मूर्ती जोशी मठात आणून पूजा करण्यात येते. मंदिरातील वातावरण अतिशय मंगलमय आणि शुचिर्भूत आहे ! नंदादीपातील सात्विकता प्रत्येकाच्या अंतःकरणात ठसत असते !

पंचतीर्थ

तप्तकुंड, नारदकुंड, प्रल्हादकुंड, कर्मधारा आणि ऋषिधारा, अशा पांचमुळे पंचतीर्थ असे नामकरण झाले. तप्तकुंडात पाणी अत्यंत गरम असते तर अन्य कुंडातील पाणी बर्फाळ थंड असते. लोक दोन्हीचा प्रसाद घेत स्नान करतात ! अतिशय थंड वातावरणात गरमपाण्याने स्नानाचा आनंद तप्तकुंडावर आहे.

वसुधारा

बद्रीनाथ मंदिराजवळ समुद्रसपाटीपासून १२००० फूट उंचीवरील हे स्थान अत्यंत देखणे आहे ! येथे ४०० फूट उंचीवरील जलप्रपात (प्रचंड धबधबा) पाहायला मिळतो. पाणी अत्यंत थंड असल्यामुळे स्नान करता येत नाही. जलतुषार जबरदस्त वेगाने फिरकी घेत असतात. एक आगळा आनंद आणि अनुभव प्रवासी येथे घेत असतात.

हेमकुंड

एक अप्रतिम दृष्य आपण हेमकुंडाचे ठिकाणी पाहतो. सभोवती सात पर्वत! त्यावरील जमलेला शुभ्र बर्फ ! तो वितळत असतांना रुपेरी चुराखाली येत असल्यासारखे वाटते ! येथे सरोवरे आहेत ! कमलपुष्पे साकारलेली असतात ! मनोरम दृष्य वेळेचे भान हरपायला लावते !

रुद्रप्रयाग

येथून १५८ कि.मी. अंतरावर आहे. यालाच सूर्यप्रयाग असे म्हणातात. संगमाचे दृष्य लोभस आहे !

गणेश गुंफा

येथून दहा किलोमीटर अंतरावर माना गाव आहे. समुद्रसपाटीपासून १०५६० उंचीवरील हे स्थान ढगांच्या आवरणाच्या वर आहे. प्राणवायु विरळ आहे. सरस्वती नदी वाहात आहे ! तिच्या किनाऱ्याजवळील पुस्तकासारख्या आकाराच्या गुंफेत (गुहेत) व्यासांनी भारत (महाभारत) हा ग्रंथ लिहिला. बाजुच्या गुंफेला 'गणेश गुंफा' म्हणतात !

बद्रीनाथच्या अलकनंदा नदीच्या उजव्या तीरावर बह्मकपाल हा प्रशस्त घाट आहे. येथे पितरांचे श्राध्द करण्यासाठी गर्दी असते.

अलकनंदा नदीमध्ये स्नान करणे अतिशय कठीण आणि धोकादायक आहे. त्याठिकाणी साखळ्या बांधलेल्या आहेत. थंडगार पाणी ! आणि अत्यंत थंड वातावरण ! तरीही येथे आल्यासारखे स्नान करावेसे वाटणे स्वाभाविक आहे. पाणी अत्यंत स्वच्छ आणि शुभ्र !

हिंदु धर्मातील चार धाम म्हणजे संस्कृतीचे आधारस्तंभ ! त्यातील बद्रीनाथाची यात्रा ही अत्यंत कठीण असे. पूर्वी या सर्व परिस्थितीत लोक यात्रा करुन यायचे ! आता तशी स्थिती नाही. सर्व प्रकारच्या सोयींमुळे हा प्रवास खडतर असला तरी सुखावह आहे ! भाविक नेत्रांचे निरांजन करुन प्रकाश दृष्टीने बद्रीनाथाला ओवाळतात ! एक अपूर्व आणि महान निसर्ग आपण पाहिला याचे तृप्त समाधान प्रवाशांच्या मुखावर विलसत राहते !

* * *

प्रसन्नदायी गंगोत्री !

गंगोत्री ! शुचिर्भूत ! शुध्द तपस्विनी ! आपल्या निर्मळ जलाने असंख्याची तृष्णा भागविणारी ! पापविनाशी !कल्याणमयी !

बद्रीनाथ पाहिल्यानंतर गंगोत्री स्थान पाहायला मन उत्सुक असते ! तेथील सृष्टीचा आरास श्रध्देला फुलविती !

गंगेचे पाणी किती स्वच्छ, शुध्द, निर्मळ आणि स्वास्थ्यवर्धक आहे ते येथे पाहायला मिळते ! एक अत्यंत शांत, प्रसन्नता वातावरणाला भारुन टाकते ! समुद्रसपाटीपासून ३१४० मीटर उंचीवर हिमच्छादित पर्वतांनी वेढलेले हे स्थळ देवदार आणि चीडच्या वृक्षराजींमध्ये स्थिरावले आहे ! येथे गंगा हिमालयातून पृथ्वीवर अवतीर्ण झाली आहे ! येथे गंगेचा हिमालयातून पृथ्वीतलावर झालेला चरणस्पर्श ! पुढे तो प्रवाहित होत गेला ! हिमालयाचे आणि गंगेचे असलेले नाते प्रवाह स्वरुपात साकारले आहे ते येथेच ! याठिकाणी गंगेचे पात्र अगदीच लहान आहे. अत्यंत हिम शीत जल !

नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत येथे येण्याचा मार्ग बर्फाळलेला असल्यामुळे बंद असतो. एप्रिल ते जून याच काळात येथे भेट द्यावी ! बद्रीनाथ पर्यंत आल्यानंतर हे स्थळ न पाहता परत जाणे म्हणजे मंदिराचा कळस न पाहण्यासारखे होय. या काळात येथे थंडी खूप असल्यामुळे लोकरीची वस्त्रे सोबत ठेवायला पाहिजे. आमच्याजवळ होती व त्याचा उपयोग झाला ! थर्मास, आवश्यक खाद्यपदार्थ, आवश्यक औषधी सोबत असू देणे अधिक उपयुक्त ठरते !

रेल्वेमार्गाने गंगोत्री (गंगोत्तरी)ला जाण्यासाठी ऋषिकेशला उतरावे लागते. तेथून उत्तरप्रदेश पथ परिवहन महामंडळ (निगम)च्या बसने गंगोत्री थेट पोहोचता येते. बस,मिनीबस,टॅक्सीने देखील येथे पोहोचता येते. ऋषिकेश, मसुरी, कोटद्वार, काठगोदाम येथून नियमित बसव्यवस्था आहे. उन्हाळयात त्यांची संख्या वाढविण्यात येते. ऋषिकेशपासून ८३ किलोमीटर अंतरावर टेहरी स्टॅन्डपर्यंत आणि पुढे १६५ किलोमीटर अंतरावर पहाडी रस्ते, मार्ग, कापीत बस गंगोत्रीला पोहोचते !

फॉरेस्ट हाऊस धर्मशाळा

ट्रॅव्हलर्स लॉज

निरीक्षण भवन

पी.डब्लू.डी.क्वीन

जी.एम.रेस्ट हाऊस

महाराष्ट्र धर्मशाळा

वरील ठिकाणी आपली निवासाची, भोजनाची आणि उपहाराची व्यवस्था चांगली होते. मंदिराचे पुजारी निवास-भोजन व्यवस्था चांगली ठेवतात. ट्रॅव्हलर्स लॉजची व्यवस्था समाधानकारक आहे.

गंगा मंदिर

अत्यंत रमणीय अशा परिसरात गंगा मंदिर आहे. श्रीमद् आद्य शंकराचार्य यांनी गंगेची प्रतिमा मंदिरात प्रतिष्ठित केली. पुढे जयपूरच्या महाराजांनी मंदिरांची उभारणी आणि देखभाल केली. मंदिराचं व्यवस्थापन सध्या पंडे नियामक मंडळाकडे आहे. गंगेच्या पाण्याने स्नान करुन भाविक मंदिरात दर्शन घेतात. पूजा अर्पण करतात. स्नानाचे पाणी धर्मशाळा व लॉजमध्ये गरम स्वरुपात मिळते मात्र गंगेचे पाणी अतिशय थंडगार असल्यामुळे व वातावरणात थंडी असल्यामुळे सामान्य प्रवाश्याला स्नान करणे कठीणच जाते. साधु, संत, तपस्वी मुनी येथे मोठया संख्येत दिसतात. ते थंड पाण्याने स्नान करता [illegible]न्या वातावरणात वास्तव्य केल्यामुळे तसेच तपस्येच्या साधनेमुळे त्यांना सहज [illegible]य होते. येथील सृष्टीसौंदर्य मनोरम आहे.

रुद्रशिला

रुद्रशिला गंगा नदीच्या किनाऱ्याजवळ आहे. भाविक तेथे पुजा करतात. येथे गंगेच्या प्रवाहाला चांगलाच वेग आहे. तेथील मार्गदर्शकांच्या मते शंकराने येथे गंगेला आपल्या शिरी धारण केले ! तेथील स्वरुप अतिशय ओघवान आहे.

भैरवनाथ मंदिर :- गंगा मंदिराच्या जवळ श्री भैरवनाथ मंदिर आहे. येथील एका शिळेला भागगिथी शिला असे म्हणतात. भगीरथाने येथे तपस्या केली होती अशी आख्यायिका आहे. पुरातत्व विभागाने या सर्व स्थळी संशोधन करुन संशोधित माहिती जनते समोर ठेवावयास पाहिजे.

गौरीकुंड :- रुद्रशिलापासून जवळच गंगा केदारगंगेला येऊन मिळते आणि संगमाचे पाणी धबधब्यासारखे पंधरा किलोमीटर खाली असलेल्या शिवलिंगावर अभिषेक केल्यासारखे पडत असते. हे दृष्य अतिशय मनोवेधक आहे. काहींच्या मते हीच गंगोत्री आहे !

गोमुख :- हे परमपवित्र गंगेचे मुख्य उगम स्थान होय ! श्रीमुख पर्वतावर गोमुख आकाराचे कुंड आहे. गंगेची शुभ्रधवल धार गोमुखातून पडते पुढे ही जलधारा मोठी होत गंगा मंदिरापर्यंत नदीप्रवाहात रुपांतरित होते. याठिकाणी जाणे अतिशय कठीण आहे. हा अत्यंत दुर्गम प्रांत आहे. तपस्वी सन्यासी जाऊन येतात त्यांच्यांच कथनानुसार आख्यायिका तयार होतात.

गंगोत्रीचे स्थळ अत्यंत रमणीय आहे ! निसर्गाचे हे स्वरुप प्रत्यक्ष पाहिल्यानंतरच त्याच्या चैतन्यशाली प्रभावाची कल्पना येते ! गंगो त्री निघतांना गंगेचा जयजयकार मुखातून सहजगत्या उमटतो ! एवढी श्रध्दा स्वरुप भाग्य कोणत्या नदीला प्राप्त झाले असेल !

* * *

विलासिनी यमुनोत्री !

यमुना नदीचे उगमस्थान - यमुनोत्री ! परमेश्वराच्या चरणस्पर्शाने पुनीत झालेली यमुना ! विलासिनी यमुना ! राजस यमुना ! जिच्या किनाऱ्यावर ऐतिहासिक शहरे विकसित झाली ! राजधानी दिल्ली, आग्रा, मथुरा यांचे संवर्धन यमुनेच्याच जलधारांनी झाले ! युगंधर श्रीकृष्णाची विशेष प्रीती जिला लाभली अशी यमुना ! हिमालयातच उगमस्थान लाभलेली यमुना !

३३२२ मीटर उंचीवरील हे अतिशय थंड आणि यमुना नदीचे उगम स्थान प्रेक्षणीय आहे ! येथील निसर्ग सौंदर्य काही वेगळेच आहे ! प्रत्येक ठिकाणची सौंदर्यछटा वेगळी असते ! त्याचे प्रत्यंतर येथेही येतेच ! याठिकाणी येणे मात्र अतिशय अवघड आहे त्यामुळे पर्यटक या स्थळाला भेट न देताच परततात !

याठिकाणी भेटीची योग्य वेळ एप्रिल ते जून हीच आहे अन्य वेळी पाऊस आणि बर्फ यामुळे जाऊ शकत नाही.

केदारनाथ, बद्रीनाथ, ऋषिकेश, मसुरी, नैनीताल, गंगोत्री, याठिकाणाहून बसने हनुमानाचेट्टी पर्यंत पोहोचता येते. येथून तेरा किलोमीटर पहाडी चढण मार्गाने यमुनोत्रीस जावे लागते. याठिकाणी भाडयाने कंडी, घोडे मिळतात. पूर्वी भाडेदर ठरवून प्रस्थान करावे. पायी समुहाने जाता येते. संपूर्ण मार्ग पहाडातून किंवा घोडे

यांचा उपयोग करावा. मध्ये केंव्हाही पाऊस येऊ शकतो. येथे ऊन पावसाचा सावलीचा खेळ असतो. तेंव्हा पावसाळी ड्रेस सोबत असावा.

हनुमानचेट्टी पासून नारायणपुरी (जानकीबाई चेट्टी) येथे मुक्काम करता येतो. किंवा सकाळी निघून संध्याकांळ पर्यंत पोहोचता येते. नारायणपुरी येथे

निरीक्षण भवन

यात्री निवास

यमुनोत्री पर्यटक निवास

विश्राम गृह

वरील ठिकाणी निवास व भोजन व्यवस्था आहे. त्याचा आस्वाद घ्यावा.

हनुमानचेट्टी, नारायणपुरीनंतर निसर्गाचे सौंदर्य अधिक बहरलेले दिसायला लागते. बर्फाळ गगनचुंबी पर्वतराजी दिसतात ! पक्ष्यांचे मधुर संगीत ऐकायला मिळते ! पर्वतातून खळखळ वाहणारी यमुना नदी ! चीडचे वृक्ष ! त्या वृक्षातून डिंक काढला जातो ती प्रक्रिया ! कधी निळसर तर कधी लालसर दिसणारे आकाश ! हे सर्व पाहात आपण यमुनोत्री पोहोचतो ! मार्गातील शीण तेथील सृष्टी सौंदर्य नाहिसे करुन टाकते.

धर्मशाळा

यात्री निवास

फॉरेस्ट रेस्ट हाऊस

टुरिस्ट बंगला

ट्रॅव्हलर्स लॉज - जानकीचेट्टी

पर्यटक आवास गृह

याठिकाणी निवास, उपहार, चहा, भोजन आदी सर्व व्यवस्था उपलब्ध आहेत.

यमुनोत्री मंदिर

येथे पोहोचल्यावर यमुनेचे मंदिर दृष्टीस पडते. बाजुने यमुनेचा उगमप्रवाह दिसून येतो. नदीचे पाणी अतिशय थंड आहे. येथे गरम पाण्याची कुंडे आहेत त्यामुळे गरम पाण्याने स्नान करता येते.

उगमस्थान :- यमुनोत्री पासून पर्वतातून आत चढून जाणे कठीण आहे. बराचसा भाग बर्फाच्छादित आहे. तेथे यमुनेचा उगम होतो. याठिकाणी जाणे अतिशय कठिण आहे.

सूर्यकुंड :- यमुनोत्री येथे अनेक जलकुंड आहेत. सूर्यकुंडातील पाणी अतिशय गरम, तप्त आहे. त्यातील काही पाणी आणि थंड पाणी घेऊन मिश्र पाण्याने पर्यटक स्नान करतात.

हे पाणी कल्पनेपेक्षा जास्त गरम आहे हे वैशिष्टय !

जानकीदेवी कुंड :- मंदिरात जाण्यापूर्वी या कुंडातील गरम पाण्याने किंवा यमुना नदीतील थंड पाण्याने स्नान करणे आवश्यक आहे. येथे स्नान करुन मगच मंदिरात लोक दर्शनास जातात. पूजा करतात !

लोकरीची स्वेटर्स, शाल, थर्मास, खाद्यपदार्थ आणि आरोग्यासाठी आवश्यक असल्यास औषधे अवश्य सोबत न्यावीत !

यमुनोत्रीला सृष्टीचे अप्रतिम दृश्य तर दिसतेच पण खळाळते पाण्याचे रुप आणि उडणारे तुषार सतत आठवत राहतात !

* * *

नयनरम्य नैनिताल

नैनीताल ! एक नयनरम्य पर्यटनस्थळ ! उत्तरप्रदेशातील हिरव्याकंच वनराजीत विसावलेले, पर्यटकरंचे आंनद निधान ! निसर्गाची मोहक किमया साकारलेले एक सृष्टी सौंदर्यस्थळ ! क्षितिजावर उमलणाऱ्या सूर्याच्या सोनपाऊलांचे प्रतिबिंब आपल्या सोनेरी किरणांनी व्यापून टाकणारा तलाव ! दुपारच्या शांत वेळी शिखरस्थानावरुन दुरुन दिसणारी आणि चांदीसारखी चमचमणारी शुभ्र हिमशिखरे !....

.... एक ना दोन, निसर्गाची अशी कितीतरी अपूर्व रुपे आपल्याला येथे न्याहाळता येतात. मनाची मशागत आणि बुध्दीचे संवर्धन करणारे तसेच आंनदाचे चांदणे अनुभवायला लावणारे नितांत रमणीय असे नैनीताल !

उत्तरेच्या बाजुने चीना, पश्चिमेकडून देवपथ आणि दक्षिणेकडून अयारपारा अशा पर्वतांमध्ये नैनीताल वसलेले आहे. आधुनिक व्यवस्थांनी समृध्द असलेले आणि समुद्रसपाटीपासून १९३८ मीटर उंचीवर असलेले तलावांचे हे एक गांव ! १८४१ मध्ये साखरेच्या कारखान्याचा मालक बैरन नावाच्या इंग्लिश गृहस्थाने हे ठिकाण शोधून काढले.

चारही बाजूंनी घनदाट हिरवीपर्ण वृक्षराजी, पहाडावर एखाद्या नागिनीसारखे वळणे घेत जाणारे रस्ते, मध्यभागी एक विशाल तलाव, त्याच्या सभोवती उंच पर्वत तलावामध्ये रात्रीच्या वेळी विविध रंगांची विद्युतदीपांची प्रकाश व्यवस्था अद्यावत सुसज्ज नावा- होडया, पाय-यांवर उभी असलेली झाडांच्या मागे लपलेली

घरे- बंगली, त्यातील विद्युतदीप रात्रीचे वेळी तारांगणातील तारे चमकावे अशा स्वरुपात दिसतात. असे येथील मनोरम दृश्य पर्यटकांचे मन मोहित करुन घेते. प्रारंभीच्या काळात याठिकाणी साठ तलाव होते पुढे मात्र ते कमी कमी होत गेले. या तलावाजवळ नैनादेवीचे मंदिर आहे त्यामुळे या तलावाला आणि ठिकाणाला नैनीताल असे नांव पडले.

पावसाळयात याठिकाणी जाणे अतिशय कठीण आहे. ऑक्टोंबर ते फेब्रुवारी हा थंडीचा काळ असतो. कडाक्याच्या थंडीतही हिमवर्षाव पाहण्यासाठी पर्यटक या स्थळी येतात. हिमवर्षामुळे तलाव गोठून जातो. वाहतूक खोळंबून जाते आणि कधी कधी या स्थळाचा अन्य शहरांशी संपर्क तुटतो. फेब्रुवारी ते जुलै या काळात पर्यटक मोठया प्रमाणावर येथे येतात हीच भेटीची अतिशय चांगली वेळ आहे.

वाहतूक प्रबंध

नैनीतालशी उत्तरप्रदेशातील सर्व प्रमुख शहरांशी वाहतूक संबंध आहे. नवी दिल्ली येथून नैनीतालसाठी बससेवा, तसेच रेल्वे सेवा उपलब्ध आहे. रेल्वेस्टेशन काठगोदाम पर्यंत रेल्वेगाडी जाते नंतर ३५ किलोमीटरचा पहाडी रस्ता बस,टक्सीद्वारा पार करावा लागतो. विमानाने पंतनगर येथील विमानतळापर्यंत जाता येते नंतर बसने प्रवास करावा लागतो. एकूण बसप्रवास अतिशय चांगला आणि सोयास्कर ठरतो. पर्यटन महामडंळ, राज्य निगम तसेच खाजगी टुरिस्ट कंपनीद्वारा आरामदायी बसची व्यवस्था उपलब्ध आहे. दिल्लीवरुन रात्री १० वाजता बस निघून सकाळी सहा वाजता येथे पोहोचते म्हणजे एकूण आठ तासांचा प्रवास आहे. आरक्षणची व्यवस्था दिल्लीला आंतर राज्य निगम बस स्थानकावरुन होत असते.

सुसज्ज निवास व्यवस्था

नैनिताल येथे एक स्टारपासून पंचतारांकित पर्यत सर्व स्तरावरील हॉटेल्सची व्यवस्था उपलब्ध आहे. हॉटेल्सचे दर मात्र महाग आहेत. मध्यम स्वरुपाच्या भाडेदरात लॉज उपलब्ध आहे. भोजनासाठी उपाहारगृहे व भोजनालये चांगल्या प्रतीची आहेत. वैष्णव, (म्हणजे सामान्यतः महाराष्ट्रीयन पध्दतीचे)

गुजराथी,पंजाबी,दाक्षिणात्य पध्दतीचे भोजन तसेच मांसाहारी भोजनाची व्यवस्था आहे. हॉटेल्सची सारणी खालीलप्रमाणे आहे. ती प्रवाशांना निश्चितच उपयोगी ठरणारी आहे.

हॉटेलचे नांव	पत्ता	
होटल अजंता	मल्लीताल	२६९७
होटल अशोका	तल्लीताल	२१८०
होटल अल्का	द माल	२२२०
होटल अल्पस	द माल	२३१७
होटल अम्बेसॅडर	द माल	२६४२
अनुपम	मल्लीताल	NA
ग्रॅन्ड हॉटेल	द माल	२४०६
होटल गुरदीप	द माल	२५२८
होटल हील व्हयू	तल्लीताल	२३६१
होटल हिमालय	तल्लीताल	२२५८
होटल लॉगहट	नैनापीक	२५४३
मेघदूत होटल	तल्लीताल	२१२४
न्यू हॉटेल भारत	तल्लीताल	NA
हॉटेल सेन्ट्रल	द माल	NA
हॉटेन एव्हररेस्ट	द माल	NA

प्रेक्षणीय स्थळे

नैनिताल येथे गेल्याबरोबर समोर एक विशाल तलाव दिसतो. हिरव्या पार्श्वभूमीवर एक सुंदरदृश्य आपण पाहत राहतो. थंडगार वा-याची साथ, निसर्गाचे विलोभनीय स्वरुप दाखवून देते. तलावा मध्ये पर्यटक नौकाविहार करीत असतात. त्यासाठी आरक्षण व्यवस्था उपलब्ध आहे. नौकाविहार हे पर्यटकांचे आकर्षण आहे.

लॅन्डस् एंड पॉईट! या मुख्य तलावापासून ४ किलोमीटर अंतरावर असलेले एक पर्वत शिखर ! समुद्रसपाटीपासून ६९४५० फूट उंचीवर आहे. येथे उभे राहून हिमालयाच्या पर्वतरांगा पाहता येतात.

दुसरे शिखरस्थळ नैनापीक ! समुद्रसपाटीपासून ८५६८ फूट उंचीवर आहे. मुख्य तलावापासून ४.५ किलोमीटर अंतरावर आहे. येथे पायी किंवा घोडयावरुन जाता येते. रस्ता अतिशय अरुंद आणि धोकादायक आहे. पर्वतशिखरावर पोहोचल्यावर मात्र सृष्टी सौंदर्याची उधळण पाहायला मिळते. हिमालयाची गौरवर्णीय बर्फाच्छादित शिखरे दिसतात. येथून सूर्यास्ताचे दृश्य मनोरम दिसते.

तिसरे शिखरस्थळ स्नो व्ह्यूपॉईंट ! समुद्रसपाटीपासून ७४५० फूट उंचीवर आहे. येथे पोहोचण्यासाठी उत्तरेकडील बाजूने पायी जावे लागते. शिखरस्थळ रमणीय आहे. याशिवाय नैनितालपासून १५ किलोमीटर अंतरावर सात ताल, २० कि.मी. अंतरावर नौकाविरताल,२१ कि.मी. अंतरावर मालवाताल अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत. याठिकाणी उपहारगृहांची सोय आहे पण निवास प्रबंध नाही त्यामुळे नैनिताल येथेच मुक्काम करावा लागतो. कार्बेट पार्क, राणीखेत या पर्यटनस्थळीही येथून जाता येते.

विकसित पर्यटन केंद्र

नैनिताल हे अतिशय अद्यावत सुखसोयींनी सुसज्ज असे पर्यटनकेंद्र आहे. छायाचित्रकार,फोटो स्टुडिओ, बँका (प्रामुख्याने स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया) उनी-लोकरी वस्त्रांची भरपूर विक्री करणारी तसेच कलात्मक वस्तूंची व्यापारपेठ, मार्गदर्शक, मनोरंजनाची साधने, (सिनेमागृहे, क्लब) शिखरस्थानांवर जाण्यासाठी रोली व्यवस्था, नौका-विहार व्यवस्था, शिखरस्थान दर्शन बससेवा इत्यादी सर्व आवश्यक तसेच सुखसोयींच्या गरजांची पूर्ती करणारी व्यवस्था व साधने येथे उपलब्ध असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय अजिबात होत नाही. देशी व विदेशी पर्यटक प्रचंड संख्येत या स्थळाला भेट देत असतात. शासनाला, खाजगी व्यापा-यांना आणि प्रबंधकांना या स्थळी चांगली

उत्पन्नप्राप्ती आहे. एकूण हे सौंदर्यस्थळ विकसित स्वरुपाचे तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पर्यटन केंद्र आहे.

" आंनदाचे डोही आनंद तरंग" ही अनुभुती आध्यात्मिक सुखात येत असते. सामान्य माणूस भौतिक साधनांच्या चौकटीत आपला विकास साध्य करीत असतो असंख्य अडचणींवर मात करण्याची शक्ती पर्यटनाच्या माध्यमातून त्याला प्राप्त होते आणि त्याच्या ओठावर शद्व येतात... " पर्यटनाचे डोही आंनद तरंग..."

* * *

अर्धवर्तुळाकार पर्वतशिखर
अलमोडा !

नैनीताल प्रमाणेच उत्तर भारतातील एक नितांत रमणीय स्थान म्हणजे अलमोडा होय ! तसे ज्ञात आणि प्रसिध्द असलेले परंतु एकदम प्रवाशांच्या नजरेत नसलेले हे पर्यटन स्थळ आहे. पर्वतशिखरांच्या अर्धगोलाकार स्वरुपात वसलेले हे स्थान ! हिरव्याकंच वृक्षराजींच्या बहराने विस्तार पावलेले शांत व एकांत वाटणारे हे सौंदर्य हे स्थळ आहे. एक वेगळेच निराळेपण येथे जाणवते ! पहाडी लोक, पहाडी संस्कृती! येथील भाषा वेगळी ! राहणीमान वेगळे ! घरे एकावर एक बांधलेली असावी अशी दिसतात ! रस्ते साधारण व चढण असलेले ! घरांच्या मध्ये वृक्षराजी ! रस्त्यांच्या बाजुने वृक्षराजी ! आणि समोर पर्वतरांगा ! शहरी वातावरणापासून एकदम भिन्न स्वरुप येथे पाहायला मिळते ! या दृष्यांचं अप्रुप वाटतं ! गढवाल पध्दतीचे हिन्दी बोलणे कानांवर पडते! गोल, वर्तुळाकार जरीटोपी घातलेली, अंगावर घोंगडी किंवा जाड शाल घेतलेली माणसे इकडून तिकडे काही कामानिमित्ताने तर काही दुकान व हॉटेल व्यवसायात दिसतात !

समुद्रसपाटीपासून १६४६ मीटर उंचीवर हे शिखरस्थान आहे. येथे बसने येणे सर्वाधिक सोयीच आहे. रेल्वेने प्रवास करता येतो. दिल्ली, नैनिताल. लखनऊ, आग्रा, गढवाल, देहरादून, बरेली येथून रेल्वेने काठगोदाम तसेच

हल्दांनी पर्यंत येता येते. तेथून अलमोडाकरिता बस किंवा टॅक्सीने जावे लागते. दिल्ली आणि नैनिताल या ठिकाणाहून आरामदायी प्रवासी बस धावत असते त्या बसने प्रवास करणे सोयीचे जाते.

वायुमार्गाचा प्रवास अवघड आहे म्हणजे सरळ अलमोडा पर्यंत जाणे शक्यच नाही. दिल्लीहून पंतनगर विमानतळापर्यंत विमान प्रवास व नंतर १२७ किलोमीटरचा प्रवास बसने करावा लागतो. एकंदरीत थेटपर्यंत बसचा प्रवास आवश्यक ठरतो.

मार्गदर्शक आणि पर्यटन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार अलमोडा नगरचा उल्लेख प्राचीन पुराण ग्रंथात आढळतो. कुमाऊंपर्वतीय संस्कृतीचे प्राचीन काळापासून केन्द्र आणि कत्यूरी राजवंशाची तत्कालिन राजधानी असा या स्थळाला इतिहास आहे.

या पर्यटनस्थळी थंडी चांगली असते. अर्थात आम्ही ऑक्टोंबर मध्ये भेट दिल्यामुळे सुसहय थंडी होती. उन्हाळयात जास्तीचे तापमान २८ डिग्री सेल्सियस आणि कमी ४ डिग्री सेल्सियस असते यावरुन वातावरणाची सहज कल्पना येईल. पावसाळयात जाण्याची सोय नाही. हिवाळयात गोठणारी थंडी असते तेंव्हा एप्रिल ते जून हाच भेटीचा योग्य कालवधी आहे.

अलमोडा येथे लहानशी बाजारपेठ आहे. अनाधिकृत पण व्यवस्थित माहिती सांगणारे मार्गदर्शक आहेत.

अलका हॉटेल

अलमोडा येथे निवास व्यवस्था लॉज आणि हॉटेल्सद्वाराच करावी ती अतिशय सोयीची जाते. हॉटेल्स, लॉज, धर्मशाळा आणि भोजनासाठी उपहारगृहे आहेत.

हॉटेल	दूरध्वनी
हॉटेल अलका	१६३
हॉटेल रंजना	२३०१

हॉटेल एम्बेसॅडर	११८
हॉटेल अशोका	६६
हॉटेल कैलाश	-
हॉटेल नीलकंठ	३२
हरिप्रसाद टमटा धर्मशाळा	-
हरिनिवास थाना बाझार	-

वरील हॉटेल्स लॉजमध्ये निवास करुन दर्शनीय स्थळे पाहण्यासाठी तत्पर असावे.

सिमटोला

येंथून तीस किलोमीटर अंतरावर सिमटोला स्थान आहे. देवदार वृक्षराजीने संपन्न पहाड अवलोकन करणे येथून शक्य होते. एक सुंदर स्थान म्हणून याचे वर्णन करता येईल.

कालीमठ :- पाच किलोमीटर अंतरावर कालीमठ स्थान आहे. येथून अलमोडा नगर आणि सभोवतीच्या सर्व पर्वतांचे रम्य दर्शन घडते. विहंगावलोकनासाठी उत्तम स्थान आहे.

ब्राईट ॲन्ड कॉर्नर :- फक्त दोन किलोमीटर अंतरावरील पर्वतशिखरस्थान! येथून सूर्योदय आणि सूर्यास्ताचे चित्र टिपता येते !

जगन्नाथ मंदिर :- ४७ किलोमीटर अंतरावर श्री जगन्नाथाचे मंदिर आहे. भाविकांचे येथे सतत वर्दळ असते.

कटारमल

येथून सतरा किलोमीटर अंतरावर कटारमल स्थानी ८०० वर्षापासूनचे (तेथील उपलब्ध माहितीनुसार) सूर्य मंदिर आहे. वास्तुकला, आणि शिल्पकलेचा एक सुंदर नमुना येथे पाहायला मिळतो. येथून ४ किलोमीटरची

चढण चढून पर्वतशिखरावर जाता येते. सूर्यमंदिर फार दुर्मिळ असते. प्रवासी मोठया उत्कंठतेने ते पाहतात. सभोवती सुंदर वातावरण आहे.

जागेश्वर घाटी

चौतीस किलोमीटर अंतरावर देवदार वृक्षांनी सजलेली पर्वतांची दरी म्हणजे जागेश्वर घाटी ! येथे जागेश्वर मंदिर आहे. येथे प्राचीन मूर्ती व मंदिरांचा समूह आहे.

उत्तर भारतातील एक सुंदर पर्यटनस्थळ म्हणून अलमोडाचा उल्लेख होतो. हा निसर्ग एकदा पाहण्यायोग्य आहे.

* * *

रम्य राणीखेत

उत्तरप्रदेशातील तीन अज्ञात असलेली परंतु सृष्टी सौंदर्याने बहरलेली पर्यटनस्थळे म्हणजे राणीखेत, अलमोडा, आणि कौसानी ! राणीचे विश्रांतीस्थान म्हणून राणीखेत हे नांव पडले ! राणीखेत रम्य आहे ! निसर्गाची वेगवेगळी रूपे आपल्याला या तीन ठिकाणी पाहायला मिळतात अमेरिकेचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायधीश 'विलीयम डग्लस' हे स्थान पाहण्यासाठी आले. त्यांना अन्य निसर्गरम्य स्थळांना भेट देणे शक्य झाले नाही. येथील सृष्टीचे लोभस स्वरूप पाहून " Ranikhet is an excellent tourist place of the world and I am very pleased to see it." असे उद्‌गार काढले तर नेदरलँन्डचे राजदूत 'वान पैलेंट' यांनी " Who has not seen the most attractive tourist place Ranikhet, he has not at all seen India." असे उद्‌गार काढले. (संदर्भ- पर्यटन विकासनिगम- गढवाल उत्तरप्रदेश) या विधानांचा संदर्भ ऐवढयाचसाठी दिला की, राणीखेतचे सृष्टीसौंदर्य खरोखरच अपूर्व आहे. समुद्र सपाटीपासून १८३० मीटर उंचीवर स्थिरावलेले हे पर्वतीय पर्यटन स्थळ आहे.

सिनेसृष्टीच्या कॅमेऱ्यातून येथील सुरम्य दृष्ये सतत चित्रित होत असतात. राणीखेतला आल्यावर याची प्रचिती येते.

देवदार आणि चीड वृक्षांचे घनदाट जंगल, पर्वतराजी दऱ्या खोऱ्या, हिमालयाची शिखरे, गोलाकार वस्ती, थंडगार वारे, झुळझुळणारे पाणी - असे राणीखेतचे स्वरुप दृष्टीस पडते.

बाराव्या शतकात नरेश सुधारदेव यांची राणी पद्मिनी हिचा येथे विश्राम होत असे. तिला हे स्थान अतिशय आवडले त्यामुळे 'राणीक्षेत्र' व पुढे 'राणीखेत' असे याचे नामकरण झाले असा इतिहास आढळतो.

याठिकाणी इमारती आहेत, प्रेक्षणीय स्थाने आहेत त्यामुळे कोणत्याही मौसमात येथे भेट देता येते. हिवाळा ज्यांना मानवतो त्यांनी नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात अवश्य भेट द्यावी अर्थात थंडी जास्त असल्यामुळे उनी कपडयांची व्यवस्था ठेवावी लागते. उन्हाळयात तर प्रवाश्यांचा ओघ चालूच असतो. ज्यांना निसर्गाचे खळाळते रुप बघायचे असेल त्यांनी पावसाळयात भेट द्यावी. तो एक वेगळाच आनंद असतो. मार्च, एप्रिल,मे,जून या चार महिन्यात प्रवाश्यांनी भेट द्यावी व फलपुष्पांचा आस्वाद घ्यावा.

दिल्लीहून राणीखेतला जाणे हाच श्रेयस्कर मार्ग आहे. दिल्ली, मेरठ, बरेली, देहरादून, नैनीताल, मुरादाबाद, रामपूर येथून नियमित स्वरुपात बसने राणीखेतला पोहोचता येते. रेल्वे मार्गाने काटगोदाम स्टेशन पर्यंत जाता येते. तेथून ८४ किलोमीटर अंतर बस किंवा टॅक्सीने पोहोचता येते.

वायुमार्गाने प्रवास सुरु असल्यास दिल्लीपर्यंत कोणत्याही शहरापासून येऊन, तेथून पंतनगर विमानतळावर उतरावे. त्याठिकाणाहून बस किंवा टॅक्सीने राणीखेतला जावे लागते.

वेस्ट व्हयू हॉटेल

रानीखेत येथे निवासाची चांगली, प्रशस्त व्यवस्था महात्मागांधी रोड वरील वेस्ट व्हयू हॉटेल मध्ये होऊ शकते. सर्व आधुनिक सुखसोयींनी हॉटेल प्रवाशांचे स्वागत करण्यात सुसज्ज आहे. सामान्यांना हिवाळयात येथे राहणे परवडू शकेल कारण त्यावेळी दर स्वस्त असतात अन्यवेळी हे हॉटेल श्रीमंतांसाठीच आहे. सामान्य जनतेसाठी पर्यटनविभागाने निवासाच्या सोयी केल्या आहेत. प्रवाशांच्या संख्येच्या

तुलनेत त्या कमी पडतात. विश्रांतीगृह, अतिथीगृह, यूथ होस्टेलची व्यवस्था आहे पण ती शासकीय अधिकाऱ्यांसाठी आरक्षित असते.

हॉटेलचे नांव	पत्ता	दूरध्वनी क्रमांक
हॉटेल मून	सदरबाजार	२२५८ \ २३७२
हॉटेल अलका	सदरबाजार	६९
जलनिगम रेस्ट हाऊस	चिंगारीखल	१०८
ऐव्हरेस्ट हॉटेल	बाजार रोड	११५
हॉटेल मेघदूत	बाजार रोड	७५
वाल्मिकी आश्रम	-	-
हॉटेल प्रशांत	-	११६
हॉटेल नटराज	-	६९
शिवमंदिर धर्मशाळा	-	

राणीखेत येथे फळांची आणि फुलांची संपन्न बाजारपेठ आहे. अतिशय स्वादिष्ट फळे स्वस्त दरात उपलब्ध आहेत त्याचा प्रवाशांनी आस्वाद घ्यावा. काष्टशिल्प आणि अन्य धातुंच्या सुंदर मूर्ती बाजारपेठेत आहेत. त्यांची कलात्मकता प्रवाशांना आवडते व खरेदी विक्रीचे व्यवहार सतत सुरु असतात. फोटो स्टुडिओ, बँका, मार्गदर्शक इ. व्यवस्था आहेत. उपहारगृहे आहेत. हॉटेलमध्येच उपहार, किंवा भोजन घेणे श्रेयस्कर !

शीतलाखेत

राणीखेत पासून २६ कि.मी. अंतरावर शीतलाखेत हे एक सुंदर, शांत असे स्थान आहे. सभोवतीची सृष्टी आकर्षक आहे. येथे स्काऊटचे शिबिर भरत असते.

द्योतीखेत :- राणीखेत - अलमोडा मार्गावर द्योतीखेत पर्वत शिखरस्थान आहे. याठिकाणाहून हिमालयाच्या सुंदर रांगा दिसतात. सभोवती लहान पर्वत आहेत. वृक्षलता बहरल्या आहेत.

मजखाली :- राणीखेत पासून १३ किलोमीटर अंतरावरील रम्य स्थळ म्हणजे मजखाली ! वर बर्फ असलेल्या पर्वतांच्या अगदीजवळ आपण असतो व हे दृष्य जवळून न्याहाळता येते.

रामजी वनस्पती संग्रहालय :- वनस्पती शास्त्रज्ञ रामजी यांनी स्थापन केलेल्या संग्रहालयात अनेक प्रकारची रोपं विक्रीसाठी ठेवली आहेत. वनस्पतीतज्ञ प्रामुख्याने येथे भेट देतात व परिषदा घेतात.

खडा बाजार :- राणीखेतचा हा मुख्य बाजार आहे. याठिकाणहून मनोरम दृष्य पाहता येते.

चौबटिया :- येथून दहा किलोमीटर अंतरावर कुमाऊं मंडल अनुसंधान संस्था आहेत. येथे बाग बगिचा आहे. येथून पर्वत शृंखला दिसते. चौबटिया येथे तीन जलस्त्रोत आहेत. पाण्याच्या शुभ्रधारांची मजा प्रवासी लूटतात. या तीन जलधारा एकत्र होऊन धबधब्या सारख्या खाली पडतात. हे स्थान प्रवाशांना आवडण्यासारखेच आहे.

गोल्फ मैदान - द्योतीखेतच्या समोर उपट याठिकाणी गोल्फ खेळाचे प्रसिध्द मैदान आहे. हिरवे गवत गालिचासारखे पसरलेले त्यावर खेळाडू खेळ रंगवतात. मैदानाच्या सभोवती वृक्षराजी घनदाट स्वरुपात विस्तारली आहे.

द्वार हाट :- राणीखेत पासून बत्तीस किलोमीटर अंतरावर असलेले द्वारहाट हे ठिकाण ऐतिहासिक दृष्टया प्रसिध्द आहे. स्थापत्य कलेचे नमुने आजही पाहायला मिळतात. भारतात संपत्तीची देवता श्री कुबेर याची भव्य प्रतिमा असलेले एकमेव मंदिर येथे आहे. दर्शनार्थी भक्तीभावाने या मंदिरात पूजाअर्चा आणि आराधना करतांना दिसतात.

याशिवाय कालिका का टिला, मतरौंजखाल, सौनी, तारीखेत, खैराना, चिनियानोला, दूनागिरी, बुग्याल ही सर्व प्रेक्षणीय स्थाने वेळ मिळाल्यास अवश्य पाहावी.

राणीखेत पाहिल्यावर एक अज्ञात असलेले परंतु रमणीय असलेले एक पर्यटनस्थळ आपण पाहिले असे समाधान पर्यटकांना लाभते आणि आँनदात ते पुढील वाट मळू लागतात !

* * *

कंकणाकृती कौसानी

कौसानी ! उत्तरप्रदेशातील एक कंकणाकृती पर्यटन स्थळ ! निसर्ग सौंदर्याचा एक कोमलस्वर दर्शविणारे स्थळ ! पर्यटकांना अज्ञात असलेले पण एकदा भेट देण्या योग्य उत्तम स्थळ ! कत्पुर घाटी, सोमेश्वर घाटी यांच्या मध्ये हे कौसानी नामक पर्यटनस्थळ आहे. समुद्रसपाटीपासून १९५० मीटर उंचीवर असलेल्या कौसानीच्या सभोवती पर्वत शिखरे आहेत. येथील सौंदर्याचे वैशिष्टय म्हणजे येथील फुलांना मोहक सुगंध आहे. वाऱ्याच्या झुळकीने वातावरण मोहक सुगंधाने भारले जाते. कुमांऊ पर्वतांच्या वृक्षांच्या फुलांची ही विशेषता पाहून पुलकित होतो !

कौसानी येथे रेल्वे मार्गाने जाता येत नाही. दिल्ली ते काठगोदाम पर्यंत रेल्वेगाडीने जाता येईल परंतु तेथून कौसानी १४२ किलोमीटर दूर आहे व त्याकरिता उत्तरप्रदेश पर्यटन विकास निगम, आंतरराज्यीय बस निगमच्या बसनेच प्रवास करावा लागतो. कुमांऊ मोटार ओनर्स युनियनची बस सर्व्हिस, प्रवासी संस्थांची आरामदायी बस सेवा जास्त उपयुक्त ठरते. दिल्ली, अलमोडा, बरेली, राणीखेत, नैनीताल, देहरादून, हरिद्वार यासर्व स्थानांहून कौसानी येथे बसने जाण्याची सोय आहे.

वायुमार्गाने जाण्याची व्यवस्था नाही. दिल्लीहून पंतनगर विमानतळ व तेथे उतरुन टॅक्सीने कौसानिला जाता येते.

एप्रिल ते जून असे तीन महिने येथे पर्यटक मोठया संख्येत येतात. अन्यत्र उन्हाळा असतो येथे त्यावेळी थंड वातावरण असते. ऑक्टोंबर नोव्हेंबर महिन्यात येथे येणे अधिक सोयीचे आहे पण थंडी मात्र सहन करावी लागते.

हॉटेल हिमालय

कौसानी येथे निवासाची चांगली सोय हॉटेल हिमालय येथे उपलब्ध आहे. निवास, भोजन, उपहार, आदी सर्व सोयीनी ते सुसज्ज आहे.

अनासक्ती योग आश्रम
पाईन ब्ल्यू हॉटेल
फॉरेस्ट रेस्ट हाऊस
जिल्हा परिषद विश्रांतीगृह
डाक बंगला

इत्यादी निवासासाठी उपलब्ध आहेत. पर्यटकांना हॉटेलमध्येच उतरावे लागते. शाकाहारी व मांसाहारी भोजन उपलब्ध आहे.

सुंदर सूर्योदय

कौसानी येथील सूर्योदय पाहण्यासारखा आहे. इतके नयनरम्य दृष्य फार क्वचित पाहायला मिळते. पहाटे उठून प्रवासी सूर्योदयाची वाट पाहतात. हळुहळु आसमंत लालसर व्हायला लागते. झुंजूमुंजु लागण्याचे वेळी होणारा पक्ष्यांचा किलबिलाट व हळुहळु होणारा, मन मोहरुन टाकणारा सूर्योदय पाहतांना हिमशिखरे चमचम करतात. एक नवी प्रेरणा, उल्हास प्रवाशांना येथे जाणवतो.

पिडारी ग्लेशियर

कौसानीपासून ५८ किलोमीटर अंतरावरील हे स्थान निसर्ग सौंदर्याने बहरलेले आहे. येथे निवासाची व्यवस्था नाही परंतु काही तास थांबण्यासाठी पर्यटक उत्सुक असतात.

सूर्यास्त

कौसानीचा सूर्यास्त नयनरम्य आहे. उंचीवरुन हळुहळु सूर्य मावळतीच्या किनारी लुप्त होत जातो त्यावेळी उमटणारे इंद्रधनुचे रंग व त्या रंगछटा हिमच्छादित पर्वतावर उमटतात त्यावेळचे दृष्य डोळयात सामवणारे नसते. प्रवासी पाहातच राहतात. सूर्यास्त होऊन रात्रीचे नक्षत्रमंडळ आकाशात आलेले असते आणि शाल पांघरुन प्रवासी बाजारात फिरायला, खरेदी करायला किंवा हॉटेल मध्ये जायला निघतात. कौसानीला येण्याचा उद्देश पूर्ण झालेला असतो.

बागेश्वर मंदिर, बैद्यनाथ मंदिरांना प्रवासी भेट देतात.

उत्तर प्रदेशातील लोक येथे सहल म्हणून अवश्य येतातच पण भारतातील आणि परदेशातीलही प्रवासी येथे येऊन आनंद घेऊन परततात हे विशेष !

* * *

मनमुग्धा मसुरी !

मसुरी ! उत्तरप्रदेशातील एक निसर्गरम्य स्थळ ! मनमुग्धा मसुरी ! आकर्षक आणि सदाबहार मसुरी ! दऱ्यातील हिरवे मोहक सौंदर्य दर्शविणारी मसुरी ! पर्वतराजींमध्ये स्थित असलेली मसुरी !

समुद्रसपाटीपासून २००६ मीटर उंचीवर पर्वतांच्या वर्तुळाकार टोकावर मसुरी पर्यटन स्थळ आहे. भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर असलेले हे प्रसिध्द स्थळ आहे. प्रवाशांच्या गर्दीने सदैव भारलेले आणि सृष्टी सौंदर्याने नटलेले हे स्थळ आकर्षणाचा केन्द्रबिंदू आहे ! पहाडी पर्यटन स्थळ (हिल स्टेशन) म्हणून ते गौरविले जाते !

जुलै ते सप्टेंबर हे अती पावसाचे तीन महिने वगळता येथे केंव्हाही भेट देता येते. मात्र डिसेंबर, जानेवारी महिन्यात बर्फ पडतो त्यावेळी रस्ते बंद होतात. ऑक्टोंबर नोव्हेंबर तसेच फेब्रुवारी या महिन्यात खूप तीव्र स्वरुपाची थंडी असते पण त्या काळात प्रवासी येथे येत असतात. आम्ही हिवाळयात म्हणजे नोव्हेंबर महिन्यात याठिकाणी भेट दिली. सामान्यपणे पर्यटक मार्च ते जून या काळात प्रचंड संख्येत येथे भेटी देतात. त्यावेळी हॉटेल्स,लॉज, धर्मशाळा तसेच बसचे पूर्व आरक्षण करुन ठेवावे लागते अन्यथा अक्षरशः स्टेशनवरील उघडया जागेत निवास करण्याची पाळी येते. उन्हाळयातील प्रवाशांची संख्या प्रचंड असते.

आम्ही दिल्लीहून सकाळी ५ वाजता बसने निघालो. दुपारी ११ वाजता देहरादूनला येऊन पोहोचलो व १ वाजता मसुरीला आलो. दिल्ली, सहरानपूर,

हरिद्वार, देहरादून, येथून नियमित स्वरुपात बस व्यवस्था आहे. रेल्वे मार्गाने देहरादून पर्यंत येऊन नंतरचा प्रवास बसनेच करावा. देहरादूनहून टॅक्सी, मॅटॅडोर, मिनीबस सेवा तत्पर आहेत. तेथून तसेच दिल्लीहून प्रवासी संस्थांची आरामदायी बस सेवा आहे ती जास्त सोयीची पडते. अर्थात त्यांचे भाडे दर जास्त असतात.

वायुमार्गाने प्रवास करणाऱ्यांना देहरादून विमानतळावर उतरावे लागते. तेथून बस मार्गे मसुरीला जावे लागते.

दिल्ली ते देहरादून हा मार्ग सरळ स्वरुपाचा आहे. देहरादून शहर असल्यामुळे तेथे हॉटेल्स, लॉजची व्यवस्था आहे. तेथून पर्वतराजींमधून वर्तुळाकार प्रवास सुरु होतो. शिवलिक पर्वतामधून, हिरव्या वृक्षराजींनी आच्छादिलेल्या मार्गावरुन बस जात असते. बसचा वेग हळू असतो पण निसर्ग अवलोकन करतांना वेळ कसा गेला ते कळत नाही. ३६ किलोमीटर अंतर कापून आपण नयनरम्य पर्वतराजीच्या शिखरस्थानी येतो ! यात्रा कर भरुन मसुरी स्टेशनवर बस थांबते ! सभोवतीच्या सर्व दृष्यांचे आकर्षण असते ! हॉटेल्सचे एजंन्ट, सामान नेणारे कुली यांची एकच धांदल उडालेली असते ! सर्वचजण आपल्या भोवती असतात. अशावेळी आपले पूर्व आरक्षण झाले असेल तर ठीक अन्यथा एखाद्या हॉटेलचे नाव सांगून प्रथम सुटका करुन घ्यावी लागते.

हॉटेलचे नांव	पत्ता	फोन नं.
पॅराडाईज हॉटेल कॉन्टीनेंटल	द माल	-
दीप हॉटेल	द माल	२४७०
स्नो व्हयू हॉटेल	लायब्ररी बाजार	-
माऊंटेन व्हयू हॉटेल	द माल	२९७०
होटल ग्रॅबीयल	रोजइन स्टेट	२२०१। २८४८
हॉटेल अलका	कुरली बाजार	-
टुरिस्ट बंगला	द माल	-
दून व्हयू हॉटेल	कुरली बाजार	५०६
हिल क्विल हॉटेल	द माल	२४९७
हॉटेल नाज	कुरली बाजार	३०९

नीलम इंटरनॅशनल	न्यु मार्केट	२४९५
रौकसी हॉटेल	द माल	२७४१
सेव्हॉय हॉटेल	द माल	२५१०
वैली न्यु हॉटेल	द माल	२३२४
चालनट ग्रीव हॉटेल	द माल	-

(संदर्भ - पर्यटन विभाग - मसुरी)

याशिवाय खूप संख्येत हॉटेल्स व किमानपक्षी शंभराच्या संख्येत लॉज आहेत. धर्मशाळा आहेत. वरील सर्व हॉटेल्स तारांकित असून प्रतीदिवस १०ते ३०० रु. पर्यंत भाडे दर आहेत. उपहारगृहे भोजनासाठी, उपहारासाठी मोठया प्रमाणावर आहेत. थंडीमुळे एक्स्प्रेसो कॉफीची दुकाने आहेत तर उन्हाळा म्हणून आईस्क्रीम पार्लर्सही आहेत. पर्यटकांनी आपापल्या सोयीनी निवास व्यवस्था निश्चित करावी.

येथे पहाडावर हॉटेल्स, लॉज, धर्मशाळा व निवासस्थाने एकेका मजल्यावर असावीत अशी आहेत. स्टेशनपासून बाजारपेठ, हॉटेल्स, रोपवे इ. सर्व ठिकाणी पायीच फिरावे लागते कारण सर्वत्र चढण असलेला मार्ग आहे. फार थोडया अंतरापर्यंत टॅक्सी येऊ शकते. आपले सामान नेण्यासाठी कुली असतात. येथे मार्गदर्शक आहेत. ते प्रशिक्षित नाहीत मात्र माहिती व्यवस्थित सांगतात.

शिखरस्थळे दाखवून आणण्यासाठी दर्शन बस सेवा आहे त्याचे पूर्वीच आरक्षण करावे लागते. दोन दिवसांचे आरक्षण झालेले असते. प्रवाशांची संख्याधच इतकी जास्त असते की बसची संख्या वाढवूनही कमीच पडते. टॅक्सी मीटर दराने उपलब्ध आहेत.

बाजारपेठेत कलात्मक वस्तु, लोकर, लोकरीचे स्वेटर्स व अन्य सर्व वस्तु ची दुकाने आहेत. बँका, (स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया) फोटोग्राफर्स, दवाखाने, शाळा, स्पोर्टस् क्लब, कॉलेज, दोन चित्रपटगृहे इत्यादी सर्व साधने येथे उपलब्ध आहेत. मात्र सर्व वस्तु च्या किंमती जास्त आहेत ! तीच व्यापाऱ्यांची कमाई आहे. विदेशी पर्यटकांसाठी भाव दुप्पट होऊन जातात. बाजारपेठ व हॉटेल्स

सकाळी दहानंतर उघडतात व सायंकाळी ८ वाजता बंद होऊन जातात. स्वतःजवळ कॅमेरा असणे अधिक चांगले कारण येथील मनोरम दृष्ये सहजगत्या टिपता येतात.

गनहिल पहाडी :- रोपवे मार्गाने या हिलवर पोहोचता येते रज्जुमार्गाने आपण ४०० मीटर उंचीवर पोहोचतो. यासाठी आरक्षण आणि पर्यटकांची मोठी रांग असते. पहाडीवरुन गंगोत्री, हिमालयाची बर्फाळ शिखरटोके दिसतात.

चाइल्डस लॉज :- ४ किलोमीटर अंतरावर येथील सर्वात उंच असलेले शिखर स्थान ! तेथून दूरवरचे दृष्य सुंदर दिसते. सगळीकडे हिरवी वृक्षराजी, पर्वतांच्या रांगा पसरलेल्या दिसतात.

कॅम्टी फॉल :- बारा किलोमीटर अंतरावर एक मनोरम धबधबा (जलप्रपात) आहे. पर्वतातून बारा धारा कोसळत असतात. प्रवासी तेथे स्नानाचा आंनद लूटतात. धबधब्याचा आवाज जबरदस्त आणि पहाडीपणास शोभेसा आहे.

धनोल्टी :- २४ किलोमीटर अंतरावर हे स्थान आहे. तेथे देवदार वृक्षांची शोभा पाहायला मिळते येथून हिमालय दिसतो व रम्य दृष्य अवलोकन करायला मिळते.

कमलसवक रोड :- मसुरीचा हा मध्य रस्ता आहे. अतिशय उंचीवर आहे. कुलरी बाजार ते लायब्ररी रोड पर्यंत आहे. येथे लोखंडी कठडे, बसण्यासाठी सिमेंटची आसने आहेत. येथून सूर्यास्ताचे दृष्य अतिशय सुंदर दिसते. सूर्यास्तानंतर रात्रीला खाली दरीमध्ये ठिकठिकाणी असणाऱ्या हॉटेलसमधील दिवे दिसतात. तसेच दूरचे देहरादूनचे प्रकाश दिवे दिसतात. येथे पर्यटकांची गर्दी असते.

नागटिब्बा :- ४२ किलोमीटर अंतरावर घनदाट जंगल आहे. जंगलातील प्राणी येथे पाहायला मिळतात.

म्युनिसीपल गार्डन :- ४ किलो मीटर अंतरावर एक सुंदर पुष्पवाटिका तयार करण्यात आली आहे. नैसर्गिक वृक्ष संपदा आहेच शिवाय नियोजित स्वरुपाची बाग आहे. अन्य पर्यटन स्थळी अतिशय गर्दी असते. अशावेळी पर्यटक

येथे मजा लूटतात. याठिकाणी नौकाविहाराची व्यवस्था आहे. तेथेही आरक्षण करुन मगच नौकाविहार करावा लागतो.

याशिवाय मसुरीची सौंदर्यस्थळे पायी फिरुन पाहण्यात जास्त आनंद आहे. पर्यटकांची गर्दी एवढी असते की सर्वच स्थळे एकदम पाहणे होऊ शकत नाही किमान चार दिवस तरी निवास करावा लागतो. अर्थात हे पर्यटन स्थळ इतके मनोहर आहे की येथून निघतांना पाय हालत नाही. अशा नितांत रमणीय आणि मनमुग्ध करणाऱ्या मसुरीला एकदा भेट देणे आवश्यक आहे !

* * *

विकासाची तृष्णा असलेला

चिखलदरा

नि सर्ग सान्निध्यात त्यातील प्रसन्नता व मार्दव मनविभोर करीत असते. विविध ठिकाणी सृष्टीसौंदर्यांची ही किमया विस्तारली आहे. आधुनिक काळात शहरे वाढतील. उद्योग व प्रमंडळे वाढतील. औद्योगीकरण वेगाने झाले, त्याचा परिणाम भौतिक विकासात झाला. नवनवीन क्षेत्रे उदयास आलीत. नवे तंत्र विकासमान झाले व या नवीन वातावरणात व्यक्तीही समाविष्ट होत गेल्या. नवीनतेच्या प्रगतीच्या देणगीसोबत काही अपरिहार्य दुष्परिणामही सहन करावे लागतात. प्रदूषण, अनारोग्य, मानसिक ताण, संघर्ष इत्यादी व्यक्ती जीवनात हानिकारक असलेल्या घटकांचा परिणाम सतत होत असतो. या दुष्परिणामांच्या चक्रातून मोकळीक काढणे म्हणजे निसर्गरम्य ठिकाणी पर्यटन करणे हाच उपाय असतो.

निसर्ग सान्निध्यात व्यक्तीचे आरोग्य उत्तम होत असल्यामुळे वर्षातून एकदा तरी पर्यटन करावे हा बऱ्याच जणांचा उद्देश असतो. टवटवीतपणा कायम ठेऊन आकर्षणाचा एक तरंग निर्माण करणे हे निसर्ग सौंदर्याचे वैशिष्टय आहे. याच वैशिष्टयांनी व्यक्ती पर्यटन स्थळांकडे आकर्षित होतात

चिखलदरा

हिरव्यापर्ण वनराजींच्या सप्तकारात सामावलेले निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणजे चिखलदरा होय ! ऐतिहासिक, नैसर्गिक व कलात्मक पैलूंचा साज चिखलदऱ्यास प्राप्त झाला आहे. उत्तर-दक्षिण पसरलेल्या सातपुडा पर्वतांच्या दक्षिणेकडील शेवटच्या सात पर्वतांच्या समुद्र सपाटीपासून १११८.६ मीटर उंच असलेल्या मध्यावधी पर्वतावर स्थिरावलेले चिखलदरा हे गाव आहे. याचा परिसर १५.९८ चौ. कि. मीटर असून येथे १५४८ मि.मी. पाऊस पडत असतो.

महाबळेश्वर प्रमाणेच चिखलदऱ्यास सृष्टीसौंदर्याचे वरदान लाभलेले आहे. येथील शिखरस्थाने प्रेक्षणीय आहेत. परतवाडयानंतर पर्वताच्या सात रांगांतून दोन तास वर्तुळाकार प्रदक्षिणा करीत एस.टी. बस सातपुडयाच्या सर्वोच्च शिखरावर येते व चिखलदऱ्याची आपले स्वागत करीत आहोत." ही शद्बफुले पर्यटकांचे स्वागत करतात. नागपूरपेक्षा उन्हाळा फारच सौम्य पण जाणवतो. हिवाळा मात्र आल्हादकारक असतो.

शिखरस्थाने

एस.टी. स्टँडपासून हरीकेन शिखरस्थान २.४ कि.मी. अंतरावर आहे. समोर व बाजुला प्रचंड दरी आहे. आपली दृष्टी एका विशिष्ट अंतरापर्यत जाऊ शकते इतक्या उंचीवर आपण असतो. सभोवतालचे दृष्य मोहक दिसते. अवलोकन करण्यासाठी समोर लोखंडी कठडा आहे. एकाचवेळी दहा व्यक्ती सृष्टीसौंदर्य पाहू शकतात. हरीकेन पॉईंट पर्यटकांना जास्त आकर्षित करतो.

स्टँडपासून १.६ कि.मी. अंतरावर देवी शिखरस्थान आहे. शिखरस्थानावरुन थोडे खाली असलेले देवी मंदिर पायी जाण्यासाठी सुलभ आहे. या स्थानावर लोखंडी कुंपण नाही. बाजूने हरणांचा कळप जाताना दिसतो. दाट वनश्रीमुळे येथून दिसणारे दृष्य रमणीय भासते.

मोझरी शिखरस्थान २.४ कि.मी. अंतरावर, तर विराट शिखरस्थान जास्त उंचीवर असल्यामुळे विहंगावलोकन करता येते.

विराट शिखरस्थान चिखलदऱ्याच्या पश्चिमेला आहे, तर पूर्वेला ९ कि.मी. अंतरावर भीमकुंड आहे. तीन पर्वतांच्यामध्ये हे शिखरस्थान आहे. ४ हजार फूट उंचीवरुन पाण्याच्या शुभ्रधारा कोसळतांना पाहायला मिळतात. पर्वतावर दाट वनश्री आहे. शिखर स्थानावर विस्तृत जागा आहे. एकाच वेळी ५० व्यक्ती सृष्टी सौंदर्याचे अवलोकन करु शकतात. या शिखरस्थानापर्यंत बस जाऊ शकते. पायी जाण्यासाठी पर्यटकांना हे शिखरस्थान फार लांब वाटते.

१.६ कि.मी. अंतरावरील वना उद्यान हे प्रशस्त, नियोजित म्हणून तितकेच प्रेक्षणीय उद्यान आहे. उद्यानामध्ये लहान मुलांच्या खेळण्याची साधने, कारंजी व सुंदर पुष्पवाटिका आहेत. कलात्मक रीतीने उद्यान सजविले आहे. चिखलदरा पर्यटनस्थळाच्या सौंदर्यात उद्यानाने भर टाकली आहे. अशाच स्वरुपाच्या ३-४ उद्यानांची निर्मिती शासनातर्फे होत आहे.

येथील एक आकर्षण म्हणजे गाविलगड किल्ला होय. किल्ल्यास तटबंदी, बुरुज व दरवाजा प्रशस्त स्वरुपाचा आहे. आत प्रवेश केल्यावर किल्ल्याचे विस्तीर्ण स्वरुप लक्षात येते. किल्ल्याचा बराचसा भाग मोळकळीस आला असला तरी काही ठिकाणी त्याचे मजबूत स्वरुप लक्षात येते. किल्ल्यातील वाडयाच्या खांबांवर व दरवाजांवर नक्षीकाम व प्राचीन कलाकृती आढळते. किल्ल्यामध्ये नीरव शांतता असते. दुर्गम वाटेमुळे बऱ्याचशा पर्यटकांना किल्ला पाहता येत नाही.

अभयारण्य व मेळघाट वाघ प्रकल्प

अभयारण्यात प्रवेश करण्यापूर्वी वनविभागाची परवानगी घ्यावी लागते. 'प्राण्यांना पाहणे' हा आनंद सृष्टी सौंदर्याचा आस्वाद घेत असतांना पूर्व परवानगीने लुटता येतो. या प्रकल्पाच्या मध्यभागी वनविभागाचे कोल्काज रेस्ट हाऊस आहे. अभयारण्य चिखलदऱ्याच्या सातही पर्वतराजींमध्ये विस्तारलेले आहे, याची जाणीव परतवाडयाहून दोन पर्वत उंच गेल्यावर अरण्यात जाण्यासाठी फाटक आहे. तेथूनच होते. मात्र सध्या सुरुवातीला काही गावे मध्ये असल्यामुळे प्रथम विरळ स्वरुपाचे व त्यानंतर घनदाट अभयारण्याची सुरुवात होते. अरण्यात गवा, हरीण, चित्ता, सांबर, जंगली डुक्कर, आस्वल, जंगली कुत्रे, लांडगे, कोल्हे यांचा संचार आहे. वनविभाग व पर्यटन विभागाद्वारे उपलब्धता असल्यास जीप, सर्चलाइट व

बंदुकधारी शिपाई अशी व्यवस्था होते व ही आवश्यक आहे. हिवाळयात हरणांच्या कळपाव्यतिरीक्त प्राणी फारसे पाहायला मिळत नाहीत, पण उन्हाळयात रात्री सर्चलाइटच्या शुभ्र प्रकाशात सर्व प्राणी पाहायला मिळतात. प्रवाशांसाठी हा अनुभव थरारक असतो. आस्वलांची संख्या बरीच असल्यामुळे त्यापासून सावधान राहा, अशा पाटया जागोजागी दिसतात.

१५७१ चौ. कि. मी. विस्ताराच्या अभयरण्यात ' स्वतंत्र वाघ प्रकल्प ' आहे. १६ वाघ येथे असून ५२ वाघ सभोवतीच्या अभयारण्यात आहेत. १९८५ मध्ये वाघांची संख्या ७० असल्याचे वन विभागाने स्पष्ट केले आहे. देशातील अकरा प्रकल्पांपैकी हा एक प्रमुख व्याघ्र प्रकल्प आहे. अर्थात वाघ प्रत्येक वेळी पहायला मिळेलच असे नाही पण उन्हाळयाच्या रात्री तलावाजवळ वाघ पाहायला मिळतो.

याशिवाय सक्कर पॉईंट, लॉंग पॉईंट, प्रॉस्पेक्ट पॉईंट, वीर तलाव, कालापानी टँक इत्यादी प्रेक्षणीय स्थाने आहेत.

अपूरे व्यवस्थापन

चिखलदरा पर्यटनस्थळ म्हणून निश्चितच प्रेक्षणीय आहे, पण तेथे पर्याप्त व्यवस्थांचा मात्र अभाव आढळतो. कोणत्याही पर्यटनस्थळी किमान निवास, भोजन, मार्गदर्शक व वाहतूक या व्यवस्था असणे आवश्यक आहे. चिखलदरा येथे गेस्ट हाऊस, हॉलिडे होम्स अशी शासकीय निवास व्यवस्था व एक धर्मशाळा आहे. लॉज व तारांकित हॉटेल्सचा अभाव आहे. हॉलिडे होम्समध्ये २२, विश्रामगृह व डाकबंगला येथे १५, नगरपरिषदेच्या हॉलमध्ये २० अशा एकूण ५७ व्यक्तींचा निवास एकावेळी होऊ शकते. प्रत्यक्षात मोसमामध्ये १०,००० व्यक्ती या स्थळाला भेट देत असतात, असे आढळले. म्हणजेच चिखलदरा येथे निवास करुन निवांतपणे शिखरस्थाने पाहणे पर्यटकांना केवळ अशक्य आहे. शासकीय निवासस्थानात पूर्व आरक्षण करावे लागते व हॉलिडे होम्समध्ये फक्त काही सोयीच उपलब्ध आहेत. हे लक्षात घेतले म्हणजे व्यवस्थांचे अपर्याप्त प्रबंन दिसून येते. हॉटेल्सची परवानगी मिळाल्यास व्यापारी, लॉज, धर्मशाळा बांधण्यास उत्सुक आहेत. नगर प्रशासनाला प्रवासी कराच्या माध्यमातून उत्पन्न चांगले आहे.

खर्च वजा जाता शिल्लक रक्कम असताना त्याचा विनियोग व्यवस्थापनाकडे होत नाही. यात धोरणात्मक अडचण असल्याचे सांगितले जाते. पश्चिम महाराष्ट्रात मात्र शासकीय निवासस्थाने तसेच खाजगीस्तरावर लॉज, हॉटेल्स मोठया प्रमाणावर आहेत. परतवाडयास २ लॉज व १ हॉटेल आहे. अमरावती येथे ७ लॉज व आधुनिक सोयींनी सुसज्ज असलेली ४ हॉटेल्स आहेत परंतु अमरावती येथे निवास करुन चिखलदऱ्याचे सौंदर्य अनुभवता येत नाही.

भोजन व्यवस्थाही तोकडी आहे. एक शासकीय स्तरावरील कॅन्टीन व तीन उपहारगृहे एवढीच काय ती व्यवस्था ! शाकाहारी व मांसाहारी भोजन उपलब्ध आहे पण त्याचा दर्जा उत्तम नाही. शिखरस्थाने दाखविण्यासाठी मार्गदर्शक व्यवस्था अपूरी आहे. फक्त ४ गाईडस् उपलब्ध आहेत. शासनाचा अधिकृत गाईड तसेच प्रशिक्षित मार्गदर्शक नाहीत. त्यामुळे पर्यटक चांगली शिखरस्थाने न पाहताच परत येतात.

नागपूरहून २२५ कि. मी. अंतरावर चिखलदरा आहे. तेथे बस, जीप, मोटार याच साधनांनी जाता येते. रेल्वे मार्ग उपलब्ध नाही. अमरावतीहून चिखलदऱ्यासाठी बस व्यवस्था सकाळी-सायंकाळी तीनवेळा उपलब्ध आहे. पॉईंटस् पाहण्यासाठी दर्शन बससेवा पूर्वी उपलब्ध होती नंतर ती बंद करण्यात आली. उन्हाळयात एक महिना ही सेवा उपलब्ध असते. ती आवश्यक आहे कारण शिखरस्थाने फार लांब अंतरावर आहेत. विदर्भातील प्रवासी संस्थांना विदर्भात प्रवास करण्यासाठी लायसन्स उपलब्ध नाही, हे विशेष होय. त्यांना पश्चिम महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांना भेटी देता येतात पण आर. टी. ओ.च्या नियमानुसार विदर्भात मात्र सहल आयोजित करता येत नाही, असे मत प्रकाश ट्रॅव्हल्स, लक्ष्मी ट्रॅव्हल्स, महालक्ष्मी ट्रॅव्हल्स, सन्मित्र प्रवासी मंडळ, यशश्री ट्रॅव्हल्स इ. च्या संचालकांनी व्यक्त केले आहे. एस.टी. व महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळ यांनाच सहल आयोजित करता येते. खंर म्हणजे या प्रवासी संस्थांनी विदर्भातील प्रवासी प्रवृत्ती वाढविली, स्थिरपद केली व प्रवासाचे एक वातावरण तयार केले. त्यांनाच खाजगी स्तरावर विदर्भात प्रवास करता येऊ नये, हे दुर्दैव होय !

व्यवस्थापनाचे अन्य घटक - बाजारपेठ, अधिकोष, टॅक्सी- ऑटोसेवा, मनोरंजन, फोटोग्राफर्स इत्यादी संदर्भातील व्यवस्थाही अत्यंत अपुऱ्या आहेत.

वरील व्यवस्थापन लक्षात घेतले म्हणजे चिखलदरा हे रमणीय पर्यटनस्थळ असूनही अविकसित असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र शासनाने पश्चिम महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांच्या विकासाकडे जसे विशेष लक्ष पुरविले व ती स्थळे विकसित झालीत तसे चिखलदऱ्याचे बाबतीत घडले नाही. विदर्भातील विकासाच्या एकूण संदर्भातच अन्याय होत असतो. औद्योगीकरणाला गती नसल्यामुळे खाजगी क्षेत्रही दुर्लक्षित राहिले. वास्तविक पाहता या पर्यटन स्थळाला उत्पन्न प्राप्ती चांगली आहे. त्याच्यांत विकासक्षमता आहे पण शासनाद्वारे ती कार्यान्वित होऊ शकली नाही. पर्यटन महामंडळाने जुजबी लक्ष पुरविले. चिखलदरा, रामटेक वगळता अन्य ठिकाणी पर्यटन विभागच अस्तित्वात नाही. वनविभागाच्या मर्यादाही तशाच आहेत. चिखलदरा येथे पर्यटकांची संख्या खूप असते. त्यांना तेथे निवास करावासा वाटतो पण केवळ व्यवस्थांच्या अभावी अमरावतीला परत यावे लागते. महाबळेश्वर येथे शासकीय व खाजगी दोन्ही क्षेत्रातील व्यवस्था समृध्द आहेत. तशी स्थिती येथेही असायला पाहिजे. पर्यटन महामंडळाची पुनर्रचना केल्याशिवाय व शासनाने पर्यटनतज्ज्ञांची समिती नेमल्याशिवाय पर्यटन स्थळांचा विकास होणे शक्य नाही. चिखलदरा सृष्टीसौंदर्यात मागे नाही, हे निश्चित ! पर्यटक व पर्यटन स्थळ दोघे ही विकासाची वाट पाहात आहेत... !

* * *

निसर्गाचे वरदान लाभलेले

मनोवेधक महाबळेश्वर

महाबळेश्वर ! महाराष्ट्राला अभिमान वाटणारे व सदैव आनंद देणारे पर्यटन निधान ! निसर्गाचे विलोभनीय वरदान लाभलेले मनोवेधक स्थळ ! सकाळची प्रसन्न पहाट दर्शविणारा सूर्योदय ! अपूर्व पराक्रमाची साक्ष देणारा प्रतापगड ! अद्‌भुतरम्य ऑर्थरसीट पॉईंट ! जावळीचे घनदाट बन ! सायंकाळचा सोनेरी सूर्यास्त ! सृष्टीचे अशी सुरम्य उधळण येथे पहायला मिळते ! येथे भेट देणारा प्रत्येक पर्यटक ही सर्व सहयाद्रीची सोनेरी रुपे पाहताना मोहरतो, सुखावतो ! म्हणूनच या पर्यटनस्थळी उत्सवाचे उधाण आलेले स्वरुप पाहायला मिळते.

महाबळेश्वर महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून, भारताचे तसेच आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे पर्यटन केंद्र मानले गेले आहे.

समुद्रसपाटीपासून १३५२ मीटर उंचीवरचे हे शिखर स्थळ आहे. कृष्णा, कोयना, सावित्री, वेणा, सोलशी या पाच नद्यांचा उगम येथे आहे. ६६३५ मि.मि. पाऊस येथे कोसळतो. पावसाळयात येथील रौद्र रुप एकदा पाहण्यासारखे आहे. भरपूर पाऊस पडत असल्यामुळे उन्हाळयातही ही उंचीवरचे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे. एकूण परिसर १४५ चौ. कि. मीटरचा आहे. आक्टोबर ते जून मध्यापर्यंत व विशेषतः मार्च, एप्रिल व मे हे महिने येथे राहण्यासाठी

अतिशय सुखावह मोसमाचे आहेत. संपूर्ण परिसर मराठी भाषिकांचा आहे, पण व्यावसायिकांची भरपूर गर्दी असल्यामुळे गुजराथी, हिंदी व इंग्रजी भाषेचे अस्तित्व जाणवते.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

या पर्यटनस्थळाला एक ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. महाबळेश्वराचे प्रसिध्द मंदिर आहे. धार्मिक व सांस्कृतिक वातावरणाचा वारसा येथे आहे. जावळीचे जंगल, प्रतापगड, वाई, पाचगणी ही ठिकाण शिवकालीन सत्यता दर्शवितात. अफझलखानाचा वध ज्या प्रतापगडावर झाला तो सगळा इतिहास पर्यटकांसमोर मार्गदर्शक उभा करतात.

१८२४ मध्ये जनरल लुडवीक हा साता-याच्या राज्याच्या सांगण्यावरुन महाबळेश्वरला भेट देणारा पहिला ब्रिटिश अधिकारी ! महाबळेश्वराचे अप्रतिम सृष्टिलावण्य पाहून तो आश्चर्यचकित झाला. त्याने उन्हाळयात हे थंड हवेचे ठिकाण राहण्यासाठी पसंत केले. निवासस्थाने बांधलीत व पॉईंट्सला कटघरे करुन प्रवासी पाहू शकतील अशी व्यवस्था केली. १८२८ पासून पर्यटक या स्थळाला भेट द्यायला लागले.

सृष्टिलावण्य

महाबळेश्वरास सृष्टिलावण्य लाभलेले आहे. येथील सर्व शिखरस्थाने सहयाद्रीचे कणखर पण तितकेच मोहक स्वरुप पर्यटकांना उलगडून दाखवितात. **(१) ऑर्थरसीट पॉईंट -** समुद्र सपाटीपासून १३४७.५ मीटर उंचीवरील हे प्रसिध्द शिखरस्थान ! खाली प्रचंड दरड आहे. येथून रायगड, तोरणा आणि कांगिरी गड दिसतात. अत्यंत मनोहारी दृश्य या पॉईंटवरुन पहावयास मिळते. सृष्टी सौंदर्य पाहण्यासाठी लोखंडी कटघर आहे. शंभर प्रवासी एकावेळी येथून दृश्य पाहू शकतात. **(२) हंटर पॉईंट -** समुद्रसपाटीपासून १२९०.८२ मीटर उंचीवरील शिखरस्थान ! जुन्या महाबळेश्वर रोडपासून पायी जाण्याच्या अंतरावर आहे. समोरील प्रतापगड व कोयनेचा उगम येथून पहावयास मिळतो. (३)

एलिफिस्टन पॉईंट - १२७५ मीटर उंचीवरील या स्थानावरुन विहंगावलोकन करता येते. सभोवतालचे दृश्य पर्यटकांचे मन वेधून घेते. (४) **कॅन्नॉट पॉईंट** - बस स्टँड पासून ३८ कि.मी. अंतरावर व १३८५ मीटर उंचीवरील हे शिखरस्थान ! कृष्णेचा उगम आणि वेणा तलाव येथून पाहावयास मिळतो.

जुने महाबळेश्वर मंदिर - १३३१ मीटर उंचीवरील शिखरावर हेमाडपंथी स्वरुपाचे भव्य शिवमंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या मंदिराचा जीर्णोद्वार केला होता. मंदिराचे बांधकाम जुने असले, तरी मजबूत आहे. छत तसेच खांबावरील नक्षीकाम जुन्या सुंदर कलाकृतीची साक्ष देतात. मंदिराच्या प्रारंभी गोमुख आहे. तेथे वेणा, सावित्री व गायत्री यांच्या उगमाजवळचे पाणी स्नानासाठी उपलब्ध आहे. पंचगंगा मंदिर या नावाने ते प्रसिध्द आहे. श्रीराम मंदिर व रामदास स्वामींनी स्थापन केलेले हनुमंताची मंदिरे सभोवती आहेत. मंदिरामध्ये अभिषेक, पूजा होत असल्यामुळे येथे यात्रेचे स्वरुप आढळून येते. **काटे पॉईंट** - १२८९ मीटर उंचीवरील शिखरस्थान ! येथून कृष्णाचे खोरे, कमलगड, पांडवगड आणि महादेवगड यांची शिखरे दिसतात. **लिंगमाला धबधबा** - एस.टी. स्टँडपासून ६ कि.मी. अंतरावर हा धबधबा पाहावयास मिळतो. समोरच्या पर्वतामधून पांढ-या शुभ्र धारा खोलवर पडताना दिसतात. सभोवती दाट हिरवी झाडी आहे. **वेणा तलाव** - एस.टी. स्थानकापासून २.४ कि.मी. अंतरावर हा तलाव आहे. या ठिकाणी जलविहारासाठी आधुनिक स्वरुपाच्या नौका आहेत. एक प्रशस्त सुदंर फुलांनी सजलेला बगीचा आहे. **विल्सन पॉईंट**- सकाळचा सुरम्य, सूर्योदय पाहण्यासाठी प्रसिध्द असलेले हे शिखरस्थान, १४३५ मी. म्हणजे सर्वाधिक उंचीवरचे ! सकाळी ५.४५ पासून पर्यटक गदीने येथे जमतात व सूर्योदयाची मजा घेतात. **बॉम्बे पॉईंट** - शिखरस्थानामधील प्रसिध्द ठिकाण ! येथून प्रतापगड न्याहाळता येतो. महाबळेश्वर-मुंबई हा मार्ग स्पष्ट दिसतो. शिखरांच्या रांगेतील हे शेवटचे शिखर होय. सूर्यास्त पाहण्यासाठी दररोज ५ हजार पर्यटक येथे एकत्र येतात. सूर्यास्ताची सोनेरी छटा कमी कमी होते, लालसर लाली हळूहळू कमी होत लुप्त होते. एक अत्यंत सुदंर निसर्गचित्र पाहिल्याच्या समाधानात पर्यटक निवासाकडे परततात.

छत्रपतींनी बांधलेला प्रतापगड पाहणे एक रोमांचक अनुभव आहे. महाबळेश्वरपासून २४ किलोमीटर अंतरावर गड आहे. अफझलखानाचा वध येथेच झाला. किल्ला १३०० मीटर उंचीच्या शिखरावर बांधलेला आहे. सभोवती दाट हिरवीकंच झाडी आहेत. महाबळेश्वर शिखर आणि प्रतापगड यांचे मध्ये पाच नद्यांचे खोरे आहे. गडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा आहे. गडाचा परिसर चांगलाच मोठा आहे. गडावर भवानी देवीचे मंदिर , छत्रपतींची राजसभा, बाजारपेठेची जागा, अश्वशाळा, दोन मोठे तलाव आहेत, गडाखाली थोडया अंतरावर अफझलखानाची कबर आहे. दोन्ही ठिकाणी मार्गदर्शक उपलब्ध आहेत. गड अजूनही मजबूत आहे. गडाचा बुलंदपणा नजरेत भरतो. गडावरुन सभोवतालचे दृश्य मनोहर दिसते. जावळीचे बन, समोरचा महाबळेश्वर, खाली दाट झाडी व नद्यांचे खोरे, सहयाद्रीची शिखरे यामुळे अफझलखानाचे वधाचे वेळी हा गड किती दुर्गम असेल, याची कल्पना येते. छत्रपतींच्या असीम धाडसाची व पराक्रमाची अपूर्वाई चित्त वेधून घेते. **वाई** - महाबळेश्वरहून ३२ कि.मि. अंतरावर आहे. कृष्णा नदी, रजूनी मंदिरे, लोणारा, मेनावली गुहा पाहण्यासारखे आहेत. **पांचगणी** - वाईपासून १९ कि.मी. अंतरावर पुणे-महाबळेश्वर मार्गावर उंचीवरचे हे थंड हवेचे ठिकाण आहे. उटी, सिमला प्रमाणेच प्रेक्षणीय निसर्ग सौंदर्य पाचगणीला लाभलेले आहे. पारसी पॉईंट, सिडने पॉईंट पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. निवासासाठी १८अद्यायावत हॉटेल्स, ११२ उपाहारगृहे, हॉस्पिटल, बँका, मार्गदर्शक, फोटो स्टुडिओ, टॅक्सी, ऑटोरिक्षा इ. सर्व घटक सेथे सेवेस तत्पर आहेत.

येथे निवास व भोजन व्यवस्थेचा प्रबंध खाजगी आणि शासकीय स्तरावर उत्तम स्वरुपात उपलब्ध आहे. पंचतारांकित हॉटेल्स, लॉज प्रवाशांना सामावून घेण्यास तत्पर आहेत. ३८ तारांकित हॉटेल्स, १५० लॉज, महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाचे हॉलिडे होम, शासनाचे हॉलिडे होम, धर्मशाळा अशी साधारण ५,००० प्रवाश्यांना समावून घेणारी निवासाची व्यवस्था येथे अस्तित्वात आहे. मध्यम वर्गासाठी ३० ते ७५ रु. दरापासून १०० ते १५०० रु. दैनंदिन भाडे दर आहेत. शाकाहारी व मांसाहारी भोजन, महाराष्ट्रीयन, गुजराथी, मारवाडी, बंगाली दक्षिणी व वैष्णव पध्दतीचे भोजन उपहारगृह व हॉटेल्समध्ये उपलब्ध असल्यामुळे

प्रवासी समाधानी असतात. उन्हाळयात प्रवाशांच्या संख्येचा ओघ खूप मोठा असल्यामुळे पुण्याहून किंवा मुंबईहून पूर्व आरक्षण केल्याशिवाय निवासस्थान उपलब्ध होत नाही. हॉटेल सेव्हॉय, आनंदवन, भारत, अप्सरा, गिरिचिहार, सत्कार, शालीमार, श्रेयस, ड्रीमलँड, फाउंटेन, लक्ष्मी लॉज, पॅरेडाईज, ब्लू हेवन, पूनम येथील व्यवस्था उंची स्वरुपाची आहे.

येथे संपन्न बाजारपेठेचे अस्तित्व आहे. सुवर्ण-चांदीच्या जव्हेरीपासून लहान मुलांच्या खेळण्यापर्यंतची सर्व दुकाने आहेत. मोगरा, जाई-जुई, गुलाब या फुलांचे हार व गुच्छ, फळे, कलात्मक वस्तू इत्यादी विविध स्वरुपाची बाजारपेठ पर्यटकांना मोहवीत असते. रोजची विक्री लाखो रुपयांची असते. याशिवाय बँका, फोटोग्राफर्स, मार्गदर्शक, हॉस्पिटल, क्लब्ज इ. पर्यटन घटकांचे येथील अस्तित्व समाधानकारक आहेत. मात्र शहरी दरापेक्षा किंमती जास्त आहेत.

वेणा तलावात नौका विहाराची व्यवस्था आहे. ३० रु. प्रती प्रवासी दर आहे. पर्यटकांची गर्दी एवढी असते की दोन दिवस आधी आरक्षण करुन ठेवावे लागते. नौकाविहाराची व्यवस्था चांगलीच आहे.

वाहतूक व्यवस्थाही समाधानकारक आहे. मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, सांवतवाडी व गोवा येथे जाण्यासाठी एस.टी. बसेसची व्यवस्था आहे. खाजगी आरामदायी बसेस आहेत. पॉईंट्स दाखविण्यासाठी दर्शन बस प्रतापगडासाठी दुपारी उपलब्ध आहे. खाजगी टॅक्सी सेवा मोठया प्रमाणावर कार्यरत आहे. प्रति प्रवासी २० रु भाडे पडते. टॅक्सीने चार तासात सर्व पॉईंटस् पाहून परत येता येते. या शिवाय डोली, घोडे, ऑटोरिक्षा इ. साधने पर्यटकांची हौस पुरवितात.

पर्यटन महामंडळ महाबळेश्वर येथे अधिक सोयी करण्यासाठी प्रयत्नशील आहे. व्यवस्थांचा प्रबंध स्वस्त दरात व्हावा, यासाठी एक योजना शासनाकडे विचाराधीन आहे. प्रवाशांची संख्या वाढती असल्यामुळे विकासासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. महाबळेश्वरपासून शासनाला व अन्य सर्व घटकांना प्रचंड उत्पन्न प्राप्ती आहे. हे लक्षात घेऊन विकास योजना लवकर अंमलात आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. देशांतर्गत व विदेशी पर्यटकांचे महाबळेश्वर हे आंनद निधान आहे. प्रत्येकाने एकदा तरी या स्थळाला भेट देऊन निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घ्यायला हवा.

* * *

११५

डॉ. सतीश शास्त्री

जन्म ३१ जाने. १९५२, वसंतपंचमी, नागपूर येथे
एम. कॉम. पीएच.डी. (पर्यटन व्यवसाय) प्रपाठक, वाणिज्य-व्यवसाय प्रशासन,

पदव्युत्तर वाणिज्य विभाग सी. पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय नागपूर. अध्यक्ष, व्यासपीठ प्रबोधनकारी संस्था नागपूर. पर्यटन तज्ञ, सदस्य, इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग ॲन्ड डेव्हलपमेन्ट, नवी दिल्ली. आजीव सदस्य, इंडियन एन्व्हायरमेन्ट कॉंग्रेस असोसिएशन नवी दिल्ली. १९८७ मध्ये नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय विकास प्रशिक्षण परिषदेत पर्यटन तज्ञ म्हणून निमंत्रित व सहभागी.

निवास- ६२ अ, विद्याविहार, प्रतापनगर, नागपूर- ४४० ०२२. विदर्भातील पर्यटन व्यवसाय ' विषयावर संशोधनपर पीएच. डी. प्राप्त झाल्यानंतर त्याच क्षेत्रात सातत्याने संशोधन. विविध वृत्तपत्र व मासिकातून आर्थिक तसेच ललित विषयावरील लेख सातत्याने प्रसिध्द.

एक सृजनशील विचारवंत, प्रतिभासंपन्न वक्ते, वाणिज्य विषयाचे संशोधक आणि मराठी भाषेचे अभ्यासक म्हणून डॉ. सतीश शास्त्रींचा नांव लौकिक आहे. अशा या व्यासंगी, तज्ज्ञ संशोधकाच्या प्रासादिक शैलीतील कुलु, मनाली, कांगडा, चंबा, धर्मशाळा, डलहौसी, सिमला, हरिद्वार, ऋषिकेश, केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री, यमुनोत्री, नैनीताल, चिखलदरा, महाबळेश्वर, मसुरी, खजियार, अलमोडा, राणीखेत, अशा सौंदर्य स्थळांचे वर्णन असलेले पर्यटनाकरिता बहुमोल उपयुक्ततेचे, लालित्यपूर्ण आविष्काराचे, नितांत सुंदर, संग्राह्य पुस्तक !

पर्यटनाचे डोही आनंद तरंग

प्रकाशक
नचिकेत प्रकाशन, स्नेहनगर नागपूर - १५.

११५

डॉ. सतीश शास्त्री यांचे साहित्य

अर्थधारा (अर्थललित)

पर्यटनाचे डोही आनंद तरंग !

आगामी


पुत्र अमृताचे ! (लेखसंग्रह)

युगंधर (कादंबरी)

पर्यटन व्यवसाय स्वरूप आणि समीक्षा (प्रबंध)

वसंत वैभवाची नांदी ! (ललित)

डॉ. सतीश शास्त्री



एक सृजनशील विचारवंत, प्रतिभासंपन्न वक्ते, वाणिज्य विषयाचे संशोधक आणि मराठी भाषेचे अभ्यासक म्हणून डॉ. सतीश शास्त्रींचा नांव लौकिक आहे. अशा या व्यासंगी, तज्ज्ञ संशोधकाच्या प्रासादिक शैलीतील कुलु, मनाली, कांगडा, चंबा, धर्मशाळा, डलहौसी, सिमला, हरिद्वार, ऋषिकेश, केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री, यमुनोत्री, नैनीताल, चिखलदरा, महाबळेश्वर, मसुरी, खजियार, अलमोडा, राणीखेत, अशा सौंदर्य स्थळांचे वर्णन असलेले पर्यटनाकरिता बहुमोल उपयुक्ततेचे, लालित्यपूर्ण आविष्काराचे, नितांत सुंदर, संग्राहय पुस्तक !

पर्यटनाचे डोही आनंद तरंग

प्रकाशक

नचिकेत प्रकाशन, स्नेहनगर नागपूर - १५.